
डॉ. आंबेडकरांचा साहित्य विचार

डॉ. प्रकाश खरात

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३५१



REFBK-0026836

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ निबंध
३५१४
२१.८.३६
२१७ | १८३

डॉ. आंबेडकरांचा साहित्य विचार

डॉ. प्रकाश खरात

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ३५१४
२१.८.३६
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0026836

ऋचा प्रकाशन
नागपूर - १५

प्रकाशन क्र. १७
प्रथमावृत्ती - ५ ऑक्टो. १९९२

प्रकाशक :
प्रदीप मुळे
ऋचा प्रकाशन, ९, गजानन नगर,
नागपूर १५

मुद्रक/मुखपृष्ठ :
समीर ऑफसेट वर्क्स,
गजानन नगर, नागपूर
नागपूर

संगणक जुळवणी :
न्यू विदर्भ कॉम्प्युटर इन्स्टिट्युट,
८ ०, गजानन नगर, नागपूर १५

मूल्य : ६०/-

Dr. Ambedkarancha Sahitya Vichar

Dr. Prakash Kharat

© सौ. रचना प्रकाश खरात (एम.ए.)
२७९, लक्ष्मी नगर, नागपूर

मुखपृष्ठ :
सुहास चांडक

प्रमुख वितरक:
फेमस बुक सेंटर,
१९२, छत्रपती नगर,
वर्धा रोड, नागपूर १५

अर्पण पत्रिका

आंबेडकरी आंदोलनात
सहभागी होऊन ज्यांनी ब्राह्मणी
धर्माच्या शोषणाची गुलामगिरी
झुगारुन दिली;
एका क्रांतिकारी चेतनेतून आम्हा भावंडांना
अपार कष्टातून शिकविले, व माझ्या हातात
लेखनी दिली, ते माझे वडील
ओंकार मारोती खरात व आई
सौ. कौसल्याबाई ओंकार खरात
यांच्या जीवन संग्रामातील
१४ ऑक्टो. १९५६च्या
क्रांती दिवसास!

५ ऑक्टो. १९९२

प्रस्तावना

डॉ. आंबेडकरांचे भारतीय साहित्य विषयक विचार हे स्वतंत्र जीवनदृष्टीचे व वाङमयीन दृष्टीचे आहेत. वैदिक ब्राह्मणी साहित्याने प्राचीन भारतात जशी प्रतिगामित्वाची भूमिका बजावली तशी आजही आधुनिक भारतात बजावत आहे. काल त्यांनी ऐंशी टक्के जनतेला कला साहित्य निर्मितीत प्रवेश करु दिला नाही. शुद्र-अतिशुद्र आदिवासी बनवून त्यांना शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, साहित्य-कला या जीवनाच्या महान जगण्यापासून वंचित केले. त्या विरुद्ध डॉ. आंबेडकरांनी एक क्रांतीकारी लढा दिला. आणि इतिहासातील शोषणतत्वाला शोधून मांडले. समताधिष्ठीत मूल्यांच्या समाजरचना निर्मितीत समग्र जीवनाचे योगदान दिले. प्राचीन भारतातील बौद्ध साहित्यदृष्टीला जीवनात रुजवून लोकशाही विचाराला कुटूंब संस्थेतूनच गतीमान केले. शोषण करणाऱ्या परंपरेला नकार व शोषणविरुद्ध बंड करणाऱ्या तत्वाचा स्वीकार भारतीय जनतेने स्वतः गतीमान करावा ही प्रेरणा उद्घाटीत केली.

आज डॉ. आंबेडकरांची साहित्यदृष्टी ही आधुनिक भारतीय साहित्यशास्त्राची मूलतत्व म्हणून दलित साहित्य अथवा आंबेडकरवादी साहित्याने स्वीकारली आहेत. या साहित्याच्या सौंदर्यशास्त्रीय मांडणी करीता डॉ. आंबेडकरांचा विचार पायाभूत ठरणारा आहे. मराठी साहित्य समीक्षा विचाराचे ते एक बलस्थान आहे.

डॉ. आंबेडकरांना समकालीन असलेल्या विचारवंतापेक्षा त्यांची साहित्यदृष्टी ही एक सिद्धांत झाली आहे. त्यांनी दिलेली कसोटी ही श्रमिक, अस्पृश्य, आदिवासी, शुद्र, स्त्रीया व मागासलेल्या बहुजनांची उन्नती आहे.

त्यांच्या सुख दुःखाना, आशा आकांक्षांना व मानवतावादी मूल्यांना महत्व देणारा विचार त्यांनी साहित्य विचार मानला. बुद्धिवाद, विज्ञानवाद, भौतिकवाद, लोकशाहीमूल्यविचार हाच सर्व मानवी मनाचा कल्याणाचा विचार मानला. प्रबोधनाच्या भावसंवेदना साहित्य-कला यांचे केन्द्र मानले म्हणून त्यांनी ब्राह्मणी शोषणाची ग्रंथसंपदा नाकारली आणि बौद्धसाहित्य विचारातील 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हा भावनेने गदगदलेला विचार स्वीकारला. सर्व मानवी मनाच्या कल्याणाचा हा विचार भारतीय लोकमनाची संवेदना होऊन विश्वभर कसा तरलपणे जगभर पसरला हे आपल्या जीवनकार्यातून व साहित्यलेखनातून सांगितले. 'चातुर्वर्ण्य' या वैदिक-ब्राह्मणी सिद्धांताचा भारतीय लोकजीवनावर अतिशय वाईट परिणाम झाला; त्याचप्रमाणे साहित्य-कला जीवनावरही झाला. हे साहित्य समिक्षेचे नवे प्रमेय त्यांच्या साहित्य विचारात प्रकट झाले आहे. प्राचीन वैदिक-ब्राह्मणी साहित्य, प्राचीन बौद्ध साहित्य, मध्ययुगीन संत साहित्य, व आधुनिक मराठी साहित्य विचारातून त्यांनी नवा साहित्य विषयक दृष्टीकोन दिला. साहित्य आणि जीवन यांच्या परस्परसंबंधातून चिकित्सा झाली पाहीजे. शुद्र, अतिशुद्र, अस्पृश्य व स्त्रीया यांच्या सुख-दुःखाला वगळून कोणतिही समीक्षा होऊ शकत नाही. त्यांना विचारात घेऊनच साहित्याचा विचार झाला पाहीजे ही चेतना त्यांच्या साहित्य विचारात प्रकट झाली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणेतून मराठी भाषेत दलित साहित्य अथवा आंबेडकरवादी साहित्य ही चळवळ उदयास आली. आज ती हिन्दी, पंजाबी, गुजराथी, कन्नड, बंगाली इत्यादी भारतीय भाषेतून ती झपाट्याने विकसित होत आहे. प्राचीन भारतात बुद्धापासून जसा बौद्ध संस्कृतिचा विकास झाला तसाच आधुनिक भारतात आंबेडकरापासून आंबेडकर संस्कृतिचा विकास सुरु झाला आहे. भारताच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक व इतिहास यांची चिकित्सा व शोधयात्रा त्यांच्या प्रेरणेतूनच सुरु झाली. आंबेडकर संस्कृतिच्या संवर्धनासाठी व बहुजनांच्या सांस्कृतिक संवेदनांच्या रुपासाठी आंबेडकरांच्या साहित्य विचाराचा शोध घेणे आवश्यक वाटले. या प्रयोजनातूनच

'आंबेडकरांचा साहित्य विचार' या पुस्तकाचा जन्म झाला.

लोकशाही जीवनदृष्टीचा आणि वाङ्मय विचाराचा परस्पर संबंध काय असावा? साहित्य आणि समाज यांचे परस्परसंबंध कसे असावे? लेखकांनी व वाङमयाने कोणत्या विचाराला प्राधान्य दिले पाहिजे? प्रबोधनाच्या विचाराला साहित्यात का महत्व द्यावे? इत्यादी अनेक प्रश्नांची उत्तरे डॉ. आंबेडकरांनी दिली आहेत. प्रस्तूत पुस्तकातील त्यांच्या विचाराची मदत आजच्या काळातील आंदोलनाला होईल. आधुनिक भारतीय समाज निर्मितीच्या संवेदनेला होईल अशी आशा वाटते.

'डॉ. आंबेडकरांचा साहित्य विचार' हे पुस्तक आपल्या हाती देतांना मला आनंद होत आहे. डॉ. रुपा कुळकर्णी, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. विमलकिर्ती, एच. एल. कोसारे व कवी वामन निंबाळकर यांच्या संवादातून मला नेहमीच मदत झाली त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझी पत्नी सौ. रचना खरात हिच्या मदतीमुळे प्रस्तूत पुस्तक हातावेगळे करता आले. त्याचप्रमाणे ऋचा प्रकाशनचे, प्रदीप मुळे व बंधु यांनी हे पुस्तक प्रकाशित करण्यात जे अगत्य दाखविले त्याबद्दल मी त्यांचा मनपूर्वक आभारी आहे.

५ आक्टो १९९२
धम्मचक्रप्रवर्तन दिन

– डॉ. प्रकाश खरात
नागपूर

अनुक्रम

- अर्पण पत्रिका
- प्रस्तावना
- डॉ. आंबेडकरांचा वैदिक व ब्राह्मणी साहित्य विषयक विचार
- डॉ. आंबेडकरांचा मध्ययुगीन संत साहित्य विषयक विचार
- डॉ. आंबेडकरांचा आधुनिक मराठी साहित्य विषयक विचार
- डॉ. आंबेडकरांचा बौद्ध साहित्य विषयक विचार

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निषेध
वा. क्र. ३५१२
२६/३६
२१/८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

१

डॉ. आंबेडकरांचा वैदिक व ब्राह्मणीसाहित्य विषयक विचार

आधुनिक भारतीय साहित्य मीमांसेत डॉ. आंबेडकरांची वैदिक व मध्ययुगीन साहित्य विषयक समीक्षा युगप्रर्वतक आहे. समाजाला प्रबोधनात्मक संवेदना देणारी आहे. लोकशाही चेतना शिकविणारी आहे. वेद वाङमय व संत साहित्याच्या संदर्भात जी एक दृष्टी डॉ. आंबेडकरांनी दिली तिचे स्वागत त्यांच्या हयातीत झाले नाही. कारण त्या प्रस्थापित व्यवस्थेने वैदिक साहित्याच्या आधारावरच आपल्या ज्येष्ठपणाचा अहंकार पोसला होता. आणि ब्राह्मणी ग्रंथसंपदा व पुराण साहित्याच्या पराभूत विचाराने शूद्र-अतिशूद्र या लोक समूहाला कायमचे दास्यात कोंडले होते. बहुजनाला जे दास्य भोगावे लागत होते ते त्यांचे दास्य नाही, गुलामगिरी नाही, तर तो तुझा धर्म आहे, ईश्वरानेच तुला तो जाणीवपूर्वक दिला आहे हे मोठ्या चलाखीने, धूर्तपणाने सांगितले होते. अशा या वैदिक वाङमयाच्या व पुराण साहित्याच्या विरोधात एक साधा शब्दही कोणी बोलला तर ब्राह्मणी पंडीत अस्वस्थ होत होते. आजही स्वतंत्र भारतात काही प्रमाणात विद्यापीठी ब्राह्मण लेखकांची तशीच परिस्थिती आहे. अर्थात, या

वगनिही काळजीपूर्वक वेद वाचलेत काय? मनुस्मृती वाचली काय? या प्रश्नांचे उत्तर नाही असेच बहुसंख्यकांच्या बाबतीत द्यावे लागते. त्यांचे जे आकलन आहे ते प्रामुख्याने पारंपारिक ऐकीव ज्ञानावरच आहे. म्हणून आजचा वकिल, डॉक्टर, ऑफीस मधला कर्मचारी वेद मनुस्मृती इत्यादी ग्रंथाना चांगलेच समजतो. परंतु ते राष्ट्रीय दृष्टीने चुक आहे. वस्तुनिष्ठ दृष्टीनेही चूक आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात जेवढे राष्ट्रीय पातळीवर नेते झाले त्यांनी वेदांविरुद्ध ब्र शद्वही काढला नाही. आर्य समाज, प्रार्थना समाज, ब्रह्मोसमाज व राधाकृष्ण सारखे ब्राह्मणी लेखकांनीही वेदांचे श्रेष्ठत्व प्रतिपादन केले. आजच्या वैचारिक व विज्ञानयुगातही असे का घडले? त्याचे रहस्य काय? याचे प्रमुख कारण म्हणजे हे सगळे समाज-लेखक ब्राह्मणवादाच्या मगरमिठीतून जाणिवपूर्वक बाहेर यावयास तयार नव्हते. कारण या वैदिक साहित्याने व पुराण ब्राह्मणी वाङमयाने उच्चवर्णियांचे वर्चस्व, हक्क जोपासले आहेत यांची त्यांना पक्की जाणीव होती. उच्चवर्णियांच्या अधिकारांचे वंश परंपरेने संरक्षण केले आहे, ऐंशी टक्के बहुजन समाजाला सामाजिक व आर्थिक दास्यात डांबले आहे. त्यांना शेतमळ्याचे व गावगाड्याचें कामात गुंतवून टाकले; याची पूर्णपणे ओळख होती. आणि ही हुशारी, ही धुर्तता, वर्णव्यवस्थेला आदर्श समाज रचनेच्या रुपाने लोकांत रुजवून वरिष्ठ दहा टक्के लोक वैभव जगत होते. आपल्या संसारात स्त्री-मुलांसोबत संपत्तीत व जन्मतःच सन्मानात चैनीने आयुष्य कंठीत होते. म्हणून ब्राह्मणी लेखकांनी, विचारवतांनी, राष्ट्रीय नेत्यांनी झाडून सगळ्यांनीच जवळजवळ वर्णव्यवस्था व वेदवाङमयाचे समर्थन केले. हे समर्थन बुद्ध पूर्ण काळात वैदिक धर्माच्या नावाने केले. हे समर्थन बुद्धत्तोरकाळात ब्राह्मणी धर्माच्या नावाने केले. हेच समर्थन आधुनिक काळात हिन्दु व हिन्दुत्व या नावाने चालू आहे. अर्थात या प्रवाहाला प्राचीन व आधुनिक कालातही अस्पृश्यता व अस्पृश्यांचे दुःख दिसले नाही का? मंडळ आयोगामुळे कुणबी, तेली, माळी यांचे जीवन चांगले होते हे कळत नाही का? आदिवासींना नवा विचार दिल्यामुळे आधुनिक आयुष्य त्यांना जगायला मिळते हे त्यांना समजत नाही का? ब्राह्मणी वेद व पुराण

वाङ्मयामुळे बहुजन समाजाची विचार शक्ती पंगू होते हे समजत नाही कां? या प्रश्नाचे उत्तर त्यांना 'सारे कळते' असेच द्यावे लागेल. तरी सुद्धा पारंपारिक व्यवस्था हे सगळे जाणीवपूर्वक घडवून आणते हे नाकारता येत नाही. या शोषण व्यवस्थेविरुद्ध समग्र जीवनाने डॉ. आंबेडकरांनी विरोध केला. या व्यवस्थेच्या वैचारिक वाङमयीन हत्याराविरूद्ध ते सतत बोलले. वेद, गीता, राम, कृष्ण यांच्या विरोधात त्यांनी त्यांचे खरे स्वरुप जनतेसमोर ठेवले. या सगळ्या निर्मितीमागे त्यांच्यासमोर भारतीय समाज बलाढ्य व्हावा ही प्रेरणा होती. वेद वाङमयाचे खरे स्वरुप दाखविण्यामध्ये बहुजन समाजाची उन्नती व्हावी हीच एकमेव तळतळ होती, संत साहित्य विषयक भूमिका काय अथवा वेद, पुराण वाङमय विषयक त्यांचा विचार काय या सगळ्याच समीक्षेमागे भारतीय समाजाचा नवा भविष्यकाळ उज्वल घडवावा ही प्रेरणाच आहे. म्हणून त्यांचा विचार समजून घेण्याची भारताची ऐतिहासीक गरज आहे.

प्राचीन वेदवाङमय व ब्राह्मणी पुराण वाङमय समजून घेत असतांना डॉ. आंबेडकरांनी जे समाज चिंतन मांडले. ऐतिहासीक विश्लेषण मांडले. ते सुद्धा थोडक्यात समजून घेतले पाहिजे. कारण वाङमयात तत्त्वज्ञान, इतिहास, समाजजीवन इत्यादिंचे पदर असतात. म्हणून साहित्य विचार समजून घेतांना ऐतिहासिक समाज संघर्षही समजून घ्यावा लागतो.

ब्राह्मणी वाङमयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी परकीय आर्य आणि स्थानिक भारतीय सिंधू लोक यांच्या संघर्षाची आहे. आर्य वैदिक संस्कृती विरुद्ध भारतीय नाग संस्कृतीचा संघर्ष या वाङमय निर्मितीच्या बुडाशी आहे. आर्य हे इराणमधून आले असे म. फुले, गुलामगिरी या ग्रंथात म्हणतात. लो. टिळक आर्य उत्तर धृवा कडून आले असे म्हणतात. आर्य कुठून आले? या वादात आपणाला पडायचे नाही. आर्य परकिय आहेत ही ऐतिहासीक वस्तुस्थती आहे. त्या प्रारंभी घडलेल्या घटनांचे चित्रण व आर्य - अनार्य यांचा संघर्ष ऋग्वेदामध्ये प्रतिबिंबित केला आहे. म्हणून ऋग्वेदाचा आधार घेतला पाहिजे.

ऋग्वेदामध्ये प्रामुख्याने कवी ब्राह्मणांनी - आर्यांनी ऋचा लिहिल्या. या

कविंनी काय लिहावे? मूळ भारतीय दास, दस्यू, पणी या स्थानिक लोक समाजाबद्दल काय बोलले? ऋग्वेदातील कवी बाह्मण हा भयानक दुष्ट; क्रूर होऊन प्रकटला आहे. त्याने दास, दस्यू, पणी या लोकांच्या नाशाच्या प्रार्थना लिहिल्या. त्यांचे धन, धान्य, गाई मिळाव्या म्हणून ऋचा लिहिल्या आणि त्यांना ठार करण्यासाठी इन्द्र या देवतेला प्रार्थना केल्या. हा भारताचा प्राचीन संघर्ष म्हणजे परकीय आर्य वैदिक बाह्मण लोक समूह विरुद्ध स्थानिकसिंधु-नाग भारतीय लोकसंग्रह (बहुजन समाज) असा आहे. हा संघर्ष इ.स. पूर्व २८०० वर्षापासून घडला आणि तो अनेक शतके चालला असे इतिहासकाराचे म्हणणे आहे. हा संघर्ष म्हणजे परकीय इंग्रज, मुसलमान विरुद्ध भारतीय असाच आहे. फरक इतकाच आहे की इंग्रज, मुसलमान यांच्या संघर्षाचा काळ लोकांना आठवतो. आणि परकीय आर्य वैदिक बाह्मण विरुद्ध स्थानिक भारतीय यांच्या संघर्षाचा काळ लोकांच्या स्मरणातून दृष्टीआड झाला आहे. परंतु तो दृष्टीआड झालेला संघर्ष ऋग्वेद, वेद-गीता, रामयण-महाभारत या ब्राह्मणी ग्रंथामंध्ये पुसटसा चित्रित केला आहे. ऋग्वेदात दास, दस्यू, पणी विरुद्ध ऋग्वेदी आर्य यांचा संघर्ष मिळतो. [१] महाभारतात नागांना खांडव वनात जाळले यांचा संदर्भ मिळतो. रामायणात असूर, राक्षस यांना मारले यांचे पुरावे आढळतात. म्हणून नाग, असूर, राक्षस, दास, दस्यू, पणी ही सगळी नावे मानवाचीच आहेत. जे आर्य-वैदिक यांच्या विरोधातील आहेत. या इतिहासाला नव्याने समाजशास्त्रीय दृष्टीने मांडले पाहिजे. म्हणजे एक सलग भारताचा इतिहास साकार होणार आहे. कारण हे सगळे पुरावे वाङमयात आहेत. आणि वाङमय व समाज यांचा निकटचा संबंध आहे. या प्राचीन इतिहासातून वर्तमानातील शूद्र-अतिशूद्राचा लढा व इतिहासाबद्दल यांची उकल होणार आहे. त्या इतिहासाबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात –

"The Asuras are not monsters. They too are a jan-vishesh human beings. According to Satpatha

---

१. ऋग्वेद ऋचा क्र ४.१६.१३, ४.३०.१५, ७.९९.५, २.१४.७, ६.२६.६, ६.९६.१३, १.११०.६.

Bramhana the Asuras are the decendants of prajapati the lord of the creation. How they become evil spirits is not known. But the fact is recorded that they fought against the Devas for the possession of the earth and that they were overcome by the Devas and that they finally succumbed. The point is clear that the Asuras were members of the human family and monsters. With this exhumation of debris we can see Ancient Indian History in a new light."[2]

आर्यांनी स्वतःला श्रेष्ठ म्हणवून घेतले आणि स्थानिक भारतीय जनतेला कनिष्ठ म्हटले आहे. स्वतःला देव म्हणवून घेतले आणि भारतीय बहुजन नेत्यांना असूर, राक्षस अशी निंदाजनक संवेदना दिली. हे सगळे भारतीय समाजातील सिंधु संस्कृतीचे व महादेवाचे उपासक होते. बुद्धपूर्व भारतीय श्रेष्ठ नाग संस्कृतीचे व महादेवाचे उपासक होते आणि ही संस्कृती लुटारू ऋग्वेदिक आर्यांनी जाळली. याचे पुरावे मोहेंजोदाडो, हडप्पा संस्कृतीच्या उत्खननातून व ऋग्वेदाच्या अभ्यासातून साकार झाले आहेत.[३] परकीय आर्यांनी व कवि ब्राह्मणांनी आर्यांच्या राजसत्तेला पूरक अशी ही वाङमय निर्मिती केली. भारतीय बहुजनांच्या पराक्रमाला लगाम घालण्यासाठी वेदांमधून वर्णव्यवस्थेची निर्मिती केली.

भारतीय शूद्र-अतिशूद्र आपल्या दंडुक्याच्या राजसत्तेने आटोक्यात येत

---

२. Ambedkar B.R., Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches Vol. 3, Bombay, Page No.152

३. राहूल सांकृत्यायन, ऋग्वेदिक आर्य, इलाहाबाद, १९५७, पृष्ठ - ६ "मोहेंजोदाडो - हडप्पा (सिंधु) की सभ्यता अन्तिम उत्कर्ष काल इसा पूर्व १५०० माना जाता है। उसमे हजार वर्ष बाद आर्यो का प्रवेश उनकी भूमि में हुआ और उससे कमसे कम तीन सौ वर्ष बाद (१३०० इ.पू.) भारद्वाज, वशिष्ठ, विश्वमित्र आदिने अपनी ऋचाएं (पद) रची। आर्यो और सिन्धु के पुराणे निवासियों के संघर्ष का परिचय ऋग्वेद में देवो और असुरों के युद्ध की प्रतिध्वनी के रूप में मिलता है"

नाही म्हणून त्यांच्या मेंदूलाच वर्णव्यवस्थेचे खिळे ठोकले. वर्णव्यवस्था ही ईश्वरनिर्मित व वेद वाङमयही ईश्वरनिर्मित आहे असे सांगून ब्राह्मणी वेद साहित्य संवेदनाने बहुजनांच्या विचार शक्तीलाच बेड्या ठोकल्या व हे वाङमय श्रेष्ठ आहे अशी एक ब्राह्मणी विचारवंत-लेखकांची फौजच अडाणी शूद्र-अतिशूद्राला शिकविण्यास कार्यरत झाली. त्या विरुद्ध बोलणारा डॉ. आंबेडकर हा पहिला श्रेष्ठ टीकाकार आहे. त्या साहित्याची मीमांसा करणारा पहिला श्रेष्ठ समीक्षक आहे. भारतीय समाज आणि वैदिक साहित्य यांचा परस्पर संबंध सांगणारा पहिला श्रेष्ठ भाष्यकार आहे.

ऋग्वेदामध्ये दास, दस्यु, पणी या भारतीय बहुजन लोक समूहांना मारण्याची प्रेरणा ब्राह्मण ऋषी देत होते म्हणून वैदिक व पुराण वाङमयात ऋषीला अतिशय महत्व दिले आहे. ब्राह्मण ऋषीबद्दल एक आदरभावनेची जाणीव सतत या साहित्याने शिकविली आहे. याचे कारण काय? या प्रश्नाचे उत्तर आर्य क्षत्रिय राजा व पुरोहित ब्राह्मण ऋषी यांच्या एकमेकांच्या वैभवी जीवनात आहे. परस्पर संबंधाने शूद्र-अतिशूद्राला नष्ट करुन राज्य व वर्चस्व टिकविण्यात आले. ऋग्वेदामधील ऋषी ऋचातून किंवा कवितेतून दास, दस्यू, पणीला मारण्याची प्रेरणा देतो. त्यामुळे ब्राह्मण अभ्यासक ऋषींचे गुणगान गातात, परकीय आर्य संस्कृतीला स्थिर करण्यात व भारतीय बहुजन नेत्यांचे (असूर-राक्षसांचे) राज्य नष्ट करण्यात ऋषींनी खूप मोठी भूमिका बठविलेली आहे.

रामायणात हे ऋषी प्रथम असुरांच्या - राक्षसांच्या मालकीच्या प्रदेशात जात व तेथे यज्ञ करीत. असुरांनी विरोध केला की मग आर्य राजा सैनिकासहित येऊन त्याला मारुन टाकत असे.

यज्ञाला राक्षस विरोध करीत कारण तो यज्ञ आर्य ऋषी त्यांच्या जागेत करीत. म्हणून विरोध करणे हे साहजिकच आहे. आज जर भारताच्या सीमेत दुसऱ्या राष्ट्रातील लोक यज्ञ करतील, मालकी दाखवितील तर भारताने विरोध केलाच पाहिजे. तोच विरोध स्थानिक असुर परकीय आर्यांसोबत करीत. यात काहीच चूक नाही. अशा त्या लोकांना ब्राह्मणी साहित्याने वाईट रेखाटले आणि हिंसेला

प्रवृत्त करण्याऱ्या ऋषीला वैदिक पुराणाने चांगले म्हटले. जे खोटे आहे ते चांगले ठरविले. त्या चांगल्याचा, सत्याचा, प्रामाणिक इतिहासाचा शोध घेण्याची जिज्ञासा डॉ. आंबेडकरांनी दिली. असुर काय किंवा नाग लोक काय हेच भारताचे खरे समाजमन आहे. भारताचा बहुजन समाज प्राचीन भारतातील नाग व असुर समाज आहे. त्यांना ब्राह्मणी साहित्याने चुकीचे, खोटे रेखाटले, त्यांना क्रूर, हिंस्र संबोधले. आणि इतिहासातील सत्य उलटे केले आहे. खरे तर आर्य, ब्राह्मण हेच खरे हिंस्र आहेत, खरे नीच, रानटी आणि क्रूर आहेत. त्यांनी अस्पृश्यता निर्माण करुन मानवाचा छळवाद केला. शूद्र-अतिशूद्राला, स्त्रीयांना अडाणी ठेवले. हे नीच तत्त्व आजही पाहावयास मिळते. या क्रूरतेला वेदवाङमयानेही सुरेखपणे आर्य राजवटीला साथ दिली. म्हणूनच चार्वाकाने वेदकर्त्याला "त्रयो वेदस्य कर्तारोः । भण्ड, धुर्त, निशाचरः । " म्हटले आहे. वेद हे धूर्त, ढोंगी, लबाड लोकांनी बहुजनांना लुटण्यासाठी तयार केले. अशा त्या चार्वाकांना सुद्धा ब्राह्मणी साहित्याने राक्षस म्हटले. हे सगळे संदर्भ बहुजनांच्या प्रबोधनाशी निगडीत आहेत. हा इतिहास डॉ. आबेडकरांनी संशोधित करण्यास नव्या अभ्यासकाला चालना दिली आहे. वैदिकांनी ज्या नाग, असूर लोकांना वाईट म्हटले आहे ते लोक श्रेष्ठ आणि सुसंस्कृत होत हे आधुनिक अभ्यासकांनी सत्य समोर आणले आहे. याच विचार प्रवाहाला डॉ. आंबेडकरांनी आंदोलन आणि लेखन यांच्या माध्यमातून भारताचा भविष्यकाळ उज्वल करण्यास गती दिली आहे. वैदिक साहित्यातील समाज जीवन उलगडून दाखविले आहे प्राचीन भारतातील नाग कोण होते? दास लोक कोण होते? डॉ. आंबेडकर म्हणतात "दास आणि नाग हे एकच लोक होत. वैदिक वाङमयामध्ये नाग लोकांनाच दास असे का संबोधण्यात आले हे कळणे कठीण नाही. दहाक या इण्डो इरानियन शब्दांचे संस्कृतीकरण केलेले रुप दास होय. नावावरून आर्य लोक त्यांना दहाक म्हणू लागले. परंतु संस्कृतमध्ये त्याचे रुप दायस असे बनले व संपूर्ण नाग लोकांसाठी ते वापरण्यात येऊ लागले"[४]. डॉ. आंबेडकरांनी प्राचीन साहित्याच्या आधारे अस्पृश्य हे नाग संस्कृतीचे लोक होते,

---

४. आंबेडकर, बी.आर.अस्पृश्य कुळचे कोण? अनुवाद - गांजरे मा.फ. १९, नागपूर, पृष्ठ ७०.

बौद्ध संस्कृतीचे लोक होते, हे ऐतिहासिक सत्य मांडून ब्राह्मणी संस्कृती व साहित्य यांनी केलेला अत्याचार स्पष्ट शब्दात मांडला आणि बहुजन विरोधी ब्राह्मणी साहित्याची व संस्कृतीची 'रिडल्स इन हिन्दुइझम' या ग्रंथात मीमांसा केली.[५]. 'रिडल्स इन हिन्दुइझम' हा ग्रंथ म्हणजे बहुजनांच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा आहे. स्त्री, शूद्र-अतिशूद्र यांच्या विचारशक्तीला मोकळी वाट करुन देणारी उजेडाची दिशा आहे. वेदादी ब्राह्मणी ग्रंथांचे खरे स्वरुप दाखविणारा दीपस्तंभ आहे.

भारतीय समाजाला व व्यक्तिला जगाच्या वैचारिक संस्कृतीत महान होण्यासाठी डॉ. आंबेडकरांचा विचार श्रेष्ठ मार्ग आहे. कालपर्यंत वैदिक साहित्याने व ब्राह्मणी संस्कृतीने कसे फसविले? कसे चुकीचे आदर्श शिकवून बहुजनाला अज्ञानाच्या मागनि पिटाळले? कसा चुकीचा विचार करण्यास शिकविले? त्या समग्र शोषणाची डॉ. आंबेडकरांनी प्रस्तुत ग्रंथात समाज व राष्ट्र पुरुषाला जडलेल्या महाभयंकर वैदिक ब्राह्मणी महारोगाची चिरफाड केली. ब्राह्मण देव-देवता, वर्णव्यवस्था, आश्रमधर्म, मनुस्मृती, रामायण, महाभारत, कलीयुग इत्यादि गोष्टींची मीमांसा युगप्रवर्तक आहे. समाज जीवनात वेदाला जे महत्व देण्यात येते ते मुळातून अभ्यासले जावे. त्यांनी बहुजन समाजाचे प्रबोधन केले काय? असा प्रश्न निर्माण करुन वेदाचे खरे स्वरुप स्पष्ट केले. डॉ. आंबेडकर म्हणतात Enough has been extracted from the Vedas to show that they contain nothing that can be said to be spiritually or morally elevating. Neither the subject matter nor contents of the Vedas justiffy the infallibility with which they have been invested.' [६]. हे वेंदाबद्दलचे त्यांचे विचार निश्चितच भारतीय आधुनिक साहित्य समीक्षेला समृद्ध करणारे व नवी दिशा दाखविणारे आहेत.

डॉ. आंबेडकरांनी वेद व गीता या ग्रंथातील बहुजनांबद्दलचे विषारी

---

५. आंबेडकर बी.आर. Riddles in Hindusim Vol. 4 Bombay 1987.

६. त्रैव पृष्ठ ५२

तत्त्वज्ञान दि. २९.११.४४ रोजी पुणे येथील जाहिर भाषणातून शोषित समाजाला समजावून सांगितले. ते म्हणाले, 'जो पर्यंत तुम्ही ग्रंथ प्रमाण म्हणून मानाल तोपर्यंत जगात तुमचा उद्धार होणार नाही' या पुरस्कारातुन शूद्रांची निंदा व अवहेलना करण्यात आली आहे. त्यांच्यावर निरनिराळे आरोप करण्यात आले आहेत, त्याच्यात न्यूनगंड निर्माण होईल, ते कायमचे दलित राहतील अशी योजना करण्यात आली आहे. ती पुस्तके जर तुम्ही आम्हास धर्मग्रंथ म्हणून प्रमाणभूत माना अशी सक्ती करीत असाल तर ते मी कधीच मान्य करणार नाही. हे माझे एक जीवन कार्य आहे. स्वतः समजावून घेऊन ते मला माझ्या लोकांना समजावून द्यावयाचे आहे. खालच्या वर्गातील लोकांना निःसंतान करण्याचा त्यांना कायमचे पायदळी ठेवण्याचा व त्यांना रसातळाला नेण्याकरिता पध्दतशीर प्रयत्न करणारा अशा एखादा विशिष्ट वर्ग जगातील इतर कोणत्याही देशात आढळणार नाही' [७]

डॉ. आंबेडकरांचा हा विचार कष्टकऱ्यांच्या अस्पृश्यांच्या परिवर्तनाला प्रेरणा देणारा आहे. त्यांच्या विचारशक्तीला क्रांतीकडे घेऊन जाण्यास मदत करणारा आहे. त्यानी शोषितांची मने ज्या थोतांडांनी वेदादी ग्रंथांनी संस्कारीत केली. त्या थोतांडातून बाहेर पडण्यासाठी डॉ. आंबेडकर गीता वेद मनुस्मृतीने बिंबविलेले शोषण पुसून टाकतात. आणि प्रबोधनाला चालना देतात परंतु त्यांना समकालीन असलेली भारतीय मार्क्सवादी चळवळ व त्यांचे चिंतन वेद, गीता यांचा गौरव करतांना आढळते. याचे कारण ब्राह्मणेत्तर अभ्यासकांच्या मते मार्क्सवादी चळवळ ब्राह्मणवादी संस्कारातून मुक्त झाली नाही. तिने ब्राह्मणवादाचे गुन्हे जाणिवपूर्वक पाठीमागे घातले.

त्यामुळे भारतीय मार्क्सवादी चिंतन हे पर्यायाने ब्राह्मणवादी शोषणाच्या आश्रयाने प्रकट झालेले चिंतन ठरले. आणि वेद, मनुस्मृती, गीता, यांनी श्रमिकांना (अस्पृश्यांना) कष्टकरणाऱ्यांना (बहुजनांना) गुलामगिरीत ठेवण्यातच यश मानलेले असतांना कॉ.डांगे, बानी देशपांडे प्रभृतीनी वेदादी ग्रंथात मार्क्सवाद धुंडाळला व ब्राह्मण शोषणाचा अप्रत्यक्ष गौरव केला. अशा चिंतन परंपरेपासून

---

७. आंबेडकर बी. आर. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १, संपा. गांजरे मॉ.फ. नागपूर पृष्ठ १२२

शूद्र अतिशूद्रांचे वैचारिक शोषण थांबू शकत नाही. त्या करिता डॉ. आंबेडकरांची ब्राह्मणी साहित्याची भूमिकाच खऱ्या अर्थाने अस्पृश्यांना, कष्टकऱ्यांना , क्रांतीकडे नेऊ शकेल. कारण वेदादी ग्रंथांवद्दल स्पष्ट मत मांडणारा सुवर्णामधून कोणीही स्पष्ट बोलत नाही. परंतु या प्राचीन साहित्याबद्दल स्पष्ट भूमिका घेतल्याशिवाय समाज जीवनात व साहित्य जीवनातही क्रांती होऊ शकत नाही. मराठी साहित्य समीक्षेलाही नवी दिशा मिळू शकत नाही. प्राचीन मराठी संत साहित्याचेही खरे मूल्यमापन होऊ शकत नाही. परंतु प्राचीन व मध्ययुगीन साहित्याबद्दल प्रखर वैचारिक भूमिका डॉ. आंबेडकरांनी घेतली. कारण त्यांच्यासमोर भारताचे उद्याचे महान स्वप्न आहे. वेदांबद्दल ते म्हणतात "The vedas are a worthless set of books. There is no reason either to call them sacred or infalliable" [८]

अशा या ग्रंथाचा गौरव जसा पारंपरिक ब्राह्मणी चळवळीकडून व लेखकाकडून झाला त्याचप्रमाणे मार्क्सवादी चळवळीकडून व लेखकाकडूनही झाला. स्वतंत्र भारतातही या पुढे असेच घडत राहिले तर भारताला भविष्य राहिल का? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या चिंतनात प्रकट झाले आहे, 'रिडल्स इन हिन्दुइझम' च्या प्रस्तावनेत ते लिहितात - Nobody has had the courage to ask why these worthless books which contain nothing but invoscation to tribal Gods to destory the Economies, loot their property and give it to their followers have been made sacred and infallible But the time has come when the Hindu mind must be freed from the hold which the silly ideas propogated by the Brahmins have on them. Without this Liberation India has no future.[९]

एका उच्च ध्येयवादातून त्यांची वेदवाङमयाची समीक्षा प्रकट झाली आहे.

---

८. Ambedkar B.R., Riddles in Hinduism, Bombay, 1987 Vol.4 Page8.
९. तैव - पृष्ठ ८ - ९

रामायण व महाभारत या ब्राह्मणी ग्रंथातील नायक राम व कृष्ण हे आदरणीय आहेत. असा निष्कर्ष ब्राह्मण टीकाकारांनी जनतेसमोर मांडला. कारण ब्राह्मणी धर्म व ब्राह्मणवाद यांच्यासाठी त्यांनी कार्य केले. भारतीय समाजातील मूळ लोक असूर व नाग यांच्या हत्या केल्या. त्यांची राज्ये धुळीस मिळविली. त्याची अस्पृश्यता व वर्णव्यवस्था विरहीत समाजरचनेला नष्ट केले. यज्ञयाग, व्रतवैकल्य व ब्राह्मणवर्चस्व या विचाराला नाकारणाऱ्या तत्त्वाची व व्यक्तिला समान महत्व देणारी नागांची, असूरांची, राक्षसांची विचारसरणी नष्ट केली. त्याच्या प्रदेशावर, संस्कृतीवर, समाज सिद्धांतावर हल्ले करुन आर्य बाह्मणांनी वर्णव्यवस्थेला म्हणजेच विषमतेला धर्म म्हणून रुजविले. बहुजन समाजाला गुलाम करणाऱ्या राजालाच आदरणीय ठरविण्याचे कार्य रामायण-महाभारत यांनी केले. कृष्णाने नागांना खांडवनात जाळले. द्रोणाचार्य ब्राह्मणाने लाखो एकलव्याचे आंगठे कापले. आर्य रामाने लाखो शंवूकांची डोकी उडविली. या दुष्ट कृत्यांनाच मनुस्मृतीमध्ये कायद्याचे रुप दिले. अस्पृश्यतेच्या नावाने इतिहासभर ब्राह्मणी धर्मनि छळवादाचा हैदोस घातला. त्या अन्यायाचे नेतृत्व राम आणि कृष्ण या नायकांनी केले. डॉ. आंबेडकरांनी या राम व कृष्ण या नायकांबद्दलच प्रश्नचिन्ह निर्माण केले. ते आदर्श नाहीत, ते श्रेष्ठ ठरु शकत नाहीत. ते पूज्यनीय तर अजिबात ठरु शकत नाहीत. आणि अस्पृश्य (शूद्र) आणि अतिअस्पृश्य (अतिशूद्र) अशा बहुजन लोकांमध्ये तर मुळीच आदरणीय होऊ शकत नाहीत. कारण त्यांच्या प्राचीन संस्कृतीला नष्ट करुन त्यांच्यावर नीचत्वाचा शिक्का याच नायकांनी व त्यांच्या पुरोहितांनी रुजविला. हे कृत्य किळसवाणे व मानवताविरोधी आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी रामायण महाभारताच्या आधारानेच त्यांची समीक्षा केली. 'दि. रिडल्स ऑफ राम ॲन्ड कृष्ण' या निबंधात त्यांचे सुंदर विश्लेषण केले आहे.[१०] त्यांची ही टीकादृष्टी आजपर्यंतच्या टीकाकारांपेक्षा अधिक वस्तुनिष्ठ आहे. वाङमय समीक्षेची नवी भर टाकणारी आहे. ब्राह्मणी वेद परंपरेतील मनस्मृती हा ग्रंथ आहे. या ग्रंथातून जसे बहुजनांचे शोषण करण्यास आवाहन करण्यात आले. त्याच प्रमाणे मनुस्मृती एकशोषणाचे तत्त्वज्ञान आहे. म्हणून डॉ. आबंडकरांनी २५

---

१०. तत्रैव - पृष्ठ ३२३

डिसे. १९२७ रोजी महाड येथे मनुस्मृतीला जाहिरपणे जाळले. ब्राह्मणाच्या वर्चस्वासाठीच मनुस्मृतीचाही जन्म झाला आहे. म्हणूनच या ग्रंथाचा डॉ. आंबेडकरांनी आंदोलनातून व लेखनातून सातत्याने जनतेसमोर निषेध केला. दि. २४.९.१९४४ मध्ये मद्रासला आपल्या व्याख्यानातून जे भाष्य केले ते आजही मार्गदर्शक ठरणारे आहे.११

मनुस्मृतीने चातुर्वर्ण्याचे समर्थन केले. शूद्रांच्या शिक्षणावर बंदी घातली. अध्ययन केले तर कानात तप्त लाव्हारस ओतण्याची शिक्षा सांगितली. जिव्हेने उच्चार केला तर जीव्हा कापण्याची शिक्षा ठोठवली असा ग्रंथ वंदनीय ठरु शकत नाही तो ग्रंथ का लिहिला गेला? त्या पाठीमागे बहुजनांचा सर्वनाश घडवून आणण्याचे राजकारण आहे, म्हणून ब्राह्मणी वाङमयात दुष्ट राजकारण अधिक आहे. गीतेवद्दल अनेक अभ्यासकांनी लिहिले व त्यामधील रहस्य उलगडून दाखविले. परंतु ते सगळे वर्णव्यवस्थेला पूरकच ठरले. गीतेत कुणाला कर्मयोग दिसला, कुणाला ज्ञानयोग दिसला, कुणाला भक्तीमार्ग दिसला. परंतु हे सगळे मार्ग प्रस्थापित व्यवस्थेच्या चौकटिला संरक्षण देणारे ठरले. बहुजनाला सत्ता, संपत्ती, अधिकार, सामाजिकन्याय, समता, बंधुभाव गीतेने न सांगता आपापली जातीने, जन्माने दिलेली कामें करीत जगा व मरून जा. दास्य भोगा व आपल्या दुसऱ्या पिढीला हस्तांतरीत करा. अशी ही शिकवणच वर्णव्यवस्थेने दिली व अस्पृश्यांना पंगू केले हा आशय प्रथमच डॉ. आंबेडकरांनी कष्टकऱ्यांच्या

---

११. आंबेडकर बी. आर.– डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड भाग १ संपा. गांजरे मा.फ.नागपूर, पृष्ठ ११९ "राजकारण, समाज, राज्यशासन, धर्म व बुद्धिवादात ज्या क्रांतीची बुद्धाने मुहूर्तमेढ रोवली ती पुढे निष्फळ ठरली. धर्म व राजकारण ह्यांना एकत्र जंपून चातुर्वर्ण्य ही केवळ सामाजिक प्रथा नाही ते एक राजकीय तत्त्वज्ञान आहे असे सिद्ध करण्यासाठी मनुस्मृती लिहिण्यात आली"

१२. आंबेडकर, बी. आर. जातीभेद निर्मूलन, अनु. गांजरे, मा.फ. गपूर १९७० पृष्ठे ४९ "त्रिवर्णिकांकडून शुद्राला कशी वागणूक मिळत होती याचा पुरावा मनुस्मृतीच्या नियमात दिसून येतो. सामाजिक नियमांच्या बाबतीत मनुच्या नियमापेक्षा दुष्ट नियम कोठेही नाहीत. जगाच्या पाठीवरचे सामाजिक अन्यायाचे कोणतेही उदाहरण त्यांच्यासमोर फिक्के पडते. एवढ्या मोठ्या मनुष्य समूहाने सामाजिक अन्यायाच्या या यातना मुकाट्याने का सहन केल्या? जगातील इतर देशात समाजक्रांत्या का घडून आल्या पण भारतात अशी समाजक्रांती का घडून आली नाही हा प्रश्न मला नेहमीच सतावून सोडतो"

प्रगतीसाठी सांगितला. [१२] बुद्धाच्या उदयानंतरच खऱ्या अर्थाने रामायण, महाभारत, गीता, मनुस्मृती पुराण - वाङमय या ब्राह्मणी वाङमयाला महापूर आला.[१३] पुराणे हे अठरा असून ती इ.स. दुसरे ते पंधराशे या काळात जन्मली. नंतर ब्राह्मणवाद अग्रेसर झाला. परंतु ही हुशारी ब्राह्मण लेखकांनी जनतेसमोर येऊ दिली नाही आणि बुद्धाच्या विचाराला नष्ट करण्याचा प्रयत्न केला. बुद्ध धर्म हाच बहुजनांचा शूद्र-अतिशूद्राचा प्राचीन धर्म आहे. आणि ब्राह्मणी धर्म-वैदिकधर्म हा बहुजनाचा शत्रूधर्म आहे. त्या शत्रू भावनेतूनच त्या धर्माने त्यांचे शिक्षण बंद करून अस्पृश्य गुलाम केले. आज खऱ्या इतिहासाला ओळखण्याची गुरूकिल्ली डॉ. आंबेडकरांनी बहुजनाच्या हाती दिली आहे. बुद्धाचे तत्त्वज्ञान व गीतेतील आशयाचे मार्ग स्पष्ट करतांना ते १.९.४४ साली पुणे येथे म्हणाले की, "बुद्ध तत्त्वाने सामाजिक, मानसिक व राजकीय क्रांती करून शुद्रांना उच्चपद प्राप्त करुन दिले. त्या काळी अनेक शुद्र राजे झाल्याचे दाखले आहेत. आपल्या हातातील सत्ता गेल्यामुळे ब्राह्मणांनी पुन्हा चातुर्वर्ण्य पद्धतीचा पाया घालून भगवतगीतेच्याद्वारे ते काम केले व देशाची आपल्या हातून गेलेली सत्ता पुन्हा परत आपल्या हातात आणली." [१४] अशी समीक्षा विविध भाषणातून, लेखनातून प्रगट झाली आहे.

शूद्रपूर्वी कोण होते? आणि अस्पृश्य मुळचे कोण? हे दोन्ही ग्रंथ आधुनिक भारतातील शुद्र-अतिशुद्रांचे प्राचीन भारतीय जीवन मांडणारे आहेत. समाज-संस्कृतीचे ऐतिहासीक विश्लेषण या ग्रंथांत आढळते. या ग्रंथांची भारतीय पातळीवरील जी व्यापक चर्चा व्हावयास पाहिजे ती अजूनही झाली नाही. युरोप मध्ये फ्रेंच राज्य क्रांतीच्या वेळेस जसे रुसो, व्हॉल्टेअर यांच्या ग्रंथाचे मार्गदर्शन क्रांतिकारकांना जरूरीचे भासले. तसेच मार्गदर्शन परिवर्तनाच्या लढ्यात भारतीय आंदोलकांना भासावे एवढे सामर्थ्य आंबेडकरांच्या ग्रंथात आढळते.

---

१३. Ambedkar B.R. Writing and speeches, Bombay, 1987 Vol. 3 Page 25 This short survey is enough to remove any doubt as to the age of the Literature that it is Post-Buddistic"

१४. आंबेडकर बी. आर., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १, संपा. गांजरे मा.फ. नागपूर, १९६८, पृष्ठे १२१.

डॉ. आंबेडकरांनी प्राचीन वेद व ब्राह्मणी वाङमयावर प्रखर टीका केली. या त्याच्या विचारामागे समाजात प्रबोधन व्हावे आणि साहित्य चिंतनातही परिवर्तन यावे ही भूमिका आहे. आजही भारतीय पारंपरिक साहित्यसमीक्षा व तत्त्वज्ञानाचे चिंतन ब्राह्मणवादावरच जगते आहे. थोडीफार हवापालट होण्यासाठी पाश्चात्य साहित्याची व तत्त्वज्ञानाची मदत घेतात. शेक्सपिअर, रसेल, डेकार्ट, बेंकन, कांट, सार्त्र, मार्क्स, हेगेल, शेले, त्यांच्या प्रदेशातून फिरून येते. आणि वेद, गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी याचा अर्क कथा कवितेत मांडते. त्यामुळे ब्राह्मणी धर्म ग्रंथाचे निरर्थक पावित्र्य पुन्हा पुन्हा रुजत राहते. विकासाचा हा धोका नष्ट झाला पाहिजे. नवे ज्ञान रुजले पाहिजे. बहुजन समाजातील स्त्री-पुरूष थोर ठरले पाहिजे. या हेतूनेच डॉ. आंबेडकरांनी ब्राह्मणी वाङमयाची समीक्षा केली आणि एक नवा प्रकाश मार्ग दिला.

प्राचीन वैदिक व ब्राह्मणी साहित्याच्या बाबतीत डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट भूमिका का घेतली? कारण त्या साहित्याची प्रकृतीच वर्णवादाची आहे. त्या साहित्याचा हेतूच बहुजनाला नीचत्व देण्याचा आहे.[१५] वर्णव्यवस्थेच्या तत्त्वासाठीच त्यांचा जन्म झाला आहे, तोच त्यांचा मुख्य उद्देश आहे. आणि अस्पृश्य व अतिशूद्र अस्पृश्य यांनी ते दास्य पिढ्यान पिढ्य भोगले आहे.. म्हणून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या विरोधात महान आंदोलन उभे केले. आणि राष्ट्राला नाशापासून वाचविण्याचा श्रेष्ठ प्रयत्न डॉ. आंबेडकरांनी केला.

---

१५. आंबेडकर बी.आर., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड नववा, ले. चां. भ. खैरमोडे, मुंबई, १९८७, पृष्ठ ३९३ "ब्राह्मणांनी हे पाच सहा हजार वर्षांपूर्वी ओळखले म्हणून ब्राह्मण लोक आपली जात सर्व हिंदू समाजाच्या डोक्यावर मिऱ्या वाटणारी कशी करता येईल. या बद्दल विचार करीत होते. त्यासाठी त्यांनी वेदांत चातुर्वर्ण्याची उत्पत्ती केली. समाजाचा प्रमुख, देवळाचा प्रमुख, गावाचा प्रमुख ब्राह्मण असला पाहिजे. ब्राह्मणाला सर्व जातीच्या बायका करता याव्यात. त्याला आपला मुख्य प्रधान, पुरोहित, सेनानी, राजाचे करावे वगैरे नियम मनु व इतर धर्मशास्त्रकार यांनी आपापल्या स्मृतीग्रंथात तयार करुन ते हिंदू समाजाच्या बोकांडी मारले. ब्राह्मणांचे हे श्रेष्ठत्व हाणून पाण्यासाठी ब्राह्मणेत्तरांनी वैदिक काळात व नंतर एकंदर सात मोठे झगडे केले. ब्राह्मण मूठभर व ब्राह्मणेत्तर लाखांनी मांडता येतील असे असता या झगड्यात ब्राह्मणेतरांना हार खावी लागली. कारण ब्राह्मणेत्तर लोक हे ब्राह्मणी जातीभेदाच्या विषाने मानवी सद्गुणांना मुकलेले होते" - (कोकानाडा येथील भाषण)

ते म्हणतात, " हे कार्य हाती घेण्याचा माझा हेतू एवढाच आहे की पवित्र धर्म ग्रंथात जे आदेश व जे नीतिनियम सांगण्यात आले आहेत ते नियम हिंदूच्या, देशाच्या व समाजाच्या ऱ्हासाला आणि अधःपाताला कारणीभूत झालेले आहेत." १६

वैदिक व ब्राह्मणी साहित्याच्या संदर्भात जी चुकीची धारणा भारतीय जनतेच्या मनात आहे ती काढून टाकण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आपला विचार मांडला. वेद हे श्रेष्ठ नसून कनिष्ठ प्रतिचे साहित्य आहे. हे खरे तत्त्व समाजात व अभ्यासात रुजावे म्हणून त्यांनी नवी समीक्षा दिली. गीता, महाभारत, रामायण, हे धर्म ग्रंथ नसून आर्य ब्राह्मणाचे वर्चस्व स्थापन करण्यासाठी रचलेले राजकीय ग्रंथ आहेत.

हे नवे विश्लेशण त्यांनी आपल्या लेखणीतून प्रस्थापित केले. वेद हे ईश्वरनिर्मित नसून धुर्त आणि क्रूर कवी ब्राह्मणांनी रचलेले आहेत. हे अभ्यासकांनी नव्याने शिकवावे अशी दृष्टी त्यांच्या विचारात आहे, ऋषी हे आर्य राज्यकर्त्यांची एक मदतनीस फौज होती. ते ऋचा, प्रार्थना लिहून मुळ भारतीय लोकांच्या कत्तली करण्यास प्रेरणा देत होते हे ओळखण्याची प्रामाणिकता अभ्यासकात आली पाहिजे हे सूत्र त्यांच्या लेखनात आहे. बुद्धोत्तर काळात रामायण, महाभारत, गीता, मनुस्मृती, पुराणे लिहिली गेली हे त्यांनी रिडल्स इन हिन्दुइझम व फिलॉसॉफी ऑफ हिन्दुइझम या ग्रंथातून सांगून नविन विचाराची दिशा दिली. बुद्धाचा 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या सिद्धांताला मारण्यासठी पुराण वाङमयाचा जन्म झाला. त्यामधील विचार नव्याने बहुजनावर लादण्यासाठी व ब्राह्मणाचे पोट भरण्यासाठी साहित्य उदयास आले.१७ ही नवी विश्लेषणदृष्टी डॉ. आवेडकरांनी रूजविली. प्राचीन ब्राह्मण ऋषी, कवी, लेखक आणि

---

१६. आंबेडकर बी.आर. शूद्र पूर्वी कोण होते अनुवाद - खैरमोडे चां.भ. नागपूर, पृष्ठ १५

१७. बी. आर. आंबेडकर, रानडे गांधी आणि जीना. अनु. मा.फ. गांजरे नागपूर, पृष्ठ २४ "ब्राह्मण पद्धतशीरपणे समाजावर चरत होता. व धर्मकारणातून नफा उकळीत होता. त्याने टनावारी निर्माण केलेली पुराणे आणि शास्त्रे हे त्यांच्या मूल्यवान हत्यारांचे कोठार असून त्या द्वारेच तो अडाणी धर्मभोळ्या व सामान्य लोकांना मुर्ख बनवीत होता, फसवीत होता. आणि लुबाडत होता."

आधुनिक ब्राह्मण कवी, कथाकार, निबंधकार, यांनी वेदाचे का समर्थन केले? ब्राह्मणी साहित्याला का पवित्र म्हटले? राष्ट्रीय नेत्यांनीही पुन्हा पुन्हा वेद-गीता या ग्रंथाचा का गौरव केला? या प्रश्नाचे उत्तर ब्राह्मणवादाला घट्ट करणे व बहुजन समाजाच्या विचारशक्तीला जुन्या विचाराच्या बेड्या ठोकणे हे होय. या सगळ्या ब्राह्मणवादाच्या उगमाशी शूद्र-अतिशुद्राला जे जुने दुय्यम नागरिकत्व दिले ते जोपासणे होय. त्यांना अधिकार, हक्क प्राप्त न होऊ देता प्राचीन ग्रंथांची जशी त्यांची दिशाभूल करुन त्यांच्या अंगावरून दास्यांची शतके रावविली ती कायम स्वरुपात जोपासणे होय. शोषणाधिष्ठीत विचाराला आधुनिक कला स्पशनि नवीन शोषणाच्या रुपात रुजविणे होय. हेच ध्येय स्वतंत्र भारतात ब्राह्मणी कलासृष्टीने व प्रस्थापित व्यवस्थेने स्वीकारले. या सगळ्या ऐतिहासिक व सांस्कृतिक चतुरतेला डॉ. आंबेडकरांनी ओळखले. आणि शूद्र-अतिशूद्र असलेल्या ऐंशी टक्के बहुजन समाजाला न्याय मिळण्यासाठी ब्राह्मणी वाङमयाची मीमांसा केली. समता, स्वातंत्र्य व बंधुत्व हे मूल्य भारतीय समाजात रुजावे म्हणून जुन्या पारंपरिक वळणाची ब्राह्मणी विश्लेषणपद्धती मानव्य शास्त्रातील अभ्यासकांनी नाकारावी ही शिकवण दिली. अभ्यासकांच्या चेतनेत व जनतेच्या विचार करण्याच्या पद्धतीत भारतीय समाजाच्या विकासाचे भान राहावे म्हणून नवी वैचारिक दृष्टी दिली. या त्याच्या विचारात भारतीय प्रबोधनाचा क्रांतिकारी ध्येयवाद आहे. म्हणून त्याचे प्राचीन वैदिक ब्राह्मणी वाङमयीन चिंतन म्हणजे बहुजनांच्या जीवनाचे व कलासृष्टीचे बदलणारे मापदंड ठरले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळातील कला साहित्याला नवे युगप्रवर्तक वळण देणारे प्रचंड प्रेरक शक्तिची बीजे त्यामध्ये आहेत. आणि त्याची ही प्राचीन साहित्य समीक्षा व्यक्ती-समाजाच्या मनात रुजणे हीच भारताची खरी ऐतिहासिक गरज आहे.

♠ ♠ ♠

२

डॉ. आंबेडकरांचा मध्ययुगीन संत साहित्य विषयक विचार

भारतीय समाज, संस्कृती, धर्म, इतिहास, साहित्य, कायदा, राजकारण, अर्थकारण इत्यादींच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी मूलभूत व युगप्रवर्तक विचार मांडला आहे. अव्वल इंग्रजी कालखंडानंतर निर्माण झालेल्या नवमूल्यमापनाच्या चिंतनापेक्षा हा विचार आमूलाग्र परिवर्तननिष्ठ आहे. लोकहितवादी, फुले यांच्या चळवळीला क्रांतिकारी चेतनेने त्यांनी गतिमान केले. तत्त्वज्ञान आणि आंदोलन यांच्या माध्यमातून भारतात नव सांस्कृतिक समाजरचनेला जन्म दिला. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर भारतात त्यांचे कार्य व व्यक्तिमत्व उजळून निघत आहे. अशा या युगप्रवर्तक प्रतिभेने मध्ययुगीन संत साहित्याची परखड समीक्षा केली आहे.

कोणतेही साहित्य समाज, मानवी जीवन, धर्मसंस्कार, उद्देश, प्रयोजन, यांच्यापासून भिन्न नसते. संत साहित्याने सुद्धा ब्राह्मणी धर्माचे तत्त्वज्ञान व वर्ण व्यवस्थेतील शोषणमूल्य सांगितले आहे. भक्ती, ईश्वर, व परलोकसापेक्ष असाच विचार साहित्यातून प्रमुख होऊन मांडला आहे. संतांनी आपले जीवन व

साहित्य प्रामुख्याने परमार्थ विचाराच्या निर्मितीतच घालविले. 'मोक्षप्राप्ती हेच मानवी जीवनाचे ध्येय' असे संत साहित्य सांगते. कर्मविपाक, पुनर्जन्म, मोक्ष, ईश्वर, भक्तीचे आणि वर्णव्यवस्थेचे समर्थन करते. त्यामुळे समाजजीवनावर वाईट परिणाम झाले. शुद्र, अतिशुद्र, व स्त्रीया यांची गुलामगिरी अधिक दृढमूल झाली. वर्णव्यवस्थेचा व अस्पृश्यतेचा विचार जसा चोखामेळा दास्य म्हणून भोगत होता. "ऊस डोंगापरी रस नव्हे डोंगा काय भुललासी वरलिया रंगा" म्हणत म्हणत सांगत होता. आणि अखेरपर्यंत तो मंदिरात जावू शकला नाही तोच अन्याय आंबेडकरकालीन समाजापर्यंत अस्पृश्य पंढरपूरच्या दिंडीत भोगत होते. आणि आजही कष्टक-याला (अस्पृश्याला) खेड्यातील जीवनात समता मिळत नाही. अशा या विचार आणि आचार यांच्या पार्श्वभूमीवर संत साहित्याच्या अभ्यासकाळात दोन तट निर्माण झाले. संत साहित्याचा एक समीक्षकांचा वर्ग संतानी वर्णवादी समाजाचे उन्नयन केले असे म्हणू लागला. दुसरा संतांनी 'देश

वुडविला' असे म्हणू लागला वि. का. राजवाडे, डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी देशहिताच्या दृष्टीने सतं व सतंसाहित्यावर टीका केली. आणि दुसरा प्रवाह ब्राम्हणी धर्माचे वर्णविषमतेचे तत्त्वज्ञान सांगितले म्हणून संतांना गौरवू लागला. परंतु अंतिमतः हे दोनही संत साहित्याच्या टीकेचे प्रवाह वेद गीता रामयण - महाभारत या ग्रंथातील वर्णव्यवस्थेच्या तत्त्वज्ञानाला शरण गेले. परलोकवादी संतांच्या दृष्टीवर राष्ट्रहिताच्या दृष्टीने टीका करता करता गीतादीने शिकविलेल्या ब्राह्मण वर्चस्ववादालाच गौरवू लागले. अशी ही संत साहित्याची समीक्षा एक समर्थक व दुसरा विरोधक अशा दोन दृष्टींनी साकार झाली. परंतु हे दोनही टीकाप्रवाह जातीसंस्थेचे, वर्णश्रेष्ठत्वाचे समर्थन करणा-या गीता, रामायण महाभारताने शिकविलेल्या शुद्र, अतिशुद्र व स्त्रीया यांचा अपमान करणा-या ग्रंथाचे तत्वज्ञानच शिरसावंद्य मानणारे ठरले.[१]. डॉ. आंबेडकरांचा संत साहित्य विषयक विचार जसे संत साहित्य नाकारते, तसेच वेद, गीता, रामायण,

---

१. पु. ग. सहस्त्रबुद्धे, माझे चिंतन, पुणे, आवृत्ती तिसरी १९७३, पृष्ठ - ९०

महाभारत इत्यादी ब्राह्मणी ग्रंथही नाकारते.[२]. राम व कृष्ण या नायकावर सुद्धा पा रेक दृष्टी पेक्षा नवा प्रकाश टाकतात. आणि त्या ग्रंथांनी केलेल्या शोषणाची मीमांसा करतात.[३]. त्यामुळे त्यांच्या साहित्य समीक्षेत संत साहित्याविषयी दृष्टी व वेद गीतादी पुराण वाङ्मयाविषयी दृष्टी एकच साकार झालेनी आहे. प्राचीन व मध्ययुगीन साहित्यातील वर्णव्यवस्थेच्या जाणिवेमुळे नकाराची भूमिका साकार झाली आहे. आणि त्याचे हे चितंन कष्टक-यांच्या समाज जीवनाला व मराठी समीक्षेला नवे वळण देणारे आहे.

डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनाने व वैचारिक चिंतनाने समाज जीवनात एक नवे परिवर्तन आले. चौदा आक्टोबर एकोणविसशे छप्पनचा धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणजे भारतीय जनतेचा नवा सामाजिक सांस्कृतिक दिवस ठरला आहे. त्यामुळे येथील साहित्याकडे ऐतिहासीक दृष्टीकोनातून पाहण्याची एक विश्लेषणपद्धती समाजात रुजली. लेखक-विचारवंतांच्या व लोकांच्या जीवनात नवी मानवतावादी मूल्यजाणीव कार्यरत झाली. आणि त्या जाणिवेने आंबेडकरवादी नवे प्रचंड साहित्य जन्मास घातले[४]. या सर्जनशील निर्मितीच्या पाठीमागे आंबेडकरांची समीक्षदृष्टी होती. त्यांच्या या आंदोलनामुळे व क्रांतीकारी विचारामुळे संत व संत साहित्याची नव्याने मीमांसा सुरु झाली. संत व सतंसाहित्याने विषमतेला कसे खतपाणी घातले? या प्रश्नाचे मोठे मार्मिक उत्तर

---

२ B.R. Ambedkar Dr. B.R.Ambedkar writing and speeches Vol. 3 Philosophy of Hinduism, Bombay, 1987.

३. B.R.Ambedkar Dr. B.R. Ambedkar Writing and speeches Vol. 4, Riddles in Hinduism, Bombay,1987.

४. आंबेडकर प्रेरणेतून दलित साहित्य चळवळ उदयास आली. प्रचंड संख्येने साहित्य व लेखकांचा वर्ग आंबेडकरवादी जाणिवांनी लेंखन करतो. मराठी, हिन्दी, गुजराथी, कन्नड इत्यादी प्रादेशिक भाषेतून आंबेडकरवादी साहित्य लिहिले जात आहे.

आंबेडकरांच्या मीमांसेला धरूनच प्रभाकर वैद्य यांनीही दिले आहे[५].

संत साहित्याचा उदय हा बहुजन समाजाला गीतादी रामायण महाभारत या ग्रंथातील ज्ञान शिकविण्यासाठी झाला; हे ब्राह्मणी मत ऐतिहासीक दृष्टया बरोबर नाही. मुसलमान राजवटीमुळे जुना ब्राह्मणी व्यवस्थेचा संरक्षक राजा नष्ट झाला. जमिनदार, सरदार बदलला. महाभारत, रामायण इत्यादी कथा ऐकणारा सामंतांचा वर्ग नाहिसा झाला. ब्राह्मणाचे उपजिविकेचे साधन नष्ट झाले. त्यामुळे त्यांनी आपला मोर्चा बहुजन समाजकडे वळविला. आणि त्यांना भागवत, पांडवप्रताप, रामायण, पुराणें सांगून त्यांच्याकडून पुरोहितांचा वर्ग, गहू, तांदूळ, पैसा घेऊ लागला. आपली उपजिविका करु लागला. या प्रेरणेतून बहुजनाला शुद्राला भक्ति आंदोलनात सामावून घेतले. मुसलमान धर्मात जे शुद्र अतिशूद्र थोडे चांगले जीवन प्राप्त करुन घेत होते, त्यांना रोखले. आणि वर्णव्यवस्थेला मजबूत केले.

शुद्र अतिशुद्रांच्या जीवनात जेव्हा जेव्हा नवे परिवर्तन आले. तेव्हा तेव्हा संत साहित्याच्या टीकाकारांनी त्या परिवर्तनाबद्दल नापसंती व्यक्त केली इतका तिरस्कार आजही ब्राह्मण लेखकांच्या लेखनात वाचावयास मिळतो. आणि संतांनी मुसलमान धर्माचे आक्रमण व होणारे शुद्र अतिशुद्राचे धर्मांतर रोखले म्हणून गौरविले जाते. खरेतर उच्चवर्णिय जे जन्माने सुखात होते, अपमानित होत नव्हते. त्यांनी मुसलमान धर्म स्वीकारला त्याबद्दल संत साहित्याचे टीकाकार बोलत नाहीत. त्यांनी आपल्या कामात व वर्तणुकीत बदल केला तरी 'धर्म बुडला' म्हणत नाहीत. परंतु शुद्र अतिशुद्राबद्दल मात्र द्वेष पेरतात. अकबराला

---

५. प्रभाकर वैद्य, संतानी सुद्धा वाळीत टाकलेला श्रेष्ठ संत चक्रधर, मुंबई, १९७५, पृष्ठ ५६" संतानी वाळवंटांमध्ये जी आध्याधिक लोकशाही प्रस्थापित केली म्हणतात तिने खरोखर सामाजिक समतेचा लढा पुढे नेण्याऐवजी चातुर्वर्ण्याची अन्याय विषमप्रथा जन्मजात जातिभेद आणि व्यवसायबद्ध अस्पृश्यता ही अधिकच मजबूत केली. तिला निर्माण करणाऱ्या ब्राह्मणी नेतृत्वाची प्रतिष्ठा या अध्यात्मिक लोकशाहीवाल्यांनी भागवत धर्माच्या नावाने अधिकच उजळली"

मानसिंगाने उच्च हिन्दू राजपूताने आपली बहिण जोधाबाई दिली. अल्लाउद्दीन खिलजीच्या राज्याचा विस्तार करणारा मुळचा राजपूत हिन्दू होता. फिरोज तघलकचा वजीर मुक्बलखान हा तेलगंणीय उच्चवर्णिय हिन्दू होता. अहमदनगरची निजामशाही स्थापन करणारा निजामुल्मुल्क बाहरी आणि त्याचा मुलगा अहंमद निजामशाहा हे दोघे पितापुत्र मुळचे ब्राह्मण होते. इमादशाहीचा संस्थापक फत्ते उल्ला इमादशाह हा मुळचा विजयनगरचा तेलंगी ब्राह्मण होता. जहांगिरचा सेनापती महोबतखान हा मूळचा राजपूत होता. एकनाथ महाराजाचे गुरु जनार्दनस्वामी मुसलमानाच्या घरी दौलताबादच्या किल्यात चाकरी करीत होते. शिवाजीवर वार करणारा बाळाजी कृष्णाजी कुळकर्णी हा ब्राह्मण अफझालखानाची चाकरी करीत होता. उच्यवर्णिय पूर्विच्या वैभवात भर टाकण्यासाठी मुसलमान झाले. परंतु शुद्र अतिशुद्र त्यांना मुसलमान झाल्याने हक्काने फक्त पाणी मिळाले होते. रस्त्याने माणूस म्हणून चालण्याची संधी मिळली होती. ही प्राथमिक गरज शुद्र अतिशुद्र धर्मांतराने पूर्ण करीत होते. तर त्यांना संत रोखून घरत होते. भक्ति शिकवून वर्णव्यवस्थेच्या गुलामगिरित डांबून टाकत होते. हेमाद्री पंडितांचीच व्रत वैकल्याची गुलामगिरी संत थोड्या वेगळ्या भाषेत, भक्तिच्या साधनांनी घट्ट करीत होते. म्हणून संत साहित्य आणि हेमाद्री पंडित ब्राह्मण पुरोहितांचे वतवैकल्य विचार हे दोनही एकाच ब्राह्मणवादी नाण्याच्या दोन बाजू आहेत. अशा या संत साहित्याला व संतांना बंडखोर ठरविता येत नाही. त्यांच्या शिकवणुकीला चांगलेही म्हणता येत नाही. डॉ. आंबेडकर म्हणतात "साधुसंताची शिकवण" केवळ विद्वानांच्या शिकवणुकीपेक्षा कितीही भिन्न आणि उत्कर्षकारी असली तरी सुद्धा शोकजनक रीतीने ती अपयशी ठरली हे कोणालाही मान्य करावेच लागेल. दोन कारणासाठी ही शिकवण निष्फळ ठरली. पहिले म्हणजे कोणत्याही संताने जाती पद्धतीवर हल्ला केलेला नाही. तर, या विरुद्ध ते जातिभेदावर पूर्ण विश्वास ठेवणारे होते. त्यांच्या पैकी बहुतेक संत ज्या जातीचे होते त्याच जातीत जगले व मेले. ज्ञानेश्वराला आपल्या जातिला चिकटून राहण्याचा एवढा मोह होता की पैठणच्या ब्राह्मणांनी त्यांना आपल्या जातीत

घेण्याचे नाकारले तेव्हा ब्राह्मण समाजाने आपला त्यांच्या जातीत समावेश करुन घ्यावा म्हणून त्यांनी आकाश पाताळ एक केले. धर्मात्मा नावाच्या सिनेमामध्ये अस्पृश्याच्या मुलाला स्पर्श करण्यासाठी व अस्पृश्यासोबत जेवण करण्यासाठी धैर्य दाखविले म्हणून एकनाथाला हिरो म्हणून दाखविलेले आहे, पण या संत एकनाथाने सुद्धा असे कां केले याचे कारण तो जातीभेदाच्या व अस्पृश्यतेच्या विरोधी होता असे नव्हे तर अस्पृश्याला स्पर्श केल्यामुळे झालेला विटाळ गंगेच्या पाण्याने स्नान केल्यानंतर निघून जातो असे त्याला वाटत होते" [६] (अंत्यजाचा विटाळ ज्याशी । गंगास्नाने शुद्धि त्याशी एकनाथी भागवत अ. २८ ओवी १९१) असे हे संत व सतं साहित्य जातीवाद व वर्णव्यवस्था यांच्या माध्यमातून ब्राह्मण वर्चस्वालाच समाजात रुजवत होते. युगायुगापासून चालत आलेला ब्राह्मणी धर्म शिकवित होते. म्हणून संत साहित्य हे ब्राह्मणी धर्माचे म्हणजेच हिन्दु शोषणाचे एक अंग म्हणूनच प्रकट झालेले साहित्य आहे. आणि या विचारामुळेच अस्पृश्यता हजारो वर्षे लोकांना दास्याच्या रुपाने जगावी लागली आहे. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेचे शोषण नष्ट करणारे आंदोलन चालविले. आणि अस्पृश्यतेचा उगम असलेले ब्राह्मणी ग्रंथ व त्याचे उपप्रवाह नाकारले. मानवतावादी जीवनमूल्य रुजविण्यासाठी व बहुजनाच्या हितासाठी निर्भिडपणे संतसाहित्याचे, गीतादी ग्रंथांचे अंतरंग उलगडून दाखविले.

संत साहित्याला जी ऐतिहासीक पार्श्वभूमी लाभली ती स्थानिक ब्राह्मणी समाजरचना कायम स्वरुपात टिकवावी, शुद्र अतिशुद्र यांनी जन्माने दिलेली गावगाड्यातील व शेतमळ्यातील गुलामीच जगावी. ती मुसलमान राजवटीने तोडू नये मोडू नये, अशी संघर्षाचीच पार्श्वभूमी मिळाली आहे. अशिच पार्श्वभूमी वैदिक ब्राह्मणी वाङ्मयाला स्थानिक सिंधु लोकांची वर्णविरोधी विचारसरणी व परकीय आर्यांची वर्णव्यवस्थेचे समर्थन असलेली विचारसरणी लाभली आहे. म्हणूनच ऋग्वेदामध्ये दास, दस्यू, पणी या भारतीय लोकांच्या नाशाच्या ऋचा

---

६. B.R.Ambedkar,Annuhildsation of caste, जातिभेद निर्मूलन, अनु. मा.फ. गांजरे, नागपूर, १९७०, पृष्ठे ९८.

ब्राह्मण ऋषी कविंनी रचल्या. या ऋचांचे साहित्य म्हणजे भारतीय मूळ लोकांच्या नाशाचा प्रार्थना आहेत दुष्टतेचा आर्य आविष्कार म्हणजे या वैदिक ऋचा आहेत. या प्राचीन संघर्षाचे विश्लेषण राहूल सांकृत्यायन[७]. प्र. रा. देशमुख[८]. यांनी केलेले आहे. गीता, रामायण, महाभारत व पुराण वाङमय या ब्राह्मणी ग्रंथ निर्मितीलाही बुद्धाच्या विचारप्रणालीचीच पार्श्वभूमी लाभली आहे. या ब्राह्मणी पुराण ग्रंथांचा विकासही बुद्धोत्तर काळातच झाला. या ग्रंथांनिही वर्णव्यवस्था मजवूत करण्यातच आपले वाङ्मयीन कार्य केले. बहुजनाला भूलथापा व थोतांड सांगून गूढवादी कथात्मकता शिकवून लोकांच्या मनात संग्राम निर्माण केला. नियतीवाद शिकवून जन्माने मिळालेली कामे करावयास लावले. त्या कामालाच कर्मवाद शिकवून कर्मवाद म्हणून शूद्र अतिशूद्राची गुलामगिरी मजबूत केली. "बुद्धाच्या समतेविरुद्ध उपाय योजना असावी म्हणूनच श्रीकृष्णाने गीतेत 'गुणकर्म विभागशः' अशी चार वर्णाची तरफदारी केली असल्याचे दिसून येते. अशी तरफदारी करुन चार वर्णाची तळी उचलून धरण्यासाठीच गीतेचा जन्म आहे असे मानावयास मुळीच हरकरत नाही. प्रत्येक व्यक्तिमात्राच्या जन्मजात गुणकर्मानुसार परमेश्वरानेच खास चार वर्ण निर्माण केले आहेत असे गीता ठासून सांगते. चार वर्णाची तरफदारी करण्याचा हा नवा युक्तिवाद असून तो जुन्या युक्तिवादाहून भिन्न असाच आहे. चार वर्ण वैदिक असून ते वेदाप्रमाणे अपौरुषेय असल्यामुळे अनुत्लंघनीयही आहेत असा जुना युक्तिवाद होता पण वेदांचा अपौरुषतेवरच बुद्धाने हल्ला चढविल्यामुळे हा जुना युक्तिवाद तोकडा पडू लागल्यामुळे हिन्दू लोकांना नव्या युक्तिवादाचा आश्रय शोधावा लागला."[९]. तेराव्या शतकातही मुसलमान संस्कृतिच्या संघर्षाने व राजसत्तेच्या आक्रमणाने ब्राह्मणी धर्म कोसळू लागला. उच्चवर्णिय व शुद्र अतिशुद्र सर्रास धर्मांतरं करु लागली. त्या

---

७. राहूल सांकृत्यायन ऋग्वेदिक आर्य, इलाहबाद तथा दिल्ली १९५७

८. प्र.रा.देशमुख, सिंधुसंस्कृती, ऋग्वेद व हिंदुसंस्कृती, वाई, १९६६

९. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ६, संपा. मा.फ.गांजरे, नागपूर, द्वितीय आवृत्ती १९८२ पृष्ठे २८

आक्रमणाला रोखण्यासाठीच ज्ञानेश्वराने गीता हा वर्णव्यवस्थेचा ग्रंथ निवडला. आणि ब्राह्मण श्रेष्ठत्वाचे अमानवी तत्त्वज्ञान ते श्रोत्यांना सांगू लागले. शुद्र अतिशुद्र याचा अपमान करणा-या ओव्या लिहू लागले. पंधराव्या अध्यायातील ओवी एकशे अडुसष्ट, सोळाव्या अध्यायातील पंधरा, एकशेतीन, एकशे बेचाळीस, एकशे पंच्याहत्तर सतराव्या अध्यायातील एकावन्न, बावन्न, एकशेसहा दोनशे अठ्ठावन इत्यादी अनेक ओव्या बहुजनाच्या तिरस्काराने भरलेल्या आहेत. वर्णव्यवस्थेचे समर्थन करणा-या आहेत. अठराव्या अध्यायात तर वरिष्ठ ब्राह्मणादी वर्णाची सेवा करणे हे शुद्राचे कुणबी, माळी, तेली इत्यादींचे स्वभावजन्य कर्म आहे असे ज्ञानेश्वर शिकवतात. आपल्या आवडत्या श्रोत्यांना ब्राह्मणवाद रावविण्याचे शिक्षण देतात. हेमाद्री पंडित व्रतवैकल्यांच्या माध्यमातून ब्राह्मणवाद जगवतात. ज्ञानेश्वर गीतेच्या माध्यमातून ब्राह्मणवाद सांगतात. बदलत्या परिस्थितीत वेगळे हत्यार ज्ञानेश्वर व वारकरी संप्रदाय वापरतात व संत साहित्य निर्मितीतून प्रत्येक जातीतून एक एक संत उभा करतात. त्यानी आपापल्या जातीला वर्णव्यवस्था ब्राह्मणवाद शिकवण्याची प्रेरणा देतात. हे सगळे कृत्य ईश्वर कृष्णाच्या माध्यमातून शिकवतात. ब्राह्मणश्रेष्ठत्व कृष्णदेवाने गीतेत सांगितले म्हणून बहुजनांच्या मेंदूवर थोपतात. अशा या विषमतेची शिकवणूक देणा-या ग्रंथा बद्दल आंबेडकर म्हणतात "हिन्दु म्हणतात भगवद्गीता हा फार पवित्र ग्रंथ आहे मला या ग्रंथाबद्दल आदर नाही. याचे कारण की जी तत्वे व सत्ये तर्काला पटणार नाही अशा तत्त्वांना व सत्यांना गीतेने तत्त्वज्ञानाची आ भरणे घालून लोकांची दिशाभूल केली. त्यामुळे लोकांना बुद्धाने सुरु केलेली धार्मिक सामाजिक राजकीय राज्यकारभार विषयक आणि तर्कवादविषयक क्रांती समजली नाही व म्हणून त्यांनी तिला पाठिंबा दिला नाही"[१०]. या त्यांच्या चिंतनामागे बहुजनाला, शुद्र, अतिशुद्र व स्त्रीया यांच्यावर सामाजिक धार्मिक गुलामगिरी लादू नये. त्यांनाही मानवी जीवनाचे चांगले जीवन जगण्याचा हक्क आहे. त्यांचे स्वातंत्र्यही त्यांना भोगू द्यावे. त्यांनाही साहित्यकला यांचा आस्वाद

---

१०. चां.भ.खैरमोडे, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, चरित्र खंड ९, मुंबई १९८७, पृष्ठे ३७७

घेता आला पाहिजे म्हणून ब्राह्मणी वर्णव्यवस्थेची शुद्रावरील बंधनं नष्ट करण्यासाठी गीतेचं खोट वर्णव्यवस्थेचे पावित्र्य नष्ट केले पाहीजे. आणि मुक्तपणे प्रत्येकाला मानवी जीवनाला आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टया जगता आले पाहिजे. म्हणून परंपरेनी खोटयाला चिकटवलेली चांगली दृष्टी नाकारावयाचे बळ डॉ. आंबेडकरांची साहित्य समीक्षा देते.

गीतेने ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व व शुद्र अतिशुद्राला कनिष्ठत्व देऊन विषमतावादी तत्त्व समाजरचनेला दिले. अशा गीतेचा भारतीय मार्क्सवादी, समाजवादी, गांधीवादी गौरव करतात म्हणून ते खऱ्या अर्थाने बहुजनाला विकासाची व न्यायाची दृष्टी देऊ शकले नाहीत. बहुजनावर भारताचा दुय्यम नागरिकत्वाचा संस्कार असे हे ब्राह्मणीग्रंथ कुटुंबातच करतात म्हणून शुद्र अतिशुद्राने गीतादी ग्रंथाची शिकवण नाकारावयाची गरज आहे. त्याचप्रमाणे सत साहित्याची शिकवणही नाकारावयाची गरज आहे. आजही पंढरपूरच्या यात्रेत, कुंभमेळ्याच्या यात्रेत लाखो कष्टकरी जनता त्या थोतांडात सामील होते आहे. हेमाद्री पंडितांनी तीर्थक्षेत्र, देवस्थानं यांचे माहात्म्य वाढविले आणि पुरोहितांची जगण्याची विनाकष्टाची सोय केली. ज्ञानेश्वर व वारक-यांनी पंढरपूर, देहू, आळंदी या तीर्थक्षेत्रांचा महिमा वाढविला आणि पुरोहीत पंडे यांना लाखो रुपयाचे उत्पन्न यात्रांच्या माध्यमातून मिळवून दिले. त्यामुळे कष्टक-याच्या जीवनात भक्तिने काहीही बदल झाला नाही. ही वस्तुस्थिती डॉ. आंबेडकरांनी भारतीय श्रम करणा-या जनतेसमोर ठेवली . संत साहित्याचे आजचे टीकाकार आपल्या मुलांना इग्लंड, अमेरिका, उच्च पदस्थ नोक-यांची स्वप्नं शिकवतात आणि भोळ्या अडाणी जनतेला पंढरपूर, आळंदीचे महत्व सांगतात. संतांचे व त्यांच्या साहित्याचे श्रेष्ठत्व प्रतिपादन करतात. स्वतः पाश्यात्य विद्या विभूषीत होणारे ज्ञान ग्राह्य करुन भौतिकवादी जीवन जगतात. ही ब्राह्मण विद्वानांची ज्ञानाची दोन मापं डॉ. आंबेडकरांनी ओळखली आणि अशा दुटप्पी धोरणापासून सावंध होण्याचा जनतेला इशारा दिला. "आपल्या लोकांत देवभोळेपणा फारच शिरला आहे. जो तो उठला सुटला पंढरी पैठण आळंदीला जातो. मला आपणाला हे विचारावयाचे

आहे पंढरी पैठण आळंदीला जाऊन आपण काय मिळविले आहे? पंढरी ला जाऊन कोणाचे भले झाले आहे काय? किंवा आळंदीला जाऊन कोणाचा उद्धार झाला काय?[११]. आजही संत साहित्याचे अभ्यासक संताचा विचार प्रसार आणि प्रचार बहूजनात करण्यात गर्क झाले आहेत. संत विद्यापीठ निर्माण करुन बहुजनाला कायमचे ईश्वरभक्तित मग्न करण्याच्या कार्याला लागले आहेत. डॉ. आंबेडकर मात्र संत आणि त्यांचे तिर्थक्षेत्र, महात्म्य यांच्यापासून कष्टक-यांना दूर राहण्याचे सांगतात. या विचाराने कोणाचेही भले झाले नाही असे लोकांना मनापासून शिकवतात. या त्यांच्या दृष्टीमागे दुष्टप्पी धोरण नाही. उघड्या नागड्या कष्टकऱ्यांचा, शेतकऱ्यांचा विकास व्हावा व ही भूमिका आहे. अभ्यासकांनी वैज्ञानिक दृष्टीने व बुद्धीनिष्ठ विवेकवादाने संत साहित्याचे विश्लेषण करावे अशी अपेक्षा करतात. जनतेत नवी लोकशाही जीवनप्रणाली रुजावी हा राष्ट्रवाद त्यांच्या साहित्य चिंतनाचा गाभा आहे.

भारताचा इतिहास आणि साहित्य प्रामुख्याने दोन विचार प्रवाहांनी साकार झाले आहे. एक सिंधु संस्कृतितील भारतीय लोकजीवनाचा आणि दुसरा परकीय आर्य लोकजीवनाचा . एक सिंधु संस्कृतितील दास, दस्यू पणी यांचे सांस्कृतिक जीवन आहे. तर दुसरे परकीय ऋग्वेदीक आर्याचे वर्णव्यवस्थेचे सांस्कृतिक जीवन आहे. फुल्यांनी इतिहासाच्या वाटचालीत बुद्धपूर्व काळात वैदिक आर्य विरुद्ध स्थानिक भारतीय असा राजकीय, सांस्कृतिक, संघर्ष रेखाटला आहे.[१२]. जीवनातही बौद्ध चार्वाक विरुद्ध वैदिक ब्राह्मणी असा संघर्ष आहे. या दोन प्रवाहाचेच तत्त्वज्ञान, साहित्य भारतीय समाजरचनेत आहे. एक वर्ग जन्माने वर्ण लादणारा आहे. दुसरा वर्ग वर्णव्यवस्था शोषणव्यवस्था आहे म्हणून नाकारणारा आहे. यांच्या संघषनिच प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक साहित्य, इतिहास,

---

११. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ७ नागपूर संपा. मा.फ.गांजरे पृष्ठ १०१

१२. जोतीराव गोविंदराव फुले, गुलामगिरी, पुणे, १८७३, महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपा. धनंजय कीर, स.गं.मालशे मुंबई, द्वितीय आवृत्ती १९८० पृष्ठ ६७

समाजजीवन साकार झाले आहे. आंबेडकर पूर्व काळात वर्णव्यवस्थेच्या स्थितीवादी ब्राह्मणवादानेच शुद्र अतिशुद्राला गुलामगिरी प्राप्त झाली. त्यांचे जीवन नरकमय केले याचे चित्र कर्ममेळा यांनी आपल्या अभंगात काढले आहे. 'जन्म गेला उष्टे खाता, लाज न ये तुमच्या चित्ता' असे संताच्या ईश्वरालाच त्याने खडसावले. आणि अस्पृश्य, कष्टक-यांना सुंदर जीवन मिळावे म्हणून देवालाच धारेवर धरले. तुम्हाला कितीही अपमान मिळाले. गुराप्रमाणे कष्ट मिळाले. तुम्हाला हे जे जीवन मिळाले ते ईश्वराने दिले त्याबद्दल तक्रार करु नका असेच संत व संत साहित्य शिकवत होते. हे तत्त्वज्ञानच वेदाने, महाभारताने, गीतेने प्राचीन भारतातील शुद्राला शिकविले. कृष्ण, याज्ञवल्क, व्यास, वाल्मीकी यांनी सांगितले. पुष्पमुत्र शुंगाची राजवट, गुप्ताची राजवट या ब्राह्मणवादी राजवटीनी जनतेकडून तत्त्वज्ञान राबवून घेतले. असा या राजवटीचा गौरव करण्यात आधुनिक ब्राहमणी वाङ्मयाचे समर्थक झपाटयाने पुढे सरसावलेले लेखनातून आढळतात. गरिबांच्या दुःखाला, अस्पृश्यांच्या वेदनेला, स्त्रीयांच्या व्यथेला, सतीच्या प्रथेमुळे मिळणा-या चटकेला धर्माने आधुनिक काळापर्यंत राबविले[१३]. अशा शोषणाच्या मगरमिठीतून अस्पृश्यांना मुक्त केले पाहिजे. भारतीय चिंतन परंपरेला बदलले पाहिजे. त्या शिवाय भारताला व साहित्यालाही भवितव्य नाही हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले. आणि त्या विरुद्ध बंड करण्याचे धारिष्टय दाखविले. ब्राह्मणवादाचा धर्मग्रंथ मनस्मृती जाहीरपणे जाळला . कृष्ण व राम या

---

१३. दामोदर नारायण शिखरे महाराष्ट्र जीवन : परंपरा, प्रगती आणि समस्या, खंड पहिला"संपा. गं.बा.सरदार, पुणे, १९६०, पृष्ठ १५९ "राजसत्ता जशी भ्रष्ट तशीच धर्मसत्ता अंध व क्रूर वाघालांडग्यांचे हृदयात असेल तितकी सहृदयता रुढीग्रस्त धर्मगुरूच्या व शास्त्री पंडितांच्या ठायी आपल्या रक्तामासाच्या मायभगिनीच्या बाबतीतही उरली नव्हती. १८५४ साली श्री शंकराचार्य नगर येथे गेले असतांना त्यांनी एका बालविधवेला व्यभिचाराबद्दल कोणती शिक्षा सांगावी? तर "आंब्याच्या झाडाचा बुंधा कोरून एक ढोल तयार करा. तिच्यात या मुलीला बसवा, बाहेरून गवत पाचोळा पेटवा. आणि बरीच धग लागल्यावर तिला बाहेर काढा नंतर तिचे वपन करा आणि शेवटी सहस्र ब्राह्मणांना जेवण घाला"

आदर्शाचा खोटा बुरखा 'रिडल्स इन हिन्दुइझम' या ग्रंथातील निबंधात फाडला. पावित्र्याच्या नावाने चालविलेल्या थोतांडाला दुबळेपणाने ब्राह्मणी लेखका सारखे जमवून न घेता स्त्रीया अस्पृश्यांच्या महाभयंकर वेदनेने समजून घेतले. शुद्र अतिशुद्रांच्या आर्थिक व सामाजिक दास्याच्या कसोटीने त्यांनी संत साहित्याचिही समीक्षा केली. त्या विचारातून कष्टकरणा-या बहुजन समाजाला (S.C. S.T.) बाहेर पडण्याची क्रांतिप्रेरणा दिली. वर्णव्यवस्थेच्या ब्राह्मणवादी विचाराने वरिष्ठ लोकांचे वर्चस्व व हित जोपासले होते. त्यामुळे त्यांचे - पांच टक्क्याचे काहीच नुकसान झाले नव्हते. शोषण कायम राहावे म्हणून आधुनिक काळातील संत साहित्याचा ब्राह्मणी लेखक मोठ्या चलाखीने संत विचार सांस्कृतिक विचार आहे असे सांगत आहे. प्राध्यापकही नोकऱ्या सांभाळून आधुनिक जीवन जगत प्राचीन सामंतवादी मूल्यविचारांचे संत साहित्य गौरवत आहे. बहुजनाच्या मेंदूला ब्राह्मणवादी शोषणाच्या बेड्या ठोकत आहे. त्या बेड्या डॉ. आंबेडकरांनी पाहिल्या आणि त्यांनी लोकशाहीवादी मूल्य विचार मनांत रूजविण्यास सांगितले. शोषणाचे डावपेच जनतेसमोर आपल्या निबंधातून मांडले[१४]. आणि संत साहित्याची खरी समीक्षा केली. लोकांना विचार करण्यास प्रवृत्त केले. भक्ती, श्रद्धा या खोट्या अधःपाताकडे धेवून जाणाऱ्या विचाराला टाकून देऊन समता, स्वातंत्र्य व बंधुभाव या मूल्य विचाराला स्वीकारल्यानेच विकास होईल असे चिंतन मांडले. शोषीत समूहाला - बहुजन

१४. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ३, संपा. मा.फ. गांजरे नागपूर, पृष्ठ २९ "जगात ज्या हरघडी घडामोडी होतात त्या माणसेच करीत असतात काही थोडे सुशिक्षित व स्वार्थपरायण लोक दुसऱ्या असंख्य लोकांना अज्ञानांधकारात ठेवून त्यांना ईश्वराविषयीच्या खोट्या कल्पनाच्या पाठीमागे लावून व त्यांच्या धर्मभोळेपणाचा फायदा घेवून आपले स्वतःचे हित साधीत असतात. कारण या कल्पुप्तीने तुमची संघशक्ती नष्ट होऊन तुम्ही मेंढरासारखे पोकळ भावनांच्या पाठीमागे लागता व तुम्हाला सर्वतोपरी लुबाडण्याचा त्यांचा मार्ग निष्कटंक होतो. आज आपण दीनवस्थेत पोहचलो आहेत त्या स्थितीतून बाहेर पडून तुमचा उद्धार करून घ्यावयाचा असेल तर तुम्ही या कल्पनांना अजिबात फाटा दिला पाहिजे"

समाजाला सत्याची दृष्टी व विकासाची दिशा प्राप्त व्हावी म्हणून म्हणाले "पंढरपूर, त्र्यबकेश्वर काशी, हरीद्वार वगैरे यात्रा करून किंवा एकादशी, सोमवार गैरे उपवास करून तुमचा उद्धार होणार नाही. तुमचे वाडवडील हजारो वर्षे या गोष्टी करीत आले तरिही तुमच्या शोचनीय स्थितीत एक तसूभर तरी फरक पडला आहे का ? पूर्वीच्या फाटक्या चिंध्या तुमचे अंगावर, अर्ध्याकच्च्या भाकरीचेच तुकडे अद्याप तुमच्या पोटास, गुराढोरासारखी गलिच्छ अशी आजतागायत तुमची राहणी व कोंवड्याप्रमाणे रोंगराईस बळी पडण्याची पूर्विचीचे तुमची निर्बलता ! दुःसह परिस्थितीत अद्याप का बदल झाला नाही? एकच औषध घेऊन रोग बरा होत नाही तर आपल्याला औषधाचा फेरबदल करावयास नको का? वैद्य बदलावयास नको का? तुमच्या आजपर्यंतच्या वाऱ्या तुमच्या कामी आल्या नाहीत. किंवा तुमचे उपवास जन्माची उपासमारी टाळावयास समर्थ झाले नाहीत" [१५] असा हा संत विचार शोपितांच्या जीवनाच्या कसोटीवर डॉ. आंबेडकर तपासतात. विवेकशक्तीचा स्वतःचाच विचार करण्यास प्रेरणा देतात.

साहित्य आणि जीवन यांचा निकटचा संबंध असतो. साहित्य विचार जीवनाला सुदंर आणि कुरूप बनविण्यात महत्वाची भूमिका वठवतो. लोकांची संवेदना घाडवितो. त्यांच्या मानसशास्त्राची जडण-घडण करतो. व्यक्तिला शक्तीची किंवा भक्तिची शिकवण संस्कारीत करून नियंत्रित ठेवण्यात मदत करतो. स्थितीवादी जीवन जाणीवा अथवा परिवर्तवादी जाणिवा बिंबवितो. वर्णव्यवस्था उत्तम आहे अथवा वाईट आहे. यांचा संस्कार साहित्य करीत असते. व्यक्तिनिष्ठ अथवा समाजनिष्ठ चेतना देत असते. संत साहित्याने भारतीय जनतेला स्थितीवादी जातियवादी, श्रेष्ठ - कनिष्ठ, अशी भावना दिली. त्यामुळे बंधुभावाचे नातेच हरपले. भारतावर अनेक परकीय राज्यकर्ते स्थिर होण्यास व राजवटी स्थापण्यास वर्णव्यवस्था जातिव्यवस्था कारणीभूत ठरली आहे. परलोकवादी विचारसरणीची मदत झाली आहे. शिवाजी महाराजाला

---

१५. बी.आर.आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ३, संपा. मा. फ.गांजरे, नागपूर, पृष्ठ २९ - ३०

मिळालेले यश या कोण्या देवतेमुळे अथवा संताच्या शिकवणीमुळे मिळाले नाही. शिवाजी महाराजांच्या शक्तीच्या बळाने स्वपराक्रमाने व मावळ्यांच्या निष्ठापूर्ण सहकार्यातून मिळाले. बलिदान, त्यागातून, शक्तीतूनच प्राप्त झाले. उलट गीतेच्या वर्णव्यवस्थेने व ब्राह्मणीवादी विचाराने शिवाजीचा राज्यभिषेक नाकारला. आणि शुद्र म्हणून त्यांची अवहेलना केली. अशी ही विषमतावादी विचारसरणी साहित्याने जोपासू नये तर समतावादी दृष्टीच लेखक कलावंतांनी अंगिकारली पाहिजे. अशा आशयाचे चिंतन डॉ. आंबेडकरांनी मांडले. प्राचीन - मध्ययुगीन सरंजामशाही साहित्यावर टीका केली

डॉ. आंबेडकरांनी संत साहित्याचे नेतृत्व करणाऱ्या ब्राह्मणी कवी ज्ञानेश्वराबद्दल व ज्ञानेश्वरीबद्दल आपली भूमिका मांडली. ती निश्चितच लोकशाही मूल्यविचाराला गतिमान करणारी आहे. कोणत्याही व्यक्तिला अथवा कलाकृतीला श्रेष्ठ म्हणतांना ते त्यांच्याकडून समतेची अपेक्षा करतात, सर्व माणसे जन्माने श्रेष्ठ आहेत अशा न्यायाची शिकवण देणाऱ्या मनाची अपेक्षा करतात. ब्राह्मण वर्ण श्रेष्ठ व शुद्रही कनिष्ठ असा 'स्वधर्म' महान आहे असे विचार प्रस्तुत करणाऱ्या व्यक्तीबद्दल अथवा ग्रंथाबद्दल डॉ. आंबेडकरांजवळ क्षमा नाही. म्हणूनच त्यांनी समग्र ब्राह्मणी ग्रंथ परंपरा नाकारली. आणि ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांची मीमांसा केली. ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी या ग्रंथाने महाराष्ट्रीयन समाजजीवनात कोणती कामगिरी बजावली? त्या कार्याचे मूलतत्व शुद्र अतिशुद्र समाजाला कितपत उपयोगी पडले? या प्रश्नाचे उत्तर डॉ. आंबेडकरांच्या संत साहित्याच्या चिंतनात मिळते. ते म्हणतात "ज्ञानेश्वराने तरी काय केले? त्याने भगवद्गीतेवर ज्ञानेश्वरी नावाचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथाचे सार काय ? तर जग हे ब्रह्ममय आहे. सर्व जगच जर ब्रह्म आहे तर मग महार मांगातही ब्रह्म असावयास पाहिजे. मग ज्ञानेश्वर महार मांगात का राहिला नाही? ब्राह्मणाने त्याला वाळीत टाकल्यानंतर त्याने त्यांना सांगावयास पाहिजे होते की तुम्ही जरी मला जातीत घेतले नाही तरी हरकत नाही मी महार मांगात जाऊन राहीन कारण जग हे ब्रह्ममय आहे. असे ज्ञानेश्वराने का सांगितले नाही. सर्व साधारण जनतेला

भूलविण्यासाठी हे सर्व थोतांड रचलेले आहे. आणि या थोतांडाला तुम्ही सर्व भूलून आहात. आजचे हे युग विचारांचे युग आहे हे तुम्हाला ओळखता आले पाहिजे. कारण या पुढे तुम्हाला जगात वागतांना विचार करुनच वागले पाहिजे." [१६] संत साहित्याचे संस्थापक व त्यांच्या ग्रंथ निर्मितीला डॉ. आंबेडकर 'थोतांड' संबोधतात. कारण त्यांची दृष्टी ही महान करूणेने भरलेली आहे. मानवतावादी मूल्यांने साकार झाली आहे.

डॉ. आंबेडकरांची ही संत ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी बद्दलची वस्तुनिष्ठ मीमांसा संपूर्ण मराठी समीक्षेत निराळी आहे समीक्षेला नवी दिशा देणारी आहे. मूलभूत चिंतनाने साकार झालेली आहे.

ज्ञानेश्वरी ज्या ग्रंथावर आधारित आहे त्या गीतेबद्दल व त्या मधील विचारांबद्दल ते म्हणतात 'It is an irresponsible book of ethics! [१७] आणि " मूर्खपणाने लिहीलेला जर कुठला ग्रंथ असेल तर तो गीता " [१८] गीतेवरील डॉ. आंबेडकरांचे भाष्य युगप्रर्वतक आहे. या त्यांच्या चिंतनाचा अस्पृश्य समाजावर परिणाम झाला. आणि त्यांनी आपल्या घरातील ज्ञानेश्वर, कृष्णाचे ग्रंथ नदीत बुडविले. घरातील त्यांच्या प्रतिमा फेकून दिल्या. आणि लोकशाही विचार स्वीकारला. बुद्धीवादी विज्ञानवादी विचारांचा दृष्टीकोन अंगिकारला. शिक्षणाला, विद्येला महत्व देऊन मध्ययुगीन मूल्यव्यवस्था नाकारली. त्या क्रांतिचा चांगला परिणाम भारतीय समाज जीवनावर उमटला आहे. ज्ञानेश्वरांनी रामदेवराव राजा वाईट असतांनाही त्याचा गौरव केला. रामदेवरावाने आमनदेव याचे डोळे काढले व तो गादीवर बसला. अल्लाउद्दीन यांच्या एकलाख सैनिकांपुढे शरणागति पत्करली व त्याला भरपूर खंडणी दिली. खंडणीवरोवर अल्लाउद्दीनला स्वतः ची मुलगी दिली. महानुभाव पंथाचे थोर संस्थापक यांचा

---

१६. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ७, संपा. मा. फ. गांजरे, नागपूर, पृष्ठे १०२

१७. चा. भ. खैरमोडे बाबासाहेब आंबेडकर चरित्र, खंड ९, मुंबई, १९८७, पृष्ठ १६

१८. त्रैव, पृष्ठ १८

खून केला. 'रूक्मिनी-स्वयंवर' लिहिणारे कवी नरेंद्र यांना जीव मुठीत घेऊन राजसभेतून बाहेर पडल्यानंतर बेपत्ता व्हावे लागले. रामदेवाने नरेंद्राचाही खून केला असावा असे महानुभाव अनुयायामध्ये मत आहे. म्हाईंभटाजवळूल नेमके चक्रधर स्वामीच्या लीला चोरून नष्ट केल्या. महानुभावांना रामदेवराव राजाच्या राजवटीत आपले वाङ्मय चोरून व गुप्त लिपीत लिहावे लागले कारण महानुभाव जातिभेदाविरूद्ध होते म्हणून त्याने त्यांच्या छळ केला अशा राजाबद्दल ज्ञानेश्वर म्हणतात -

"तेथ यदुवंशविलास । सकळ कळानिवास
न्यायाते पोषी क्षितीश । श्रीरामचंद्र ।।"

अशा शब्दात ज्ञानेश्वरी ग्रंथात रामदेवाला गौरवले आहे. शुद्र शंबूकाचा खून करूनही रामचंद्र न्यायी राजा म्हणून वाल्मीकी गौरवतो. एकलव्याचा आंगठा कापून ही द्रोणाचार्याला श्रेष ठ गुरु म्हणून व्यास गौरवतात. शुद्र अतिशुद्रावर वर्णव्यवस्था व ब्राह्मणवाद लादणारे कवी, लेखक व राजवट यांना आधुनिक मराठी समीक्षकही गौरवतात ज्ञानेश्वराच्या सूरात सूर मिसळवून ब्राह्मणी ग्रंथाना श्रेष्ठ ग्रंथ म्हणून मी मांसा करतात. ही मी मांसा वस्तुनिष्ठ नसून वर्चस्ववादी वर्ण अहंकारातून साकार झालेली आहे. या चातुर्वर्ण्याची ब्राह्मण श्रेष्ठ व शुद्र कनिष्ठत्वांची 'सकल लोक संस्था' 'रक्षणीय' आहे असे सांगणाऱ्या संत साहित्यांची डॉ. आंबेडकर मानवतेच्या दृष्टीने मीमांसा करतात. शुद्र, अतिशुद्र, व स्त्रीया यांच्या आकाक्षांना, स्वप्नांना नष्ट करणाऱ्या चातुर्वर्ण्याला व त्यांच्या समग्र ग्रंथांना डॉ. आंबेडकर मोडीत काढतात.

ज्ञानेश्वरीवादी संतानी बहुजन विरोधी विचार मराठीत आणून वर्णधर्माची शिकवण रूजविली. संस्कृत मधून जे विष होते. ते मराठीतून शुद्र - अतिशुद्राला दिले आणि समाजमन पंगू केले. महानुभाव, जैन, बौद्ध, लिंगायत नाथ इत्यादि पंथातील जातीभेद मोडणारी शिकवण यांना वारकरी पंथाने शह दिला. दया प्रेम हे संतानी चिमूटभर शिकविले व ब्राह्मणवाद, वर्णभेद मात्र जनतेच्या गाडी भरून भरून रक्तात भिनविला. जनतेला सांगितला त्यामुळे

देशाचे अमाप नुकसान झाले आणि शुद्र-अतिशुद्र बहुजनांच्या अधःपाताला अंतच नाही. आपर्यंत सीमाच उरली नाही.

त्या शोषणाविरूद्ध पहिल्यांदा आंबेडकर प्रखरपणे बोलले आणि विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही पुन्हा विनोबा 'गीतेला माऊली म्हणून बहुजनावर लादू लागले. मार्क्सवादी, समाजवादी हे प्रामुख्याने ब्राह्मण कुटुंबातून, उच्चवर्णातून आल्यामुळे पारंपरिक स्वरातच स्वर मिसळून ज्ञानेश्वरी गीता यांना आदर्श म्हणून थोपू लागले. डॉ. आंबेडकरांनी शुद्र अतिशुद्रांनाच त्यांच्या बौद्धीक शोषणाची जाणीव करून दिली. गुलामाला गुलामगिरीची जाणीव करुन द्या म्हणजे तो बंड करुन उठेल अशा क्रांतिकारी विचाराने नवसमाज निर्मितीची चेतना दिली.

इ.स. पूर्व सहाव्या शतकात जन्मलेल्या बुद्धोत्तर काळातील गीतेने धर्म गतिमान केली. १३ व्या शतकातील ज्ञानेश्वरीने शिकवलेला ब्राह्मणवाद सोळाव्या शतकातील रामदासानेही बहुजनाला शिकवला. दासबोधात ते म्हणतात

गुरू तो सकळासी ब्राह्मण । जरी तो झाला क्रियाहीन
तरी तूंवासीच शरण । अन्यन्यभावे असावे
ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्ये करूनी
असो ब्राह्मण सूरवर वंदिती । तेथे मानव बापुडे किती
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य
अंत्येज शद्रज्ञाता बरवां । परी तो नेऊन काय करावा
ब्राह्मणासन्निधि पुजावां । हे तों न घडे की ।

असा ब्राह्मणवाद संत रामदास 'दासबोध' या ग्रंथातून सांगतात. शुद्र अतिशुद्राचा अपमान करण्याचे शिक्षण समाजाला देतात. ब्राह्मण मूर्ख असला तरी तो वंदनिय आहे. हे ब्राह्मण तत्वच संत साहित्यातून मांडतात. ब्राह्मण कुळात

जन्मास आलेल्या संतानी जसे ते शिकविले तेच ब्राह्मणेत्तर कुळात जन्मास आलेल्या संतांनीही वेदादी ग्रंथावे समर्थन करून शिकविले. म्हणूनच ज्ञानेश्वर व रामदास यांचा उदो उदो करण्यात अजूनही मराठी साहित्य व साहित्य संम्मेलने थकत नाहीत. त्यांच्या ग्रंथाची पालखीत ठेवून मिरवणूक काढण्यास विसरत नाहीत. खरेतर शुद्र अतिशुद्रांवर प्रचंड अन्याय झाल्यांनतरही वादळासारखे आंदोलन बहुजनांच्या घराघरातून का पेटत नाही? हे परकीय व खऱ्या विचारवंताला पडलेले एक कोडे आहे. परंतु या कोड्याचे रहस्यं युगायुगापासून मरगळलेल्या मनांत आहे. सामाजिक आर्थिक, राजकीय व मानसिक दास्यात आहे. हे दास्य नष्ट करण्यास झटणारा एकच महापुरूष होऊन गेला तो म्हणजे आंबेडकर! आणि त्यांच्या सांगण्यावरून ते दास्य झुगारून देणारा एकच समाज पुढे आला तो म्हणजे अतिअस्पृश्य. शुद्र हा अस्पृश्य वर्ण आहे. हा अजूनही मानसिक गुलामगिरी भोगतो आहे. त्याच्या स्वातंत्र्याला व अधिकारालाच संत रामदासानी नाकारले म्हणूनच त्याचे खरे स्वरून डॉ. आंबेडकर विश्लेषण करुन सांगतात. अशा साहित्याच्या विचारांपासून सावध असले पाहिजे. आणि आपण आपला नवा विकासाचा मार्ग धुंडाळला पाहिजे. शुद्र अतिशुद्राचे अपमान करणारे हे साहित्य आहे हे स्पष्ट करतांना ते म्हणाले "In his Dasbodh a sciopolitico religious treatise in Marathi verse Ramdas asks addressing the Hindu can we accept an Antyaja to be our Guru because he is a Pandit (i.e. learned) and give an answer in the negative [१९]' असा संतानी संत साहित्याच्या माध्यमातून विचार रूजविला. 'संतानी ब्राह्मणवाद शिकविला' हे सवर्ण उच्चवर्णीय टीकाकार लपवून ठेवतात. आणि डॉ. आंबेडकर नेमके ते विषय बहुजनांसमोर उलगडून दाखवितात. कारण त्यांना सर्वसामान्याचे जीवन सुंदर

---

१९. Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches Vol. 1, Bombay, 1989, Page 37

करण्याचा ध्यास लागला होता. त्यांच्या आयुष्याला माणुसकीची शक्ती प्रदान करण्याकरिताठी ते दिवसरात्र झटत होते म्हणून त्यांनी 'मुखमे राम बगलमे सुरी' या या कार्यातील विषारी तत्त्व भोळ्या भावड्या लोकांना समजून दिले. त्यामुळे त्यांची संत साहित्य विषयक समीक्षा जीवन आणि साहित्य यांना समृद्ध करणाऱ्या मूल्यांची झाली आहे. तीन टक्के लोकांच्या हितापेक्षा बहुजन हिताय - बहुजन सुखाय या सिद्धांताच्या मापदंडाने साकार झाली आहे.

बहुजनांच्या इतिहासाला नेहमीच विकृत करण्याचा प्रयत्न ब्राह्मणी विद्वांनांनी केला. शुद्र - अतिशुद्रांच्या साहित्य व संस्कृतिला नामशेष करण्याचा प्रयत्न ब्राह्मणी इतिहासकारांनी केला. गूढवादी, अनाकलनिय, भंपक, स्पर्श, पूर्वजन्म, ईश्वर, कर्मविपाक, पाप-पुण्य अशा भ्रामक विचाराने लोकांना विचार करावयास लावले 'ब्रह्म सत्य जग मिथ्या' 'ईश्वर सत्य जग खोटे' असे शिकविले. शुद्र ब्रह्मदेवाच्या पायातून व ब्राह्मण ब्रह्मदेवाच्या मुखातून जन्मले असे निरर्थक विश्लेषण हे ब्राह्मण लेखक ग्रंथातून देत राहिले. डॉ. आंबेडकरांनी हा साहित्यामधून आलेला इतिहास भारताच्या ऐतिहासिक सामाजिक संघर्षातून समजून सांगितला. 'शुद्र पूर्वी कोण होते?' व 'अस्पृश्य मुळचे कोण?' या दोन ग्रंथातून ब्राह्मणांच्या वर्णजातिच्या पुराण भाकड कथांच्या विचाराला नाकारून समाजशास्त्रीय मांडणी केली. बुद्धालाही विष्णूचा अवतार करुन त्याचा इतिहास विकृत केला. म्हणून डॉ. आंबेउकरांनी शुद्र-अतिशुद्रांचे साहित्य, संस्कृती, संघर्ष, आंदोलन, इतिहास, सण-उत्सव यांचा शोध घेतला. आणि अभ्यासकांनाही शोपितांच्या इतिहासाचे संशोधन करण्यास प्रेरणा दिली. वैदिक ब्राह्मणी ग्रंथातील नाग, असूर, राक्षस, हे सिंधु संस्कृतिचे मुळ भारतीय लोक आहेत. त्यांना परकीय आर्यांनी विशेषणं लावून त्यांची संस्कृती, कुटुंब संस्था, तत्त्वज्ञान नष्ट केले. अवैदिक लोकांचा छळ केला. नागांच्या खांडव-वनात कृष्ण-अर्जुनाने जाळल्याचे पुरावे नव्या पद्धतीने साहित्यातून मांडले पाहिजे ही दृष्टी डॉ. आंबेडकरांनी आपल्या चिंतनातून दिली आहे.

पंढरपूरचा विठोबा कोण होता ? या संदर्भात ब्राह्मणी मराठी विद्वानात वादविवाद होतात. बुद्धाला व त्याच्या इतिहासाला टाळून वेद-गीतावरच कागद

खर्ची धातल्या जातात. त्यामुळे खऱ्या चेतनेला प्रश्नांना गती येत नाही. म्हणून संत साहित्याचे दैवत असलेला 'विठोबा' बद्दल डॉ. आंबेडकरांचे विचार इतिहासाला धरून प्रकटले आहेत. भाररताच्या इतिहासाचा, साहित्याचा, धर्माचा, वर्णव्यवस्थेचा सिद्धांताचा, अस्पृश्यतेच्या तत्वाचा खरा शोध बुद्ध धम्माच्या संघर्षात आहे. आर्य वैदिक यांच्या दुष्टतेचा शोध सिंधु संस्कृतिच्या उत्खनात सापडलेल्या पुराव्यात आहे. परंतु ब्राह्मणी लेखक बुद्धाबद्दल, नागाबद्दल बोलणेच टाळतात. आणि डॉ. आंबेडकर नेमके बुद्ध नाग यांच्या बद्दलच विचार मांडतात. त्यामुळे त्यांच्या रूपाने नवा सत्य विचार एक नवे प्रामाणिक चिंतन भारताला घडविण्यास जन्मास आले आहे. संत साहित्याचा विठोबाबद्दल ते म्हणतात "पुण्याच्या इतिहास संशोधन मंडळातील लोकांची पंढरीचा विठ्ठल कोण होता यावर हुज्जत चालू आहे. पण माझा त्यांना खडा सवाल आहे की विठ्ठलाची भानगड सोडून देऊन पंढरीचा पांडुरंग कोण? याचे पहिल्यांदा उत्तर द्या. तो होता कुठे? त्याला पळविले कोणी? कोणी डुबविले? पांडुरंग म्हणजे पंढरपूर येथे बौद्ध धर्माचे देवालय होते. हे मी त्यांना सिद्ध करून देईन. पुंडरीक या शद्वापासून पांडुरंग शद्व तयार झाला. पुंडरीक याचा अर्थ कमळ. बौद्ध धर्मात मूर्तीपूजा नव्हती. अज्ञानी लोकांना तत्त्वज्ञान काय कळे ! कमळला पाँली भाषेत पांडुरंग असे म्हणतात. तुम्हाला भूलविण्यासाठी ब्राह्मणांनी बुद्धाच्या नावाचा लोप केला. मतलबी लोक महाराष्ट्रातील लेणी पांडव लेणी असल्याचे सांगतात. इकडे पांडव कशाला आले होते ? पांडव दिल्लीच्या बाहेर ८० मैलाच्या पलिकडे गेले नाहीत. त्यांनी अलवार स्टैटमध्ये पंधराशे लेणी खोदली कशी? त्यांच्या जवळ टिकाव नव्हती की फावडं नव्हतं" [२०] भारतातील शुद्र - अतिशुद्रांचा सामाजिक, राजकीय इतिहास हा जवळ जवळ नष्ट करण्यात आला आहे. बुद्धासारखे जागतिक किर्तीचे व्यक्तिमत्व आणि विचारही ब्राह्मणवादाने विकृत केले. बुद्ध धम्म हा भारतातून जगभर पसरला परंतु त्यांच्या अभ्यासाची साधने आधुनिक काळातच राहूल सांस्कृत्यायन, धर्मानंद कोसंबी, अनागारिक धम्मपाल, पीलक्ष्मी नरसू, डॉ. आंबेडकर इत्यादि संशोधकांनी बाहेरच्या देशातून उपलब्ध केरुन दिली. बुद्ध धम्म चौदाव्या शतकापर्यंत भारतात जीवंत होता. नवव्या शतकापर्यंत अनेक बौद्ध राजे भारतात होते. अनेक तत्ववेत्ते व कवी होते. अश्वघोष, बुद्धघोष, धर्मकीर्ती, वसंवंधु, दिग्नाग, नागसेन, अशी किती तरी नावे

---

२०. बी. आर. आंबेडकर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६, संपा. मा.फ.गांजरे, नागपूर, १९८२, पृष्ठ १२१

सांगता येतात. सम्राट अशोकाच्या काळात ८४००० बुद्ध विहारं भारतात होती. त्यामधिल अनेक ब्राह्मणी पुरोहितांनीच बळकावली. प्राचीन शुद्र, अतिशुद्र, आदिवासी (S.C. S.T. O.B.C. N.T. V.J.T.) इत्यादींचा प्राचीन धर्म हा ब्राह्मणी अथवा आजचा हिन्दु धर्म नव्हता तर बैद्ध धर्म होता अशीच इतिहासाची साक्ष आहे. या बौद्ध जनतेलाच ब्राह्मणी धमनि शुद्र, अतिशुद्र करून शिक्षण बंद करून गावगाड्यातील व शेतमळ्यातील गुलाम मजूर केले. आणि त्रैवर्णिकांची सेवा म्हणजे गुलामगिरी धर्माच्या नावाने बंधनकारक केली. त्यांना संत साहित्याची खोटी भक्ती शिकवून श्रद्धा शिकवून विचार करण्याची त्यांची शक्ती पंगू केली. विचार करू नका ईश्वरावर श्रद्धा ठेवा व चूपचाप भक्ती करा. त्यामध्येच तुमचे कल्याण, मोक्ष, स्वर्ग आहे. असे सांगितले. आणि त्यांचे संसार व कुटूंब यांचे लौकीक जीवन उद्ध्वस्त केले. हे डॉ. आंबेडकरांनी ओळखले आणि त्या शोषणातून अस्पृश्यांना बाहेर काढले. बहुजनानी सुद्धा त्या ब्राह्मणी हिन्दु धर्माच्या दास्यातून, त्यांच्या शोषणाधिष्ठीत साहित्य जाणिवेतून बाहेर पडण्याची आवश्यकता प्रतिपादन केली [२१]. तीर्थक्षेत्र, देऊळ, गंगानदी यांच्या ठिकाणी कष्टकऱ्यांची चाललेली लूट व ब्राह्मणांच्या जीवन जगण्याची मीमांसा केली आहे. "ब्राह्मण लोक देवळात राहतात कारण तेथे त्यांना ऐषआरामी जीवन व्यतीत करावयास मिळते म्हणून. देवाची भक्ती करायला नव्हे. मी देवळे हिंडून पाहिली तिथे हे ब्राह्मणा लोक मूर्तिपूजा करायचे आणि धूप जाळायचे या पलिकडे दुसरा कसलाच उद्योग करीत नाहीत असे कळले. हा त्यांचा एक महत्वाचा उद्योग झाला. दुसरा उद्योग मला कळला तो हा की त्यांना फार भोजन खावे लागते. सकाळचे भोजन, दुपारचे भोजन, संध्याकाळचे भोजन या भोजनाचा मात्र फार मोठा उद्योग ते लोक करतात. [२२]" हा उद्योग सातत्याने ब्राह्मण कुटु बात चालू राहावा म्हणूनच संत व संत साहित्याने देव, देवळं, भक्ती, तीर्थक्षेत्र, पुराणं यांचं महत्व बहुजनांतील लोकांना सांगितले. आणि ब्राह्मणाभोवती लोकांची गर्दी केली. संत साहित्य हे ब्राह्मणी धर्माचे एक अंग आहे. आणि पारलौकिक भक्तीत, ईश्वराच्या धुंदीतच मग्न राहणे हे श्रेष्ठ लक्षण त्यांनी प्रतिपादन केले. गोरा कुंभार

२१. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६, संपा. मा.फ.गांजरे, नागपूर, १९८२, पृष्ठ ४४ – " लोकांच्या सामाजिक अधःपातास व प्रचलित हिंदूधर्मात मला तरी काहीच फरक दिसत नाही. हिंदूधर्मात शांती एकी नाही. आणि याचे कारण चातुर्वर्ण्यावर आधारभूत झालेली हिंदूधर्माची इमारत. ही गोष्ट आज बहुतेक हिंदू मान्य करतात "

२२. तत्रैव पृष्ठ ४५

आपला मुलगा चिखलात तुडवून मारतो. ईश्वर भक्तीच्या या त्याच्या वृत्तीमुळे आपल्या चिमुकल्याला मुकतो. त्याच्या त्या दुःखाचेही, त्याच्या त्या कृत्याचेही संत साहित्याचे अभ्यासक महानत्व म्हणून गौरवतात. धन्य ती भक्ती म्हणून त्याला तसेच कृत्य करण्यास पुन्हा अप्रत्यक्षरित्या बहुजनाला शिकवितात. हा किळसवाणा प्रकार व मीमांसा डॉ. आंबेडकरांना मंजूर नव्हती. म्हणून त्यांनी बुद्धिवादी विवेकवादी विचारांची कास धरण्याची शिकवण बहुजनाला व राष्ट्राला दिली. जिथे जिथे ढोंग, अन्याय, चुकीचं तत्त्वज्ञान, शोषणाधिष्ठीत परंपरा, खोटे दांभिक साहित्य व खोटी लुटारू माणसं, आदर्श म्हणून समाजात वावरतात त्यावर घणाघाती प्रहार डॉ. आंबेडकरांनी केले त्यामुळे त्यांची साहित्यविषयक समीक्षा युगप्रवर्तक झाली. सत्यनारायण कथादी साहित्य हे ब्राह्मणाचे पोट भरण्याचे वाङ्मय आहे. त्या आणि त्यांचा ईश्वरही ब्राह्मण पंडितासारखाच पिळवणूक करणारांचा रक्षणकर्ता आहे. एवढेच नव्हे तर हे सर्व फोल आचारविधि आहे [२३] असे स्पष्टपणे आपला विचार ते अनेक निबंधातून व्यक्त करतात. ब्राह्मणी धर्म व ब्राह्मणांचा देव यांचे आपसातील नातेसंबंध ते वस्तुनिष्ठ पद्धतीने मांडतात. या त्यांच्या चितनाचा संबंध संत व संत साहित्याचे खरे स्वरूप स्पष्ट करणे आहे.

संत साहित्याने व संतांनी ब्राह्मणी धर्मातील शोषणाला अनेक वर्षे समाजात रावविण्याचे कार्य केले. तेराव्या शतकातील महानुभाव, लिंगायत, नाथ, बौद्ध, जैन या पंथांनी वर्णव्यवस्थेविरूद्ध - ब्राह्मणी शोषणाविरूद्ध जे तत्वज्ञान मांडले होते. जी शिकवण लोकांना देत होते. त्यांची विचारशक्ती घडवित होते. त्यांच्याविरूद्ध संत व संत साहित्याने कार्य केले. ब्राह्मणी धर्माच्या विघातक कृत्याचे एक साहित्य म्हणून आज ते सिद्ध झाले आहे. अधुनिक मराठी साहित्याचे ब्राह्मणी अभ्यासक हेमाद्री पंडिताच्या कार्याला व विचाराला वंदनिय म्हणून आजही गौरवतात. परंतु ते चूक आहे. "मानवी समाजाच्या अस्तित्वाला ब्राह्मणी धर्म नुसता विघातकच नाही तर भयंकर विषारी आहे. महाराष्ट्रात देवगिरीच्या रामराव यादवांचा पंतप्रधान हेमाडपंत नामक ब्राह्मण होता. त्याने

---

२३. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६, संपा. मा.फ.गांजरे,नागपूर, १९६२, पृष्ठ १७९, "सत्यनारायण कथादी साहित्य हे ब्राह्मणाचे पोट भरण्याचे वाङ्मय आहे"

आचारविधी कर्मकांडांचे सातशे प्रकार आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहेत. एका वर्षात दिवस ३६० च असतात मग हे सातशे विधी कशासाठी ? हेमाडपंत ब्राह्मण असल्यामुळे त्याने हे सातशे आचार लिहून ठेवून ब्राह्मणांचा पोट भरण्याची परस्पर सोय करून ठेवली आहे[२४]" संत व संत साहित्याने अतिमंतः हेमाडपंताच्या विचाराची ब्राह्मणी धर्माची दिशाच घेतली. थोड्याफार प्रमाणात बाह्य ढोंगबाजीवर टीका करीत करीत ईश्वर भक्ती व परलोक विचार सांगितला. जो परलोक विचार व ईश्वरभक्ती ब्राह्मणी धर्माच्या केन्द्रस्थानी आहे. आणि वर्णव्यवस्थेचा वैदिक काळापासून आधार राहिला आहे. बहुजन समाजाला जन्माने तू नीच व ब्राह्मण श्रेष्ठ आहे. जी प्रत्येक जातिची कामे देवानेच दिली. हे तत्त्व वैदिक धर्मातून चालत आले तेच संतांनी प्रतिपादन केले आहे [२५]. त्यामुळे व्यक्तिचे स्वातंत्र्य व विवेकवाद समाज जीवनातून नष्ट करण्यात संत साहित्यांची अंगभूत प्रकृतीच साकार झालेली आहे. जे काही चांगली तत्त्व समाज जीवनात आहेत ती प्रामुख्याने १२ व्या शतकापर्यंत चांगल्या अवस्थेत असलेल्या बुद्ध धम्माच्या विचाराची आहेत . १८०० वर्ष बुद्ध विचाराचे भारतीय लोकांच्या मनावरील राज्यातून टिकलेली आहेत. या विवेकवादी, परिवर्तनवादी विचारावर पुन्हा पुन्हा हल्ला ब्राह्मणी विचार प्रवाह करीत आला आणि आजही बुद्धिवादी पुरोगामी विचाराविरुद्ध तो अयोध्येचा प्रश्न, राममंदिराच्या माध्यमातून ; कधी कुंभमेळा व गंगानदिचे जल विकण्या माध्यमातून करतो आहे. त्यांच्या नावाने चाललेल्या व ब्राह्मणी संघटनाकडून राबविणाऱ्या अवैज्ञानिक कृत्यालाच डॉ. आंबेडकरांनी ब्राह्मणवाद म्हटले आहे. मानवतावादाचा विकास जेथे होत नाही, शुद्र - अतिशुद्र व स्त्रीया यांचा बौद्धिक, आर्थिक, सामाजिक

---

२४. तत्रैव पृष्ठ, १७८

२५. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड १, संपा. मा. फ. गांजरे, नागपूर, पृष्ठ ११९, "वेद वाचल्यानंतर मला मोठे आश्चर्यच वाटले की ज्यात विदुषकी बडबडी खेरीज दुसरे काही नाही"

दर्जा जेथे उंचावत नाही अशा दुष्ट विचारकृत्यांवर डॉ. आंबेडकर टीका करतात. आणि ब्राह्मणी ग्रंथांच्या पाठीमागचे खरे उद्देश स्पष्ट करतात [२६]. "काही लोक गंगेवर स्नानासाठी जातात. गंगेच्या किनाऱ्यावर ब्राह्मण बसलेले असतातच ! स्नानासाठी जाणाऱ्या प्रत्येक माणसांकडून दक्षिणा (पैसा) उकळण्यासाठी ब्राह्मण तयार असतो. जर पापगंगास्नानाने व ब्राह्मणांना दक्षिणा वगैरे दिल्याने धुवून जात असेल नाहीसे होत असेल तर माणूस माणसाविषयी मुळीच सहानुभूति बाळगणार नाही.. परस्परावर प्रेम करणार नाही" [२७] म्हणून आज माणसामाणसामध्ये जातिच्या भिंती मजबूत झाल्या आहेत. डॉ. आंबेडकरांची संत साहित्य विषयक समीक्षा ही प्रामुख्याने मानवी जीवन सुंदर करण्यासाठी जन्मास आली आहे. प्रत्येक व्यक्तिला स्वतंत्र्यपणे त्यांच्या सगळ्या अधिकारासहीत जगता आले पाहिजे. या प्रेरणेतून प्रकटली आहे. भारतीय समाजजीवन हे ब्राह्मणी धर्म व वर्णव्यवस्थेतील श्रेष्ठ कनिष्ठ भावनेने भरलेले आहे. जाती जातीतील संबंध हे उच्च - नीचतेच्या जाणिवांनी गुंफले गेलेले आहेत. एकमेकांच्या बरोबर जिव्हाळ्याचे प्रेमाचे संबंध विकसित करण्यापेक्षा जात पाहून वागणूक देणे व संवेदना घडविणे ही वृत्ती ब्राह्मणी तत्त्वानी विकसित झाली आहे. संत चोखामेळा हा संत असूनही त्याला मंदिरात जाऊ दिले नाही. त्याचा छळ करून करून बळी घेतला. आणि संताना इथल्या समाज जीवनात न बोलू देता न पाहिलेल्या ईश्वर, परलोकाच्या संदर्भात मुभा दिली. आणि पर्यायाने ब्राह्मणी समाजरचना अधिक घट्ट केली. जातिजातीतील व्यवहार कटाक्षाने पाळावयास लावले. अस्पृश्यता काळजीपूर्वक प्रत्येक पातळीवर राबविली. अशा या शोषणाविरूद्ध डॉ. आंबेडकरांच्या चिंतनाचे बंड आहे. वर्णव्यवस्थेला टिकवून धरणाऱ्या विषमतावादी तत्त्वाला

---

२६. बी. आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १, संपा. मा.फ. गांजरे, नागपूर, १९६८, पृष्ठ ११९– " पुष्कळ लोकांना भगवद्गीता हा फार मोठा धार्मिक ग्रंथ वाटतो. मोठ्या खेदाने मला म्हणावे लागते की तसे वाटण्यासारखे मला तरी पुस्तकात काही आढळले नाही. उलट या ग्रंथाने बराच अनर्थ केला. "

२७. बी.आर. आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ६, संपा. मा.फ. गांजरे, नागपूर, १९८२, पृष्ठ १७९

गोंडस काव्याला रूप देणाऱ्या साहित्य विचाराविरूद्ध संघर्ष आहे. ब्राह्मणी राज्यकर्त्यांनी विविध आघाड्याद्वारे अस्पृश्यता धर्म साहित्य करून दास्य जोपासले आहे. चातुर्वर्ण्य हा फक्त धर्मच आहे का ? "धर्म व राजकारण यांना एकत्र गुंफून चातुर्वर्ण्य ही केवळ सामाजिक प्रथा नाही ते एक राजकीय तत्त्वज्ञान आहे" [२८] म्हणून वेदामध्ये ब्राह्मणी राजकारण आहे. रामायण, महाभारत, गीता, इत्यादि ग्रंथामध्ये ब्राह्मणी वर्चस्वाचे राजकारण आहे. हे राजकारण सण, उत्सव व तीर्थक्षेत्रे यांच्यामधून त्यांच्या विजयाच्या तारखा म्हणून व बहुजनांचा सर्वनाश म्हणून अस्तित्वात आहेत. साहित्य, सण हे ब्राह्मणी धर्माच्या हातात हात मिळवून हे मानवी जीवनाची विविध अंगे म्हणून बहुजनाला पराभूत ठेवण्यास इतिहासभर कार्यरत झाली आहेत. आणि हे कृत्य मोठ्या चलाखीने व संस्कारीत केले आहे. त्या कार्यासाठी पुरोहीत, कीर्तनकार, ऋषी, लेखक, कवी, कलावंत, भाट, साधु यांच्या फौजा ब्राह्मणवादाचे शोषण राबविण्याला जूंपल्या आहेत. ब्राह्मणी विचार चोखोबाही सांगत असेल तर त्यालाही नाकारा [२९]. असे हे सत्य स्वरूप सांगून संत व संतसाहित्याची परखड मीमांसा केली [३०]. मानवतावादाला प्रबोधनाला गती दिली. बुद्धानंतर प्रथमच डॉ. आंबेडकरांनी क्रांतिरूपाने हे सांगितले आहे.

भारतीय समाज या शोषणातून मुक्त व्हावा. जागतिक पातळीवर भारतीय व्यक्तीला ज्ञानाच्या क्षेत्रात सन्मान मिळावा. जगाला भारताने जशी जातककथा

---

२८. बी.आर.आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड १, संपा. मा.फ.गांजरे, नागपूर, १९६८, पृष्ठ ११९

२९. बी.आर.आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६, संपा. मा.फ.गांजरे, नागपूर, १९८२, पृष्ठ १२१, "ज्या चोखोबाची मूर्ती आपल्यासमोर नाही. किंवा पाहिलेली नाही, किंबहुना त्या काळात चोखोबाला आपल्या अस्तित्वात काही करता आले नाही त्या चोखोबाबद्दल आपण आस्था बाळगणे हितावह नाही."

३०. बी.आर.आंबेडकर, बहिष्कृत भारतातील अग्रलेख संपा. रत्नाकर गणवीर नागपूर, १९७६, पृष्ठ १६९ - "ब्राह्मण मानव श्रेष्ठ की शुद्र मानव श्रेष्ठ हा प्रश्न सोडविण्याच्या भरीस साधुसंत पडले नाहीत. या बंडात साधुसंताचा जय झाला. व भक्तांचे श्रेष्ठत्व ब्राह्मणास मान्य करावे लागले तरीसुद्धा या बंडाचा चातुर्वर्ण्य विध्वंसनाच्यचा दृष्टीने काहीच उपयोग झाला नाही .—

दिली. बुद्धाचे तत्त्वज्ञान दिले. साची, अजिंठ्याच्या रूपाने विश्वाला शिल्पकता दिली. असे सर्व पातळ्यावरचे स्वातंत्र्य बुद्ध विचाराच्या रूपाने पुन्हा रूजावे म्हणून त्यांनी माणूसपण हिरावून घेतलेल्या ब्राह्मणी विचारांवर प्रहार केले. लोकशाही जीवनमूल्यांच्या कसोटीने संत साहित्याची समीक्षा केली. स्वतःभोगलेल्या व अस्पृश्यतेच्या धगीने अपमानित झालेल्या अनुभवाने ब्राह्मणी साहित्याची चिकित्सा केली. त्याच्या उपप्रवाहानी तोलून धरलेल्या व्यक्तिची, संताची व विविध साधनाची बुद्धिवादी दृष्टीने मीमांसा केली. जीवनाच्या व समाजाच्या वास्तव भूमिवर त्यांची परीक्षा केली. त्यांचा संत साहित्य विषयक विचार म्हणजे बहुजनांच्या जीवनाला दाखविलेला खरा मार्ग आहे. प्रत्येक प्रामाणिक माणसाने जुन्या ब्राह्मणी कुजलेल्या विचाराने मनांचे केलेले पोषण हे अधोगतीकडे घेऊन गेलेले आपले प्रखर वास्तव म्हणून खुल्यामनाने स्वीकरले पाहिजे.


डॉ. आंबेडकरांचे संत साहित्य विषयक चिंतन हे लोकशाहीनिष्ठांचे राष्ट्रवादी साहित्य मूल्य आहे. सामाजिक बांधिलकीचे मानवनिष्ठ जीवनमूल्य आहे. हे त्यांचे साहित्यमूल्य व जीवनमूल्य आज भारतीय साहित्यशास्त्राचे मूलभूत म्हणून साकार झाले आहे. समताधिष्ठीत मूल्यजाणीव व संवेदना यांना

—असे म्हणता येईल की, तुमचे चातुर्वर्ण्य तुम्ही ठेवा आम्ही भक्त होऊ व तुमच्यातील श्रेष्ठतम गणल्या गेलेल्या ब्राह्मणांना लाजवू अशी अहंमन्यता धरून संतांनी चातुर्वर्ण्याला मुळीच धक्का लावला नाही. भक्तीच्या मुलाग्याने माणुसकीला किंमत येते असे नाही. तिची किंमत स्वयंसिद्ध आहे. हा मुद्दा प्रस्थापित करण्यासाठी संत भांडले नाहीत. त्यामुळे चातुर्वर्ण्याचे दउपण कायम राहिले. सताच्या बंडाचा एक मोठाचा दुष्परिणाम झाला. तुम्ही चोखामेळ्यासारखे भक्त व्हा मग आम्ही तुम्हाला मानू असे म्हणून दलित वर्गाची वंचना करण्याचा एक नवा उपाय मात्र त्यामुळे ब्राह्मणांच्या हाती सापडला. दलित वर्गातील कुरकुरणारी तोंडे या उपायाच्या सहाय्याने त्यांनी अस्पृश्य व ब्राह्मणेत्तर हिंदू यांना विषमतेत दडपून ठेवले आहे. आता या मागासलेल्या वर्गांनी असा विचार केला पाहिजे की एखादा चोखामेळासारख्या संत आपल्या समाजात निर्माण झाल्याने सबंध समाज उन्नत दशेला पोहचतो की काय? तसा तो पोहचत नाही हे खोल विचार केल्यास कळूनयेईल"

आकाररूप देणारे सत्व म्हणून प्रकटले आहे. त्यामुळे त्यांचा साहित्य विचार जीवनाची खरी नवी दिशा होऊन भारतीय साहित्याचे बदलते मापदंड ठरला आहे. आणि साहित्य चिंतनात समृद्ध भर टाकण्यात यशस्वी झाला आहे.

♠ ♠ ♠

२०. बी.आर.आंबेडकर, "लोकांच्या सामाजिक अधःपातास व राष्ट्राच्या ऱ्हासास कारणीभूत झालेल्या ब्राह्मणशाहीत व प्रचलित हिन्दुधर्मात मला तरी काहीच फरक दिसत नाही. हिंदू धर्मात शांती एकी नाही. आणि याचे कारण चातुर्वर्ण्यावर आधारभूत झालेली हिंदू धर्माची इमारत. ही गोष्ट आज बहुतेक हिंदू मान्य करतात." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे, खंड ६, संपा. मा.फ.गांजरे, नागपूर, १९८२, पृष्ठ ४४



३

डॉ. आंबेडकरांचा आधुनिक मराठी साहित्य विषयक विचार

अव्वल इंग्रजी कालखंडानंतर निर्माण झालेल्या साहित्याला आधुनिक साहित्य संबोधले जाते. मराठीत जसा इंग्रजी राजवटीनंतरचा कालखंड गृहीत धरला जातो तसाच इतरही भारतीय प्रादेशिक भाषातील साहित्यामध्येही हाच कालखंड आधुनिक म्हणून समजला आहे. या राजवटीनेच भारताला पोस्ट, तारायंत्र, आगगाडी, विद्यापीठ, महाविद्यालये, शिक्षण, समान कायदा व ज्ञान-विज्ञाने दिली. जीवनाकडे बुद्धिवादी, विवेकवादी दृष्टीने पाहण्याची शिकवण दिली. विविध शास्त्रे व पुरातत्व विद्येचा अभ्यास करण्याची प्रेरणा दिली. म्हणून आधुनिक मराठी साहीत्याचे स्वरुप फुले, लोकहितवादी, आगरकर, रानडे, व डॉ. आंबेडकर यांच्या विचाराने साकार झाले. आणि या विचार परंपरेला थोपवून धरण्याचा निकराचा प्रयत्न करणाऱ्या धर्मांध शक्तीनेही आपल्या प्रतिगामी जीवनदर्शनानेही साहित्य प्रवाह निर्माण केला. डॉ. आंबेडकरांच्या आंदोलनाने व साहित्य मीमांसेने मात्र समग्र आधुनिक चिंतनालाच एक नवे वळण दिले. त्यांच्या चिंतनातून एक साहित्य चळवळच जोमाने फोफावत गेली. त्यांच्या समीक्षा-चिंतनाचे स्वरुप 'आंबेडकरवाद' या

नावाने आज अभ्यासले जाते. त्यांचा साहित्य विचार हा आधुनिक साहित्याचा मापदंड ठरला आहे. एवढी मान्यता त्यांच्या विचाराला प्राप्त झाली आहे.

आधुनिक मराठी साहित्य हे प्रामुख्याने वैदिक ब्राह्मणी साहित्याचा आशय घेऊनच विकसीत झाले आहे. वेद, उपनिषदं, गीता, रामायण, महाभारत या ग्रंथावर व उपकथानकावर भाष्य करीत प्रकटले आहे. त्यामधील व्यक्तिरेखांचेच चारित्र्य नव्या वातावरणात उभे केले आहे. आरंभीचे नाटक, कादंबरी, कथा, निबंध यांनी प्राचीन मध्य युगीन विचाराचेच उद्घाटन केले. पुराण वाङ्मयावर आधारलेल्या 'ययाती' सारख्या कादंबरीचा गौरव आधुनिक मराठी साहित्य म्हणून ज्ञानपीठ पारितोषिकाने केला आहे हे चित्र मराठी भाषेतीलच नसून इतर प्रांतीक भाषातील साहित्याचेही आहे. मध्ययुगीन ब्राह्मणी कथानकं व सरंजामी विचार आधुनिक साहित्याचा विषय म्हणून झपाट्याने साहित्यात प्रकट होत आहे. नवे तंत्रज्ञान व आधुनिकतेच्या नावाने जुन्याच आशयाची वाङ्मय निर्मिती होते आहे. या साहित्याला आधुनिक कसे म्हणावे? ज्यात सरंजामी मूल्य विचार आहे? ज्यात राजवाडे, त्यांचे पोषाख, राहणी व गरिबांचे शोषण करुन त्या श्रमांचा मोबदला न देता पुरोहीतशाहीलाच शरणागतीचे चित्रण आहे? लोकशाही विचार व गोरगरिबांचे कल्याण यांना पद्धतशीर फाटा दिला आहे? आशयाच्या मूल्यविचाराने आधुनिक साहित्याचा विचार झाला पाहीजे. आजच्या काळाच्या संदर्भानेच फक्त आधुनिकता मोजू नये.

डॉ. आंबेडकरांचा उदय हा भारतातील लोकशाहीवादी विचाराला कुटूंबात व समाजरचनेत रुजविणाऱ्या विचारवंताचा उदय आहे. समाजातील उपेक्षित व्यक्ती व त्यांच्या साहित्याला नवा इतिहास प्राप्त करुन देणाऱ्या लेखकाचा उदय आहे. जे बहिष्कृत जीवन आहे त्याला मानवतेच्या पातळीवरुन समानदर्जा देणाऱ्या क्रांतिकारकाचा उदय आहे. त्यांच्या विचारात व कृतीत खऱ्या अर्थाने आधुनिक मूल्य जाणीवा काठोकाठ भरुन वाहत आहेत. त्यामुळे त्यांचा साहित्य विचार लेखकांना आपल्या कलाकृतीला मार्गदर्शक तत्व म्हणून साकार झाला आहे.

दलित साहित्य चळवळीने डॉ. आंबेडकरांचा विचार प्रेरणास्थान मानले

आहे. त्यांच्या विचार संस्कृतिचेच दलित साहित्य संवर्धन करीत आहे. डॉ. आंबेडकरांच्या प्रतिभेने समग्र भारतीय समाज ढवळून काढला. त्याचप्रमाणे मराठी साहित्याबद्दलही स्वतःची भूमिका मांडली आहे. साहित्य समीक्षेला स्वतःच्या चिंतनातून एक नवी दिशा दिली आहे. त्यांच्या साहित्य विचारातून समाज व जीवन याचे विराट दर्शन घडते. त्या मानवी जीवनातील समताधिष्ठीत विचार जाणिवांची परिवर्तनवादी बीजतत्त्वे कलावंताने मांडली पाहिजे ही बांधिलकी दिसते.

डॉ. आंबेडकर हे भारतातील युगप्रवर्तक प्रतिभेचे महान तत्त्वज्ञ लेखक होते. त्यांनी निर्माण केलेली ग्रंथसंपदा विपुल आहे [१]. हजारो वर्षापासून अस्पृश्य लोकांचा एक मोठा वर्ग आर्थिक व सामाजिक अधिकारापासून वंचित केला होता. त्याला विद्रोही चेतना डॉ. आंबेडकरांनी दिली. आणि त्यांच्याच माध्यमाने बुद्ध विचार क्रांतीतून नवे परिवर्तन आणले. हे परिवर्तन वैचारिक क्रांतीचे आहे. लोकशाही सांस्कृतिक जीवनदर्शनाचे आहे. त्याचप्रमाणे कला-साहीत्यविषयक जीवनदृष्टीचे आहे.

प्राचीन भारतीय साहित्यावर जसे डॉ. आंबेडकरांनी भाष्य केले त्याचप्रमाणे आधुनिक साहित्याचीही मीमांसा केली. त्या विश्लेषणातून त्यांचा साहित्यविचार निराळे रुप घेऊन प्रकटला आहे. त्यांनी मांडलेला साहित्यकला विषयक विचार व समाजरचनेतील वर्णव्यवस्था यांचा संबंध अनन्यसाधारण आहे. कला व वर्णव्यवस्था यामधिल नाते त्यांनी स्पष्ट केले. वर्णव्यवस्थेच्या परिणामाने आमचे साहित्य जीवन नष्ट झाले. त्याला जी समृद्धता प्राप्त व्हावयास पाहिजे होती, ती झाली नाही हे सूत्र त्यांनी मांडले. त्यामुळे एका नविन दृष्टीचा प्रवेश साहित्य समीक्षेच्या चिंतनात झाला आहे.

---

१. भी. रा. आंबेडकर यांच्या काही ग्रंथाची नावे.

१. रानडे गांधी आणि जीना २. जाति निर्मूलन ३. अस्पृश्य मुळचे कोण ? ४. शुद्र पूर्वी कोण होते? ५. थॉटस ऑन पाकिस्तान ६. बहिष्कृत भारतातील अग्रलेख ७. बहिष्कृत भारतातील स्फुट लेख ८. बुद्ध आणि त्यांचा धम्म ९. डॉ. आंबेडकरांची भाषणे खंड १ ते ७. १०. डॉ. आंबेडकर रायटींग अण्ड स्पिचेस खंड १ ते १० इत्यादी.

वर्णव्यवस्थेने व जातीसंस्थेने साहित्य-कला जीवन नष्ट केले हे त्यांच्या समग्र चिंतनातून मांडले गेलेले प्रमेय आहे. जातीव्यवस्थेने भारतीय प्रत्येक व्यक्तिला जातीनिहाय पद्धतीची संवेदना दिली. एक जात दुसऱ्या जातीपेक्षा श्रेष्ठ-कनिष्ठ भावना आपल्या अनुभवातून व्यक्त करीत असते. जातीच्या जोडीला कालपर्यंत अस्पृश्यताही सक्रीयपणे पाळली होती. त्यामुळे साहित्याची उदात्त मूल्ये उदयास आली नाहीत. साहित्य हे फक्त मनोरंजनाच्याच पातळीवर प्रकट होत राहीले. लेखकाची जीवनदृष्टी जातीच्यापलीकडे जात नव्हती. दास्यात बुडलेले लोक-समूह लेखकांना दिसत नव्हते. आर्थिक व सामाजिक रुढीत बंदिस्त झालेले लोक-समूह नरकयातना जगत असतांनाही वर्णव्यवस्थेचा पगडा घेऊन लेखक लिहीत होता. असे कवी-लेखक का करीत होते? कारण या तत्त्वाच्या बुडाशी ब्राह्मणी हिंदु धर्माचा संस्कार होता. डॉ. आंबेडकरांनी युरोप आणि जगभरच्या लेखकांचे वाङ्मय वाचले होते. त्यामुळे त्यांना भारतीय साहित्य समृद्ध कसे होईल? हा ध्यास त्यांच्या चिंतनात प्रकट झालेला आहे.

आमचा व्यापारी बंधू साहित्य कलाप्रेमी का नाही? श्रीमंत वर्ग पैसा गोळा करुन पूजा करतो . परंतु शिल्पकला, चित्रकला, साहित्य या महान संवेदनेवर जीवापाड प्रेम करीत नाही. घरात टॉलस्टॉय, गोर्की, चेखव, शेक्सपियर, हरि नारायण आपटे, आगरकर, फुले यांचे ग्रंथ अथवा कादंबरी संग्रही ठेवत नाही. पिकासो, हुसेन, भाऊ समर्थ इत्यादींचे पेंटींग घराच्या भिंतिवर टांगत नाही. याचे कारण त्याला वर्णव्यवस्थेने व्यापार आणि व्यापारच करण्याचा संस्कार केला. साहित्य कला हे आपले काम नाही. अशा हेतूनेच तो इतिहासात वागत आला आहे. शुद्राने शेतीचे काम करण्याच्यापलिकडे पाहू नये. अस्पृश्याने घाण काम करीत जन्म वेचावा. या वर्ण-जाती संस्कारामुळे आंबेडकरपूर्व काळात ब्राह्मणेतर वर्गातून लेखक फारसे निर्माण झाले नाहीत. मुसलमान आक्रमणामुळे घाबरलेला तत्कालीन समाज थोडाकाळ संत साहित्यात लिहू लागला. हा अपवाद म्हणजे आलेल्या संकटामुळे झालेली गट्टी होय. नंतरच्या पंतसाहित्यात अस्पृश्य लेखक दिसत नाहीत. कारण मुसलमान राजवटीनेही ब्राहमणी धर्माची वर्णव्यवस्थेचे

शोषण व अस्पृश्यता सर्रास पाळली. त्यामुळे साहित्य-कला जीवनाच्या समृद्धतेवर परिणाम झाला. जेव्हा डॉ. आंबेडकरांनी वर्णव्यवस्था व जातीसंस्था मोडून टाकण्यावर भर दिला तेव्हा कुठे स्वतंत्र भारतात नवसाहित्य (दलित साहित्य, जनसाहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य) चळवळीच्या माध्यमातून नवा लेखकांचा वर्ग निर्माण झाला. साहित्य कलाकृती जन्मास येऊ लागल्या.

आजही ब्राह्मण समाजात साहित्य-कला संगीत-नाटक इत्यादी विषयी जी कलाभिरुची आढळते तशी ब्राहमणेत्तर समाजात व्यापक प्रमाणात आढळत नाही. अलीकडे ती हळूहळू वाढीस लागली आहे. बहुजन समाजात कला-वाङ्मयात अभिरुची का नाही ? कारण त्या व्यक्तिंना पोट भरण्याच्या पलीकडे पाहण्याची फारशी परवानगीच धर्मानि दिली नाही. तो काही प्रमाणात तमाशा, सोंगं, नाटक आपल्या वस्तीच्या पातळीवर करीत होता आणि पहात होता. परंतु त्याला वर्णव्यवस्थेची बंधनं होती त्यामुळे त्याची सिंधु संस्कृतीतील लोकनाट्याची कला विकसीत झाली नाही. बुद्ध काळात त्याने शिल्पकला, चित्रकला, साहित्य इत्यादी द्वारे आपला कलाविष्कार दाखविला परंतु तो सुद्धा नष्ट केला. वर्णव्यवस्था त्यांच्या जन्मावरच लादली. आणि त्याच्या रसिकतेचे व संवेदनशिल्पाचे अपहरण केले. वर्णव्यवस्थेचे साहित्य कलेवर झालेले दुष्परिणाम अक्षम्य आहेत. म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपल्या साहित्य विचारातून साहित्य आणि जातीसंस्था यांचे परस्पर काय परिणाम घडले ते प्रथमच सांगितले. आणि साहित्य समीक्षेची दृष्टी आपल्या चिंतनाद्वारे मांडली. ते म्हणतात - " आपल्याकडे व्यापारी किंवा धनिकवर्ग यांच्यामध्ये रसिकतेची दृष्टी असत नाही. हा त्यांचा दोष असत नाही. चातुर्वर्ण्याचा आहे. चातुर्वर्ण्यनि जे वर्णभेद पाडले आहेत. त्यात कोणी काय करावं याचा खुलासा केला आहे. ब्राहमणांनी संस्कृती आणि कला याचं संवर्धन करावं, वैश्य लोकांनी पैसा कमवावा असे हे धार्मिक समजले जाणारे नियम असल्यामुळे प्रत्येकजण ठराविक ठशानं जीवनाकडे पहात असतो. त्यामुळं त्यांच्यातील रसिकता मेली आहे. आपल्याकडे

कर ायी ज़ी अनास्था दिसून येते याचं कारण चातुर्वर्ण्य आहे. चातुर्वर्ण्यामुळे हि- र्मातील लोकांच्या रसिकतेचेही अपहरण झालं आहे २"

डॉ. आंबेडकरांनी साहित्य समृद्धतेला हानीकारक ठरलेले तत्व (नियम) चातुर्वर्ण्य आहे हे समाज व्यवस्थेतून शोधून मांडले. लोकजीवनावर झालेले जातीसंस्थेचे दुष्परिणाम सांगितले. धर्मविचार लोकमानस संस्कारीत करते. व्यक्ती व लेखकांचेही मानसशास्त्र घडविते. भारतीय जनतेच्या मानसशास्त्राला वणनि घडविले. त्यामुळे कथा-कादंबरीमधील संवाद व व्यक्तिरेखाही नेमके तेच संस्कार बोलतात. त्यामुळे त्याच धाटणीचा साहित्य-कला विचार दृष्टी नवी आहे. मराठी साहित्य समीक्षेत क्रांतिकारी आहे.

आधुनिक साहित्यात ज्या समीक्षापद्धती रुजल्या. त्यापेक्षा आंबेडकर समीक्षा पद्धती निराळी आहे. याच साहित्य विचाराला दलित साहित्य समीक्षेने स्वीकारले आहे. त्यामुळे आजची समीक्षा आंबेडकरवादी साहित्याने समृद्ध केली आहे. मराठी साहित्य आणि भारतीय साहित्य जीवनात मार्क्सवादी, अस्तित्ववादी, ब्राह्मणवादी, कलावादी, जीवनवादी इत्यादि साहित्य विचार प्रवाह आहेत. मराठी साहित्यातील कलावाद, जीवनवाद, मार्क्सवाद, अस्तित्ववाद हे अंतिमतः ब्राहमणवादाच्या समाज चौकटीतच अभिव्यक्त झाले आहेत. या विविध विचार प्रवाहांनी वेद-गीता, रामायण-महाभारत याच ग्रंथांतील वर्णव्यवस्था विचार वंदनीय मानून आधुनिक मराठी साहित्य समीक्षेचा व विचाराचा संसार सजवला. डॉ. आंबेडकरांनी दलित शोषीत माणसाच्या समग्र पातळीवरचे शोषण नष्ट करण्यासाठी ग्रंथांनी केलेले शोषण नाकारावयाचे सांगितले. जुन्या विचाराच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्याशिवाय नवी संवेदना, नवा माणूस घडणार नाही म्हणून वर्णव्यवस्था लादणाऱ्या ग्रंथाची परखड मीमांसा केली. आणि ज्यांना गुलामगिरीत राहावयाचे नसेल त्यांनी बंड केले पाहिजे व स्वतःचे 'स्वातंत्र्य' जगले पाहिजे त्यासाठी त्यांनी 'संघर्ष' हे जीवनमूल्य मांडले.

---

२. आंबेडकर भी.रा., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड ९, ले.चां.भ. खैरमोडे मुंबई, १९८७, पृष्ठ २३

इतर शोषणाप्रमाणे ग्रंथसुद्धा मानसिक पातळीवर गुलाम ठेवण्याचे कार्य करतात. म्हणून डॉ. आंबेडकर म्हणतात -"ज्याच्याशी तुम्ही दोन हात करावेत असा तुमचा शत्रू जाती पाळणारे लोक नसून ज्या शास्त्रांनी लोकांना जातीधर्म शिकविला ती शास्त्रे तुमचा शत्रू होत हे उघड आहे". [३] आणि म्हणून साहित्य हे सुद्धा शोषण नष्ट करण्याचे एक हत्यार आहे. ते जसे शोषण बिंबविते व तशीच शोषणाधिष्ठीत भावनाही घडविते. त्याचप्रमाणे ते मानवतावादी भावनाही घडविते. मानवी भाव भावनामध्ये बदल घडवून आणू शकते. म्हणूनच वामन निंबाळकरांनी शद्वानीच पेटतात घरे, दारे, माणसेसुद्धा हा आंबेडकर प्रेरणेतूनच विश्वास व्यक्त केला आहे. दलित साहित्याने आंबेडकरांच्या साहित्य विचारामुळे आपल्या साहित्यातून विराट मानवतेचे दर्शन घडविले आहे. आणि दलित साहित्य चळवळीनंतर जन साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य चळवळींचा उदय झाला आहे. प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या या चळवळीच्या मूलप्रेरणा फुले-आंबेडकर विचारच आहे. दलित साहित्य चित्रणाच्याच त्या चळवळीतील साहित्य जाणीवा आहेत.

आधुनिक मराठी साहित्य हे प्रामुख्याने दोन विचारप्रवाहात विभागले गेले आहे. एक विष्णूशास्त्री विपळूणकर, टिळक, याचा परंपरावादी विचारप्रवाह. आणि दुसरा फुले, लोकहितवादी, आगरकर हा समाज सुधारणावादी प्रवाह. या दोन विचारप्रवाहांनीच मराठी कथा, कादंबरी, कविता, नाटक हे वाङ्मयप्रकार साकार झाले आहेत. आंबेडकर पूर्व काळात टिळक विचार प्रवाहाचा चांगलाच बोलबाला होता. प्रस्थापित सवर्ण एकजुटीने टिळकाच्या मागे उभे होते. कारण टिळकांना वर्णव्यवस्थावादी समाजरचनाच हवी होती. पेशव्यांचे आणि फक्त पेशव्याचे राज्य पुन्हा हवे होते अशीच नोंद इतिहासात आहे. आगरकर, लोकहितवादी बाहमण कुटुंबात जन्मास येऊनही त्यांनी स्त्रीयांना शिक्षण मिळावे, अस्पृश्यता जावी, विधवा विवाह व्हावे, बाल

---

३. आंबेडकर भी. रा. जातिभेद निर्मूलन, अनु. मा.फ. गांजरे, नागपूर, १९७०, पृष्ठ ५९

जरूर विवाहाला बंदी द्यावी, इंग्रजी विद्या शिकावी, माणसाने बुद्धी-विवेकवादी व्हावे म्हणून समाजसुधारणेचा पक्ष घेतला आणि लेखन केले. मराठी साहित्याने व समीक्षकांनी टिळकांच्या विचाराचेच समर्थन केले. आगरकर लोकहितवादी यांच्या विचाराची उपेक्षा केली, त्यामुळे सामाजिक प्रबोधनाला खिळ बसली. आजच्या काळाने फुले. लोकहितवादी, आगरकर यांच्याच विचाराचा गौरव केला आहे. परंतु पारंपरिक मराठी लेखक व समीक्षा कलावादी, कलावादी हा जप करीत करीत चिपळूणकर टिळक परंपरेचाच गौरव करतात. डॉ. आंबेडकरांनी मात्र साहित्य विचाराचे नाते हे समाजाशी असते. म्हणून बहुजनांचे हीत लक्षात घेऊन साहित्य निर्माण झाले पाहिजे. हा विशाल समाज हिताचा दृष्टीकोन व दिशा ओळखून लोकहितवादींच्या परंपरेचा गौरव केला. लोकहितवादींची 'शतपत्रे' आपल्या मुखपत्रातून (जनता) छापली आणि आधुनिक साहित्यात फुले लोकहितवादी विचारपरंपरेचा गौरव केला. "टिळक परंपरेचे अंतरंग" या लेखात ते म्हणतात -"समाज सुधारणेचे कार्य अराष्ट्रीय होय अशी विचारसरणी कै. टिळकांनीच प्रचलित करुन दिली. आज जे टिळक शिष्य म्हणवितात त्यांची हीच विचारसरणी आहे. काळ बदलल्यामुळे व मागासलेल्या वर्गात जागृती होऊ लागल्यामुळे त्यांना अर्थातच आपला पवित्रा बदलावा लागला आहे पण या परंपरेचा देहस्वभाव मात्र अद्याप बदलला नाही व सहजासहजी तो बदलेल अशी आशाही नाही" [४] अव्वल इंग्रजी कालखंडानंतर टिळक व आगरकर यांच्या विचारानेच मराठी साहित्याची जडणघडण झाली. केशवसुत या कविने "जुने जाऊ द्या मरणा लागूनी जाळून अथवा पुरुन टाका" असा आगरकरी विचार मांडला. हरि नारायण आपट्यांनी स्त्रीयांचे दुःख मांडून पारंपरिक कुटूंबातील स्त्रीयांवर अत्याचार करणाऱ्या मनुवादी विचाराचे व खलनायकी पुरुषांचे दृष्ट कृत्य मांडले. परंतु केशवसुत आपटे या सुधारणावादी विचाराला नेस्तनाबूद करण्यासाठी पुराण वाङ्मयावर आधारीत नाटकं, कादंबऱ्या

४. आंबेडकर भी.रा. बहिष्कृत भारतातील स्फुट लेख, संपा. रत्नाकर गणवीर - भुसावळ, १९८१, पृष्ठ १४१

यांचा जाणिवपूर्वक लेखकांनी पौराणिक साहित्याचा पूर आणला. आणि सुधारणावादी विचाराला शह दिला. त्यामुळे सर्वसामान्याच्या जीवनात प्रबोधनाला गती आली नाही. प्रबोधन मागे गेल्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या करुणेला व बुद्धिला पटले नाही. त्यांनी सुधारणावादी साहित्य प्रवाहाला उचलून धरले आणि खोट्या परंपरेवर टीका केली. सुधारणावादी विचाराला प्राधान्य दिले गेले असते तर आज समाजात चांगले परिणाम दृष्टीस पडले असते. आधुनिक साहित्यातील सुधारणावादी व परंपरावादी हा संघर्ष डॉ. आंबेडकरांच्या मनावर परिणाम करुन गेला आणि त्यांनी मूलभूत भाष्य केले ते म्हणाले -"लोकहितवादींची परंपरा जर महाराष्ट्रत चालली असती तर आपले सामाजिक प्रश्न आजच्याइतके सोडविण्याला कठीण होऊन बसले नसते. पण दुर्दैवाने टिळक चिपळूणकर परंपरा टाळ्यांच्या कडकडाटात पुढे आली व लोकहितवादिंची धिम्मी व कार्यक्षम परंपरा मागे पडली याचे परिणाम आजवर महाराष्ट्राने भोगले आहेत व अजूनही त्यातून त्याची सुटका झाली नाही" [५] महाराष्ट्रातील समाज जीवनाला काय अथवा भारतीय समाज जीवनाला काय सामाजिक-आर्थिक प्रश्न सुटलेले हवे आहेत. सामाजिक न्यायाची अजूनही गरज आहे आणि म्हणून अनेक लेखकांनी फुले-लोकहितवादी यांची विचार-परंपरा गतीमान केली पाहीजे; हे मूलतत्व डॉ. आंबेडकरांच्या आधुनिक साहित्य विचारात विखुरलेले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात चिपळूणकर, टिळक, सावरकर यांच्या ब्राह्मणवादी साहित्य विचारातून आधुनिक मराठी साहित्य फारसे बाहेर पडले नाही. सवर्ण लेखकांनी विज्ञान स्वीकारले परंतु वैज्ञानिक दृष्टी स्वीकारली नाही. त्यांच्या साहित्यातून अजूनही जातीयवादी विचारांचाच प्रभाव व्यक्तिरेखांवर आहे. अजुनही एका विद्यापीठाला आंबेडकरांचे नाव देण्याचा मुद्या जीवनात आंदोलन होऊनही सुटत नाही. जीवनाचा सबंध साहित्याशी असल्यामुळे जीवनातील मंडल आयोगाच्या समतेच्या प्रेरणा, राखीव जागांच्या विषमता दूर करणाऱ्या प्रेरणा,

---

५. तत्रैव - पृष्ठ १५३

नामांतराच्या बुडाशी असलेली बंधुभावाची भावनात्मक प्रेरणा साहित्याचा विषय व्यापक पातळीवर होऊन प्रकटल्या नाहीत. डॉ. आंबेडकरांची धम्मविचाराची महान क्रांती कादंबरीचा विषय होऊन विपुल साहित्य निर्माण झाले नाही. याचे प्रमुख कारण आमची पारंपरिक जीवनदृष्टी आहे. या शोषणाधिष्ठीत जीवनदृष्टीच्या ठिकाणी लोकशाही मूल्याधिष्ठित साहित्य निर्माण झाले पाहिजे; म्हणून त्यांनी परिवर्तननिष्ठ जाणिवांचा आग्रह प्रतिपादन केला.

आजही अस्पृश्यता व आर्थिक सामाजिक दास्याने भारतीय जीवनात थैमान मांडलेले आहे. अनेक अस्पृश्य जाती व आदिवासी लोक आधुनिक जीवनापासून हजारो कोस दूर आहेत. दुसऱ्या महायुद्धापेक्षाही वाईट परिणाम ते भोगत आहेत. परंतू त्याकडे दूर्लक्ष करुन आमचा साहित्य समीक्षक पाश्चात्य समाज जीवनावर झालेले परिणाम सांगत समीक्षा घडवितो आहे. अर्थात जगातील कोणत्याही लोकसमूहावरील अन्याय मांडला पाहिजे. परंतू त्यासाठी सभोवतालच्या लोकसमूहावरील अन्यायाकडे पाठ फिरविता कामा नये. दुसऱ्या महायुद्धाचे युरोपच्यालोकांवर अमाप अत्याच्यार झाले आणि तिकडील लेखक व्याकुळ झाला. त्याचे व्याकूळपण त्याच्या काव्याचे विषय झाले. साहित्याचे कथाविषय झाले आणि दूसऱ्या महायुद्धाच्या परिणामाचे प्रतिबींब साहित्य समीक्षेत पडले. तिकडील साहित्याचे अनुकरण करण्यात दंग असलेले आमचे लेखक सभोवतालची माणसे उष्ट्या पत्रावळीवरील अन्न वेचून खातात, त्यांचे दुःख त्यांना लिहावेसे वाटले नाही. पाणी पिण्यासाठी विहिरीला स्पर्श केला म्हणून अस्पृश्यांच्या पाठीवर व मनावर उमटलेल्या वळातील गोठलेले रक्त दिसले नाही. करोडोच्या संख्येने ब्राम्हणी धमनि माणसांचे अधिकार नाकारून हिटलरच्या गॅस चेंबरला लाजविणारी दुष्टता आदिवासी, अस्पृश्यांच्या वस्तीत आहे ती साहित्याला आढळली नाही. त्याकडे लक्ष ओढण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांच्या साहित्य विचाराने केले. आणि म्हणून त्यांना जन्माने ब्राम्हण असलेल्या चिपळूणकर, टिळकाच्या ब्राम्हणवादी विचारापेक्षा जन्माने ब्राम्हण असलेले लोकहितवादी आगरकर यांच्या प्रबोधवादी विचारांची परंपरा खऱ्या

अर्थाने भारतीय जनतेची हितचिंतक परंपरा वाटली. कारण त्यांनी केलेले विश्लेषण हे राष्ट्रीय लोकजीवनातून आलेले आहे. त्यांच्या अनुभवातून प्रकटलेले आहे. आणि म्हणून त्यांनी लोकहीतवादी व फुले यांच्या निबंध वाङ्मयातील क्रांतिकारिकत्व पुन्हा जनतेसमोर मांडले. लोकांना वास्तववादी साहित्यदृष्टी देण्याची गरज प्रतिपादन केली. व्यवहारातील अनुभव सरळ सरळ मांडून त्यांच्या जून्या जीवनाला व विचाराला आधुनिक तत्त्वाचे संस्कार करण्याचे सांगितले. त्यांच्या साहित्य विचारात सर्वहारा माणसाच्या जीवनाला बांधणारा लेखकच श्रेष्ठ आहे.आणि म्हणून त्यांनी लोकहितवादी साहित्य परंपरेचा गौरव केला. ते म्हणतात-"सरळ व असंदिग्ध भाषा, सडेतोड विचारसरणी, व भरीव व्यवहारज्ञान हे लोकहितवादींच्या लेखनाचे विशीष्ट गुण आहेत. आपल्यातील दोषांचे त्यांनी कोणचीही परवा न करता कठोरपणे अविष्कारण केले आहे. तत्त्वज्ञानाच्या निष्फळ गप्पांनी व तर्कशास्त्राच्या शद्बावडंबरी लपंडावांनी लोकांना भूलविण्या-झूंलविण्याच्या भरिस लोकहितवादी कधीच पडले नाही." ६ डॉ.आंबेडकरांचा साहित्य विचार हा गूढवादाला प्राधान्य देणारा नसून वास्तववादाला महत्व देणारा आहे. आजही मराठी साहित्य गीतेतील स्वर्ग, आत्मा या गूढकल्पनांना घेऊन व नियतीवादाला स्वीकारुन प्रकटते. जी. ए. कुळकर्णी यांच्या कथा याच नियतीवादाने साकार झाल्या आहेत. पारंपरिक साहित्य व त्याची समीक्षा ही अजुनही नियतीवादाच्या भोवऱ्यात फिरते आहे. पाश्चात्यांचा कलावाद,अस्तित्ववाद,सौंदर्यशास्त्र, मार्क्सवाद इत्यादी विवीध साहित्य विचाराला घेऊन जरी बोलत असले तरी त्यांनी जातियवादाची व ब्राम्हणी वाड;मयातील नियतीवादी व विषमतावादी विचार जोडीला घेऊनच मांडणी केली आहे. त्यामुळे भारतातील बहुजन समाजातून आलेल्या प्रबोधनवादी विद्यार्थ्याला हा साहित्य विचार आपला वाटत नाही. ऐंशी टक्के लोकांच्या संवेदनेचा वाटत नाही. कारण त्यामध्ये शोषितांच्या मानसशास्त्राला न्याय दिला नाही. आंबेडकरांचा शोषीत मानवी जीवनाला महान करणारा विचार आहे. समग्र मानवी जीवनाचा

---

६. तत्रैव - पृष्ठ १५२

कल्याणकारी विचार आहे आणि मानवतावादाचे खरे वाङ्मयीन मूल्य त्यांच्या दृष्टीत साकार झाले आहे.

डॉ. आंबेडकर हे समाज परिवर्तनाच्या लढ्यात कार्यमग्न असतांनाही ते वाङ्मयापासून दूर राहिले नाही. महाडचा सत्याग्रह असो, काळाराम मंदिराचा सत्याग्रह असो,गोलमेज परिषद असो, अथवा घटना समितीचे कामकाज असो या विवीध क्षेत्रातील कामाच्या गराड्यातही त्यांनी वाङ्मयावर अपार प्रेम केले. विवीध तात्त्विक ग्रंथ लेखन करित असतांनाही त्यांनी 'आशा प्रमोद'ला दिलेल्या मुलाखतीत कादंबरी लेखनाचा संकल्प जाहिर केला होता. परंतू कामाच्या व्यापामुळे त्यांच्या हातून ही साहित्य कृती निर्माण झाली नाही. त्या कादंबरीची प्रकृती कशी असती? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या साहित्य चिंतनात मिळते.

त्यां च्या सभोवतालच्या मराठी वाङ्मयाच्या जगात कलावादी व जीवनवादी हे वाद चांगले रंगत होते. आधुनिक साहित्यात सरळ सरळ दोन पक्ष दोन विचारसरणी घेऊन भांडत होते. या विचार कलहातून वाङ्मयीन विचार घुसळून निघत होता. शिकण्यासाठी साहित्य असावे की मनोरंजनासाठी असावे या वादावरही चांगली खडाजंगी झाली. १९४० पूर्वीचे आधुनिक साहित्य याच विचाराने भरलेले आढळते. १९४५ नंतर नवसाहित्यही जीवनवादी व कलावादी यांच्या पासून दूर राहिले नाही. आणि डॉ. आंबेडकर वाङ्मयातील विचारसरणी असो की जीवनातील विचारसरणी असो त्यामध्ये सामील होत होते. आधुनिक काळात संत साहित्यावर किंवा विठ्ठल-पंढरपूर यांच्यावर वाद असोत त्यासंबंधी आपली भूमिका मांडत होते. साहित्य विचाराची दिशा काय असावी? भारतीय जनतेला व समाजाला कोणत्या प्रकारचे साहित्य लेखकांनी द्यावे? साहित्यातील कलावाद अथवा जीवनवाद यापैकी कोणत्या प्रकारचे साहित्य श्रेष्ठ मानावे यावर त्यांनी आपले वेळोवेळी विचार मांडले. ते म्हणतात- "मनोरंजनासाठी मी कधीही काही वाचले नाही- वाचत नाही. कथा वाङ्मयापेक्षा इतर Solid वाङ्मय मी जास्त वाचलं आहे. शिकण्यासाठी मी वाङ्मय वाचतो मनोरंजनासाठी नाही." [७]

डॉ.आंबेडकरांचा साहित्य विचार हा लेखकाने लोकांचे थिल्लर मनोरंजन करावे असे तत्व प्रतिपादन करित नाही. ऐंशी टक्के भारतीय समाज दास्य भोगत असतांना लेखकांनी आपल्या हातातील लेखणीचे शस्त्र जीवनाला सुंदर व महान बनविण्यासाठी वापरले पाहिजे. अशा उच्च कोटीच्या तत्त्वांनी त्यांचा साहित्य विचार प्रकट झाला आहे.

आधुनिक मराठी साहित्यातील कलावाद आणि जीवनवाद हा वर्णव्यवस्थेची चौकट कायम ठेवून रंगलेले वाद आहेत. डॉ. आंबेडकरांचा जीवनवाद हा लोकशाही समाजवादाची विचारसरणी घेऊन प्रकटला आहे. समता, स्वातंत्र्य व बंधूभाव या मूल्यांनी त्यांचा विचार साकार झाला आहे. वर्णव्यवस्थेला शरण जाऊन जीवनवादाचे मूल्य सांगणारी चर्चा व वाद त्यांना नको होते. सामाजिक साहित्यिक चर्चा व वाद ब्राहमणी वाङ्मयाचे वर्चस्व कायम ठेवून रंगलेले त्यांना नको होते. शोषणाचा स्रोत ज्या ग्रंथानी मानवी मनावर संस्कारित केला तो उगम नष्ट केल्याशिवाय खऱ्या अर्थाने संवेदना व भावना बदलणार नाहीत. हे सूत्र त्यांच्या विचारात होते. गढूळ पाण्याचा उगम बंद केल्यांशिवाय समाजाच्या मनातून स्वच्छ पाणी वाहू शकत नाही म्हणून त्यांनी मूलभूत चिंतन मांडले. ही विचारसरणी प्रस्थापिताला जरी न पचणारी होती; तरी उद्याच्या आधुनिक भारताला व भारतीय साहित्याला महान करण्यासाठी सामोरे गेलेच पाहिजे. हे क्रांती तत्त्व त्यांच्या चिंतनात आहे. ब्राम्हणी धर्मातून बाहेर पडून व वर्णव्यवस्थेतील श्रेष्ठ कनिष्ठतेची चौकट नष्ट केल्याशिवाय खऱ्या अर्थाने जीवनवाद उभा राहू शकत नाही. पुराण वाङ्मयातील भाकडकथांपेक्षा त्यांना बुध्दाची ऐतिहासिकता हवी होती. भाकड पुराण साहित्याने मनाच्या केलेल्या जडणघडणीचे वाईट परिणाम झाले. त्यांचे ते दुष्परिणाम आता थांबले पाहिजे. लोकशाहीवादी व बुद्धाच्या तत्त्वज्ञानाच्या संस्काराने आपली वाङ्मयीनमूल्ये व जीवनमूल्ये उभी केली पाहिजे हे प्रमेय त्यांनी मांडले. ही श्रेष्ठ विचारसरणी उभी

---

७. आंबेडकर भी.रा., डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड ९ ले.चां.भ. खैरमोडे, मुंबई १९८७, पृष्ठ २१

करतांना जे जे ग्रंथ, रुढी, परंपरा, धर्म आडवे येत असतील त्यांची चिकित्सा करुन बाजूला सारले पाहिजे. या ध्येयवादानेच डॉ. आंबेडकरांची जीवनकृती व साहित्यकृती साकार झाली आहे.

डॉ. आंबेडकरांच्या समोर मराठी साहित्य होते. त्यांनी अनेक लेखक, कवी, नाटककार, कादंबरीकार वाचले. त्यामधील त्यांच्या मनाला प्रामुख्याने सुधारणावादी वाङ्मयच आवडले आहे. त्यांना त्याच वाङ्मयाबद्दल अमाप प्रेम आहे. सुधारणावादी साहित्य प्रवाह व पारंपरिक जातीयवादी साहित्यप्रवाह यांच्यापेक्षा त्यांना आधुनिक काळातील प्रबोधनाचे साहित्यच खरे राष्ट्रीय जीवनाचे साहित्य वाटत होते. भारतीय जनता ज्या जीवनरेषेवर जगत होती त्या पलीकडे युरोपचे जग गेले होते. भारतीय जनता सुद्धा त्यांच्यासारखी बुद्धीवादी व्हावी ही त्यांची तळमळ होती. म्हणून त्यांना सुधारणावादी साहित्य प्रवाहाची पुस्तके व लेखक श्रेष्ठ वाटतं होते. ते म्हणतात- "हरिभाउंचं वाङ्मय मी आधाशीपणानं वाचलं आहे. हरिभाउंच वाड;मय मला अतिशय आवडतं." [८] या त्यांच्या अभिरुचीतून सुधारणावादी विचाराने प्रेरित झालेल्या व आगरकरांच्या प्रेरणा घेऊन लेखन करणाऱ्या हरिभाऊ आपटे यांचे वाङ्मय त्यांना प्रिय होते. 'जुने जाऊ द्या मरणा लागूनी जाळून अथावा पुरून टाका ' असे काव्य लेखन करणारी केशवसुत परंपरा त्यांना प्रिय होती. मराठी कवितेत केशवसुत परंपरा व गद्यात लोकहितवादींचा निबंध, हरिभाऊ आपटे यांची कादंबरीची परंपरा मराठीत विकसीत व्हावी ही भावना त्यांची होती. आणि म्हणून त्यांनी फुले लोकहितवादीचा जीवन विचार हा साहित्य विचार जेव्हा झाला तेव्हा त्यांना अत्यंत आनंद झाला. आणि त्यांनी सुधारणावादी साहित्य विचाराचा गौरव केला. आज सुधारणावादी विचारच दलित साहित्याने अधिक क्रांतिकारी पद्धतीने मराठी साहित्यात मांडला आहे.

डॉ. आंबेडकर हे लिखीत साहित्याबद्दल जागृत राहून जसे समाजनिष्ठ वाङ्मय विचार प्रतिपादीत होते. तसेच ते मौखिक साहित्यातील जीवनाचा शोध

---

८. तत्रैव - पृष्ठ २१

घेऊन इतिहास मांडत होते. इतिहास आणि साहित्य यांचा अत्यंत जीव्हाळ्याचा परस्पर संबंध आहे. लिखीत ग्रंथांमधून शुद्र-अतिशुद्रांचा इतिहास रेखाटला नाही. जो पराक्रम साकार झाला होता तो जाणिवपूर्वक इतिहासकारांनी व लेखकांनी दुर्लक्षित केला. तो इतिहास बहूजन समाजातील अस्पृश्य, आदिवासी, ओ. बी. सी. वर्गातील स्त्रीपुरुषांनी आपल्या मौखिक गीतामधून जोपासला.त्या मौखिक साहित्याचा अभ्यास व्हावा म्हणून डॉ. आंबेडकरांनी प्रयत्न केला. आणि 'जुन्या वाङ्मयाचा जीर्णोद्धार' हा लेख त्यांनी २-८-५२ च्या जनता पत्रातून लिहीला. भारतातील सर्वहारा माणसाचा इतिहास व जीवन जाणीव याच लोकसाहित्यात साकारल्या आहेत. आधुनिक काळात लोकसाहित्याच्या आभ्यासाला चालना मिळाली आहे. आणि त्यामधून एक नवी साहित्य जाणीव साकार झालेली आढळते.

लोकसाहित्य हे भारतीय दलित, आदिवासी व बहूजन समाजातील व्यक्तींच्या संवेदना होऊन प्रकट झाले आहे लिखीत साहित्य हे प्रामुख्याने ब्राम्हण-क्षत्रिय यांच्या जीवनाचे, त्यांच्या कुटुंबसंस्थेचे व त्यांच्या ऐतिहासिक घडामोडींना घेऊन प्रकटले आहे. आणि त्यांच्या कृत्यांची वारेमाप स्तुती यात केली आहे. जातीसंस्था ही फक्त पाच टक्के वरिष्ठ लोकांचे हित लक्षात घेऊन बनविलेला समाजरचनेचा सिद्धांत आहे. तो जनमानसात रुजवण्यासाठी प्रचंड लेखकांची फौज जातीसंस्थेतील तत्त्वाचे समर्थन करु लागली. विपूल ग्रंथ निर्मीती करु लागली. त्यामुळे कथा-कादंबरी मधील नायक-नायिका, गौण पात्रे संवाद, वातावरण, त्या विचाराची निर्मीती परिणामकारक करण्यासाठी साहित्य साकार झाले. वरिष्ठ जातींनाच बेहिशेबी पद्धतीने मांडू लागले. व ऐंशी टक्के लोकांच्या जीवनावद्दल, इतिहासावद्दल न लिहिण्याची जणू शपथच त्यांनी घेतली. बहुजनातही शिक्षणाचा अभाव असल्यामुळे तो सुद्धा जसे पुरोहित, कीर्तनकार सांगेल तसेच खरे मानू लागला. आधुनिक इंग्रजी राजवटीने समान कायदा व शिक्षण दिले. आणि भारतीय समाजाच्या विकासाची दारे मोकळी झाली. साहित्याचे खरे मूल्यमापन सुरु झाले. डॉ. आंबेडकरांनी ब्राहमणी

वाङ्मयाचा जेवढा अभ्यास केला त्याला इतिहासात तोड नाही. त्या साहित्याचे स्वरुप स्पष्ट करतांना ते म्हणाले- "हिंदूंचे वाङ;मय जातीच्या वंशावळीने भरलेले आहे. त्यात एका जातीची उत्पत्ती श्रेष्ठ तर दुसऱ्या जातींची निर्मीती अत्यंत निकृष्ठ अशी दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. या जातीच्या साहित्यापैकी 'सह्याद्री खंड' हे एक कुप्रसीद्ध उदाहरण होय." [९] प्राचीन साहित्यातून वाहत आलेले वर्णव्यवस्थेचें तत्त्व आधुनिक साहित्यातही प्रकटले आहे. आजही शुद्र वर्णातील पाटील देशमुख हा कथा साहित्यात खलनायक म्हणूनच गणल्या जातो. अस्पृश्य -आदिवासी व्यक्तीरेखांनाही न्याय दिला जात नाही. खरच हा माणूस असा आहे का? या प्रश्नाचा शोध लिखीत साहित्यात मिळणे कठीण आहे. त्यांची संवेदना, जाणीवा, इतिहास, संस्कृती, आदर्श हे मौखिक साहित्यातून लोकसाहित्यातून मिळू शकतात. लोकगीते, ओव्या, सण, उत्सव, उखाणे, म्हणी, शेतातील गाणी यामधून बहूजनाचा इतिहास शोधण्याची प्रेरणा आंबेडकर देतात. अवतार कल्पनेत आर्य लोकांना त्यांनी दुष्ट कृत्य करुनही श्रेष्ठत्वाचे गुण चिकटवले. आणि मूळ भारतीय लोकांना वाईट म्हणून रेखाटून जनतेला सांगितले. परंतू मूळ भारतीय बहूजनांचे राजे व त्यांची राजवट चांगली होती. हे मौखिक साहित्याने ऐतिहासिक सत्य जोपंसले. म. फुले यांनी बळीराजा चांगला राजा होता म्हणून लोकसाहित्याच्या माध्यमातूने सांगितले. [१०] परकिय आर्य बटू वामनाने बळी राजा ठार केला परंतू त्या राजाला बहूजन स्त्रीयांनी त्याचे कर्तृत्व जोपासले. भाऊबिजेच्या दिवशी भावाला ओवाळतांना बहिण म्हणते- "इडापिडा जावो व बळीचे राज्य येवो" बटू वामनाची राजवट हे इडापिडा म्हणून या साहित्याने नोंद केली आहे. बुद्धपूर्व काळात सिंधु संस्कृतितील बळीराजासारखे राजे नष्ट केले. बौद्ध संस्कृतितील राजेही नष्ट करण्यात आले. जे जे बहुजन समाजाचा विकास व्हावा ही महान संवेदना बाळगत होते त्यांना वाईट म्हणून ब्राह्मणी

---

९. आंबेडकर भी.रा., जातिभेद निर्मूलन, अनु. मा.फ. गांजरे नागपूर, १९७०, पृष्ठ २७

१०. म.ज्योतीराव फुले, गुलामगिरी, म.फुले समग्र वाङ्मय मुंबई - द्वि. आ. १९८०

साहित्याने रेखाटले. मानवतावाद ही महान इच्छा बाळगली व जनतेला तसे जीवन उपलब्ध करून देणारा विचार केला की वर्णवाद्यांनी त्यांना नष्ट केले. व त्यांचा खरा इतिहास साहित्यातून विकृत मांडला. बौद्ध संस्कृती तेराव्या शतकापर्यंत भारतात समृद्धपणे नांदत होती. नंतर ती ब्राह्मणी धर्माने नष्ट करून तिला विकृत रूप दिले, त्याचे पुरवे आज इतिहासात मिळतात. बुद्ध विहारं, बुद्ध मूर्ती चैत्य ही ब्राह्मणी धर्माने मुसलमान राजवटीत ताब्यात घेतली. मुसलमानांनी बौद्ध भिक्षू ठार केले व काही चीन जपान मध्ये निघून गेले. तेव्हा बौद्धांची तीर्थक्षेत्रें ब्राह्मणी धर्माने घेतली. तेथे नवीन व जुनी गणपती, विठ्ठल, भैरव, इत्यादि नावाने मूर्ति बसविल्या. हा सगळा खोटा इतिहास आधुनिक काळापर्यंत लपून चालला. परंतु आधुनिक काळात पुरातत्त्व विभागाच्या संशोधनाने भारतीय बौद्ध संस्कृतीचा खरा इतिहास जनतेसमोर ठेवला आहे. आणि प्राचीन भारतीय जनतेचे अंतरंग उमगले आहे.

आधुनिक काळातील साहित्याने इतिहासाचे खरे संशोधन मांडले त्यामळे साहित्यातील कथा, कादंबरी व व्यक्तिरेखा वास्तवदृष्टीने रेखाटण्याची प्रेरणा वाढीस लागली आहे. महाराष्ट्रातील अनेक लेण्यांना ब्राह्मणी सांस्कृतीने 'पांडव लेण्या' म्हणून जनतेला शिकविले. बुद्धाच्या पाऊल चिन्हांना विष्णूची पावलं म्हणून पेश केले. नासिकच्या बुद्ध लेण्यांना पांडव लेण्या म्हणून शिकविले. महाडच्या बुद्ध लेण्याना पांडव लेण्या केले. डोंगरात कोरलेल्या सुंदर गुफांना राक्षसाच्या गुंफा म्हटले. आज भारतीय माणूस विचारी होत चालला आहे. आणि त्याला पुरातत्त्व विज्ञानाचे संशोधन, वैज्ञानिक दृष्टीकोन व फुले आंबेडकरांचे समाजचिंतन कारणीभूत ठरले आहे. मौखीक साहित्यानेही सत्य उद्घाटीत केले आहे. आदिवासी समाजाने बौद्ध संस्कृतीचे जतन केले आहे. ओरीसा प्रांतातील जंगलातील स्त्री - पुरूषांनी बौद्ध संस्कृती अजूनही गीतांतून मौखीकपणे जोपासली आहे. बौद्ध साहित्याचे व थोर अभ्यासक बाबू नरेंद्रनाथ बसू यांनी लोकसाहित्याच्या आधारेच हरपलेली बुद्ध संस्कृती आधुनिक साहित्यात नव्याने जनतेला दिली. वि.रा.शिंदे लिहितात, "त्यांना काही वृद्ध माणसे भेटली.

त्यांनी जुन्या बुद्धानुयायी पाल राजांची गाणी गाऊन दाखविली. अशारितीने ह्या ओसाड जंगलात विस्मृतिगर्तात दडवून गेलेल्या बौद्ध धर्माचा आकस्मित सुगावा लागल्यामुळे या बाबूंनी आपला शोध नेटाने चालविला" ११. बौद्ध साहित्य परंपरा मौखीक लोकसाहित्याने जोपासली त्याचप्रमाणे प्रामाणिक अभ्यासकांनी ऐतिहासिक वस्तुस्थितिचे सत्यस्वरूप व ब्राह्मणी परंपरेने विकृत केलेली रूपेही शुद्ध अथवा मूळ स्वरूपात आधुनिक साहित्यात मांडली. बौद्ध लेण्या, बुद्ध मूर्ती, बौद्ध साहित्याची मूळ रूपही मांडल्या जात आहेत. द.ग.गोडसे म्हणतात "जुन्नर जवळच्या लेण्याद्री येथील अष्टविनायक स्थानावर मध्ययुगात असेच एक आक्रमण झालेले आढळते. ते म्हणजे अष्ट विनायकांपैकी एक "गिरिजात्मक" या विनायकाचे ! लेण्याद्री येथील गिरिजात्मक हा एक गणपती एका प्राचीन बौद्ध विहाराच्या प्रशस्त दालनात स्थानापन्न करण्यात आला आहे" १२ या नव्या साहित्य संशोधनाने मराठी साहित्य समृद्ध होत आहे. आज या प्रामाणिक इतिहास संशोधनाची गरज ओळखून व्यापक पातळीवर अभ्यास झाला पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी म्हणूनच हरवलेल्या परंतु मौखीक स्वरूपात जोपासलेल्या साहित्याच्या अभ्यासला आपल्या विचारातून चालना दिली. ते म्हणतात - "जुन्या आणि नव्या मराठी वाङ्मयाचा परिघ तपासून पाहतांना हल्लीच्या चालू वाङ्मयातून काही प्रकारचे जुने वाङ्मय गळून पडले आहे. नव्हे नामशेष झाले आहे असे म्हणणे आतताईपणाचे होणार नाही, असे मला निश्चितपणे वाटते" १३ शुद्र -अतिशुद्रांचे अलिखित वाङ्मय हे स्वतंत्र आशयाने साकार झालेले आहे. डॉ. आंबेडकरांनी 'गाऱ्हाणे' हे जुने वाड.मय प्रकाशित करून साहित्य विचारला नवी दिशा दिली आहे. 'गाऱ्हाणे' या वाङ्मयात प्रामुख्याने अस्पृश्यांच्या संवेदना व जीवन आहे. चाळोबा ही देवता

---

११. वि.रा. शिंदे, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, मुंबई, १९७६, पृष्ठ ५५

१२. द.ग. गोडसे, समन्दे तलाश, पुणे, १९८१, पृष्ठ १२६

१३. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ६, संपा. मा.फ. गांजरे, नागपूर पृष्ठ ७०

राजाची असून तीची देवता म्हणूनच चित्रण आहे. तिला "घातलेल्या "गाऱ्हाणे' तून अस्पृश्यांच्या विचारांचे दर्शन मिळते. 'आनी गावगिरामाचे कल्याण कर'अशा ओळीतून मानवतावादाचे व्यापक तत्त्व या लोकसाहित्यातून जोपासले आहे...या गाऱ्हाण्यातील म्हणण्याची पद्धत ही लयतत्त्वाने ओथंबलेली आहे. मनाला भुरळ घालणारी आहे. त्यामधिल भाषासौंदर्याला त्यांनी महत्व दिले आहे. भाषासौंदर्य व लालित्य या तत्वाला त्यांनी वाङ्मयाचे अंग मानून त्याचे प्रतिपादन केले आहे. " लावणी आणि गा-हाणे ही कमी प्रतिची असे जरी मानले तरी लालित्य आणि नवलाई यांच्या दृष्टीने अशा प्रकारच्या वाङ्मयास कमी प्रतीचे मानता येणार नाही. हे वाङ्मय नाश झालेले पाहून मला खरोखरच मोठा खेद होतो. या वाङ्मयाचा संग्रह करण्याचा एकेकाळी माझा मानस होता. परंतु कार्य बाहुल्यामुळे ते कार्य मला तडीस नेता आले नाही." [१४]. डॉ. आंबेडकरांना साहित्य हे विविध अंगानी समृद्ध झाले पाहिजे हा ध्यास आहे. आणि त्यांनी उपेक्षित सर्जनाला साहित्याच्या दरबारात प्रतिष्ठीत करण्याची प्रेरणा दिली.

डॉ. आंबेडकरांनी क्रांतिकारी जीवनसंघर्षात हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्या वाचल्या. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळातही मराठी साहित्य वाचले. आपल्या क्रांतीलढ्याचे परिणामही अनेक लेखक कलावंतावर झाले. व त्यांनी आपल्या कलाकृतीमधून अस्पृश्यांचे प्रश्न रेखाटले. ग.त्र्यं.माडखोलकरांनी 'चंदनवाडी' ही कादंबरी अस्पृश्यतेच्या जीवनाला घेऊन लिहिली ती डॉ. आंबडकरांनी वाचली आणि आपले कादंबरी विषयक विचार मांडले. ते त्यांचे विचार म्हणजे कादंबरी समीक्षेचे आधारभूत विचार वाटावेत असे आहेत. ते म्हणतात - "आमच्या समाजात जी पात्रे या कादंबरीत आहेत ती त्या मानाने फिकी वाटली. मात्र आमच्या लोकांच्या वस्तीतले जे वातावरण तुम्ही वर्णन केलेले आहे ते बरेचसे वास्तव आहे. आमच्या लोकांच्या भावनांची तीव्रताही तुम्ही जिव्हाळ्याने व्यक्त केलेली आहे. कादंबरीच्या या भावनात्मक बाजूइतकीच तिची विचारात्मक बाजूही परिणामकारक आहे" [१५] डॉ. आंबेडकरांनी कादंबरी समीक्षा

---

१४. तत्रैव - पृश्ठ ७०

विचारात प्रामुख्याने पात्रे, वातावरण, वास्तव, भावनाची तीव्रता, जीव्हाळा, कादंबरीची भावनात्मक बाजू, विचारात्मक बाजू आणि परिणाम इत्यादि गोष्टींचा विचार केला आहे. 'चंदनवाडी' कादंबरीत दलित समाजातील पात्रे ज्या पद्धतीने रेखाटली ती आवडली नाहीत. त्यांना अन्यायाविरूद्ध तीव्र लढणारी माणसें हवी असावीत. वैचारिकतेसाठी संघर्ष देणारी पात्रे अभिप्रेत असावीत म्हणूनच त्यांना ती फिकी वाटली. कादंबरीमधिल पात्रे कंशी असावी? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या वैचारिक संघर्षात व आंदोलनात शोधले पाहिजे. जातीयता फक्त आर्थिक समृद्धता आली म्हणजेच नष्ट होईल असे नाही. ती मनातील भावनेमध्ये आहे. म्हणून कथा, कादंबरी यांनी चेतनेमध्येच परिवर्तन घडवून आणणारे संस्कार केले पाहिजे. "जात ही एक कल्पना मानसिक वृत्ती आहे म्हणून जातीचा विनाश भौतिक बंधनाचा विचर करण्याइतके सोपे नाही. भावनेमध्ये बदल घडवून आणणे असा त्याचा अर्थ आहे" [१६] डॉ. आंबेडकर यांच्या साहित्य विचारात मानसशास्त्रीय विश्लेषणाला प्राधान्य आहे. वाईट भावनेच्या जागी चांगली भावना निर्माण झाली पाहिजे हा आग्रह आहे. स्थितीवादी विचारापेक्षा परिवर्तनवादी विचाराचे समर्थन आहे.

आधुनिक कादंबरीमधिल व्यक्तिरेखांची चिकित्सा व विश्लेषण जसे आंबेउकरांनी उभे केले त्याचप्रमाणे महाभारत, रामायण या ग्रंथातील कृष्ण, राम या व्यक्तिरेखांचीही चिकित्सा केली. [१७] आधुनिक मराठी लेखकांनी राम व कृष्ण या व्यक्तिरेखा आदर्श म्हणून रेखाटल्या. ईश्वर या संकल्पनेच्या मापदंडाने उभ्या केल्या. डॉ. आंबेडकरांनी त्यांची श्रेष्ठ - उच्च कोटीतील कसोटीने व मानवतावादाच्या कार्यपद्धतीने तपासले तेव्हा त्यांनी त्यांच्याबद्दल वेगळे निष्कर्ष काढले. ते रिडल्स इन हिन्दुइझम या ग्रंथात मांडले आहेत. रामायण, महाभारत,

१५. ग.त्र्यं. माडखोलकर, व्यक्तिरेखा, नागपूर १९६६, पृष्ठ ३०९

१६. आंबेडकर भी.रा., जातिभेद निर्मूलन अनु. मा.फ. गांजरे, नागपूर, १९६० पृष्ठ ५८

१७. आंबेडकर भी.रा., रिडल्स इन हिन्दुइझम, मुंबई, १९८०

गीता या प्राचीन साहित्याचा आधुनिक साहित्य समीक्षेतही उदो उदो होतो. मूठभर लोकांच्या भावनेचा विचार करण्यापेक्षा ऐंशी टक्के बहुसंख्य लोकांच्या भावनेची कदर करून साहित्य लिहिले पाहिजे. परंपरेने पाऊस ईश्वर पाडतो. किंवा पृथ्वी स्थिर आहे सूर्य चालतो हे पौराणिकज्ञान असेल ते टाकून देऊन खरे अनुमानावर आधारलेले विज्ञान - ज्ञान स्वीकारले पाहिजे. त्यामध्ये काहीच गैर नाही. सत्याची कास साहित्य विचाराने धरली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. परंतु आधुनिक साहित्य प्राचीन पौराणिक ज्ञानाची कास का धरते? या प्रश्नाचे उत्तर त्यांचा साहित्य विचार देतो. "या वाङ्मयाने जी सामाजिक पद्धत सांगितली आहे ती आपणाला सर्वस्वी अनुकूल आहे व तिच्यामुळे आपले हित होत आहेम्हणून अशा पद्धतीला उचलून धरणे, जरूर आहे. त्याचप्रमाणे ही पद्धत ज्यांनी निर्माण केली ते आपलेच वाडवडील होते म्हणून त्यांचे महात्म्य गात राहणे जरूर आहे. यावद्दलची जाणीव ब्राह्मण पंडीत गृहस्थाच्या मनात अष्टौप्रहार जागृत असते त्यामुळे तो या वाङ्.मयातील सत्य शाधून काढण्याच्या अगर ते सत्य इतरांना शिकविण्याच्या भानगडीत पडू शकत नाही." [१८] म्हणून आजही मराठी समीक्षा लेखकांच्या जातीला लक्षात घेऊन त्याच्या पुस्तकाचे परीक्षण करते. डॉ. आंबेडकरांकच्या 'अस्पृश्य मूळचे कोण?' 'शूद्र पूर्वी कोण होते?', 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' इत्यादि ग्रंथावर विविध लेखकांनी फारसे विपुल लिहिले नाही. म. फुले यांच्या गुलामगीरी, शेतकऱ्याचा असूड या अक्षर ग्रंथावर विविध प्रकारे फारशी चिकित्सा केली नाही. डॉ. आंबेडकरांचा साहित्यविचार हा वाचकास व समाजाला सत्याच्या दृष्टीने विचार करण्यास प्रवृत्त करणारा आहे. जाती - धर्माच्या पलिकडे जाऊन चांगल्या विचार - ग्रंथांवर प्रेम करण्यास शिकविणारा आहे.

जगातील कोणत्याही भाषेतील साहित्य हे त्याच्या श्रेष्ठ सामाजिक जीवनदर्शनाने श्रेष्ठ ठरले आहे. आजचे आधुनिक साहित्य हे समाजवादी व लोकशाहीवादी जीवनमूल्यांनी श्रेष्ठ ठरले आहे. या आशयासोबत लालित्यही

---

१८. आंबेडकर भी.रा., शुद्र पूर्वी कोण होते, अनु. चां.भ. खैरमोडे, नागपूर पृष्ठ १७

महत्त्वाचे असते. डॉ. आंबेडकरांनी आयशाला जसे महत्व दिले त्याचप्रमाणे भाषासंदर्भाला महत्व दिले आहे. लेखकांनी ग्रंथ निर्मिती करतांना, साहित्य लेखन करतांना श्रेष्ठ सांस्कृतिक आशयाला मांडावे ; ज्यामध्ये बहुजन लोकांची कल्याणप्रद मूल्ये असली पाहिजे. बुद्ध संस्कृतितील प्रज्ञा, शील, करूणा या तत्त्वांची मांडणी असावी. आशय सांगतांना लालित्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. ते म्हणतात - "असा ग्रंथ करतांना त्याच्या भाषेकडे दुर्लक्ष होता कामा नये ग्रंथाची भाषा ही जिवंत व नारळी पाण्याइतकी मधुर अशी भासावयास हवी. या ग्रंथाच्या वाचनाने माणसाचो झोप उडून जाऊन त्याची विचारशक्ती जागृत झाली पाहिजे. या ग्रंथाची लेखनशैली ही प्रासादिक, सुगम, उत्तेजक व वाचकाची तंद्री लागेल अशा दर्जाची असावयास पाहिजे" [१९] ग्रंथामध्ये भरपूर लालित्य, वाचकाच्या मनाची पकड घेणारी मांडणी, अथवा शैली चांगली असली पाहिजे. आशय वर्णव्यवस्थेचे समर्थन करणारा असेल तर ते साहित्य कुचकामी आहे. गरिबांचा छळ किंवा गुलामगिरीचे समर्थन लालित्यपूर्ण असले तर ते साहित्य अमानुष आहे. अस्पृश्य, स्त्रीया व कामगारांचे दास्य दीर्घकाळ टिकविण्यास लेखकांची शैली मनाला भुरळ घालत असेल तर ते आशयशून्य अमानवतावादी साहित्य आहे. आजच्या आधुनिक काळात समता, स्वातंत्र्य, बंधुभाव या तत्त्वाचे साहित्य निर्माण झाले पाहिजे. भारताला बहुजनाच्या कल्याणकारी आशयाने साकार झालेले साहित्य हवे आहे. म्हणून फक्त 'लालित्य' किंवा 'घाट'याला प्राधान्य देऊन प्रतिगामी आशयाच्या साहित्याने मानवी समाजाचे नुकसान झाले आहे. माणसांच्या मानावर प्रतिगामी संस्कार करणारे साहित्य हे खरे साहित्य नाही. असेच त्यांचे चिंतन आहे. आणि म्हणून श्रेष्ठ - कनिष्ठ भाव पेरणारे वर्णव्यवस्थावादी साहित्य त्यांनी नाकारले. "मुक्तेश्वर ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान मला मान्य आहे असं नाही त्याचं जे वाङ्मय आवडतं ते केवळ भाषेच्या वैभवामुळे

---

१९. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड ६, संपा, गांजरे मा.फ.नागपूर, पृष्ठ ३३

तत्त्वज्ञानामुळे नव्हे" २० डॉ. आंबेडकरांच्या समारे प्राचीन वैदिक वाङ्मय, बौद्ध वाङ्मय, संत वाङ्मय होते. आधुनिक साहित्यिक काय लिहितात, त्यांच्या साहित्यामधील आशय कोणताआहे हे डॉ. आंबेडकरांनी मांडले आहे. स्त्रीयांच्या व बहुजनाच्या विकासाला प्राधान्य देऊन लिहिण्याऱ्या लेखकांची व त्यांच्या साहित्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. भाषेचे लालित्य व लोकशाहीवादी मूल्यआशय याचा सुंदर संगम साहित्यात झाला पाहिजे. कलाकृतीमध्ये जीवनदर्शनाप्रमाणे सौंदर्यदृष्टीही साकार झाली पाहिजे. जीवनाचे अस्सलपण त्याच्या लयतत्वाने आले पाहिजे. लेखकांनी लयतत्वाची फक्त कारागिरी करीत बसणे आणि सर्वसामान्याच्या प्रबोधन आशयाला पुळीच न रेखाटणे हे आबेडकरांना मान्य नव्हते. लोकशाही, समाजवादी व वर्णव्यवस्थेच्या शोषणाविरोधी समता तत्त्व हे कलाकृतींचे केंन्द्रस्थान असून त्यानुसारच लयतत्त्व, घाट व सौंदर्य, लालित्य आले पाहिजे असाच त्यांच्या साहित्य चिंतनाचा आशय आहे.

डॉ. आंबेडकरांनी भारतातील समग्र साहित्याचे वाचन केले. त्याचप्रमाणे अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, कायदा इत्यादी विविध विषयावर ग्रंथ निर्मिती केली. आधुनिक मराठी लेखकांनी विठ्ठल, पंढरपूरचा वाद चालविला त्यापासूनही ते वेगळे राहिले नाही. जीवनवाद व कलावाद असे वाद निर्माण करून लेखन केले त्यावरही आंबेडकर बोलले. समाज जीवनात जी राजकीय आणि समाजिक आंदोलनं पेटली त्यामध्ये ते सक्रीय राहिले. त्यांच्या चुकीच्या धोरणावंर टीका केली. सावरकरांनी हिन्दुत्वाचा सुरू केलेला जप हा शुद्र - अतिशुद्राला कायमचा कनिष्ठ दर्जा देणारा आहे. ब्राह्मण व शुद्र ही माणसाची सामाजिक अवस्था दृढ करणारी आहे. आपण सगळी माणसं सामाजिक दर्जानं सारखी असलो पाहिजे. सगळी माणसं नैसर्गिक दृष्ट्या समान आहेत. शुद्र-अतिशुद्राला समान न्याय हिन्दुत्वातून किंवा ब्राह्मणी धर्मतत्त्वांनी मिळणार

---

२०. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड नववा, ले.चा.भ.खैरमोडे, मुंबई, १९८७, पृष्ठ १७

नाही. इंग्रज येईपर्यंत कुठे न्याय मिळाला शुद्रांना ? अस्पृश्यांना कुठे मिळाला आहे ब्राह्मणी हिन्दुत्वाने? त्यांना शिक्षण मिळाले नाही. साहित्य - कला ही संवेदना त्यांची विकसित झाली नाही. म्हणून त्यांनी लोकशाही समाजवादी मूल्यांचे समर्थन केले. आणि त्या मूल्य विचाराला पूरक असलेला प्राचीन भारतीयांचा बुद्ध धम्म विचार आधुनिक भारतीयांना दिला. या त्यांच्या श्रेष्ठ कार्यामुळे सावरकर भांबावून गेले. वर्णव्यवस्थावादी सावरकर चुकीच्या टीका करू लागले. लोकांच्या मनात जातीयवादासारखी चुकीच्या विचारांनी दिशाभूल करू लागले. कारण त्यांना शुद्र - अस्पृश्य हे शद्व टाकूत 'माणूस' हे बिरुद लावणारी समाजरचना नको होती असेच दिसते. म्हणून त्यांनी आंबेडकरांच्या श्रेष्ठ बुद्ध धम्म विचारावर टीका केली. डॉ. आंबेडकरांनी सावरकर यांच्या लेखनांची बुद्धिवादी, विवेकवादी व ऐतिहासीक दृष्टीने मीमांसा केली. आधुनिक मराठी साहित्यात सावरकराचा सामाजिक दृष्टीकोन हिन्दुत्वाच्या श्रेष्ठ - कनिष्ठ विचाराने भरलेला असून निकोप नाही.

कोणत्याही चांगल्या विचाराला जात नसते. धर्म नसतो. राष्ट्र व प्रांत यांच्या सीमा नसतात तो विज्ञानासारखा असतो. जसे भारतीयांनी युरोपच्ये सर्व विज्ञान स्वीकारले तसेच चांगल्या विचाराचे असते. म्हणूनच भारतीयाचा बुद्धविचार चीन, जपान, सिलोन, वर्मा, यांनी स्वीकारला. आज बुद्ध विचारांचा स्वीकार जर्मन, इंग्लड, अमेरीका, रशिया स्वइच्छेने लोखो लोक जगभर अभ्यास करीत आहेत. असे असतांना सावरकरांनी डॉ. आंबेडकरांच्या बुद्ध धम्म विचारावर टीका केली. त्यांच्या या आधुनिक काळाचा संदर्भ असलेल्या व प्राचीन ब्राह्मणी विचाराने भरलेल्या निबंधाची डॉ. आंबेडकरांनी ऐतिहासिक पुराव्याने चिकित्सा केली. ते म्हणतात - "बुद्धधम्मवर बरेच लोक खोडसाळपणे टीका करतात. त्यापैकी सावरकर एक होत. भगवान बुद्धाचा जो अफाट भिक्षूसंघ होता त्यात शेकडा ७५% ब्राह्मण होते हे सावरकरांना माहीत आहे का? सारीपुत्त मोगलानसारखे पंडीत ब्राह्मण होते. हे सावरकरांनी विसरू नये. सावरकरांना मला असा प्रश्न विचारयचा आहे की पेशवे कोण होते ? ते भिक्षू होते काय ? मग

त्यांच्या हातून इंग्रजांनी राज्य का हिसकावून घेतले ? तेव्हा अशा नादान व बेजबाबदार लोकांच्या आपण नादी लागू नये. काही लोक म्हणतात सावरकर विष ओकले. पण मी म्हणतो सावरकर आपल्या पोटातील नरक ओकले. कुणी कितीही खोडसाळ टीका केली तरी माझा मार्ग निश्चित आहे. मी बुद्ध धर्म स्वीकारणार" २१डॉ. आंबेडकरांच्या जीवनमूल्यांतून व वाङ्मयीन मूल्यांमधून एका समताधिष्ठीत विचाराची मांडणी आहे. 'बहुजनहिताय - बहुजनसुखाय' अशा सूत्राचे उद्घाटन आहे. या सिद्धांतानेच भारतीय माणसांचे कल्याण होणार आहे. समाजातील विषमता तत्त्व व साहित्यातील विषमता तत्त्व नष्ट झाल्याशिवाय चांगला माणूस घडणार नाही. त्यासाठी सगळ्याच जाती - धर्मातून माणसे व लेखक कार्यरत झाली पाहिजे. आणि साहित्याचा मानवी प्रबोधनासाठी विचार केला पाहिजे. हे तत्त्व त्यांनी आपल्या कृतीतूनही सांगितले आहे.

डॉ. आंबेडकरांना काव्यावद्दल अमाप प्रेम होते. बहिष्कृत भारतातील अग्रलेखामधून अनेक कविंचे व कवितेचे संदर्भ मिळतात. घटनाशास्त्रापासून ते धर्मशास्त्रापर्यंत विहार करणारी त्याची प्रतिभा काव्याशीही रममाण होत होती. डॉ. आंबेडकरांचे महान क्रांतिकारी जीवन निश्चितच महाकाव्याचा विषय आहे. काव्याची भुरळ जशी महान क्रांतिकारांना पडली तशीच डॉ. आंबेडकरांनाही पडली होती. ते आपल्या महान संघर्षात कविता लेखन करू शकले नाहीत परंतु आपल्या वैचारिक निबंधात काव्यमय सुभाषिते लिहिली. त्यानी भावनेने ओथंबलेल्या ओळी लिहिल्या आहेत. आपल्या जीवनसंघर्षाने अनेक कविंना काव्यलेखनास प्रेरणा दिली आहे. दलित कविंनी त्यांच्यावर हजारोंच्या संख्येने कविता लिहिल्या आहेत. जीवन आणि काव्य यांचे नाते अफाट आणि अतूट असते. विलायतेवरून लिहिलेल्या पत्रात त्यांनी स्वतःबद्दल व काव्याबद्दल आपली

---

२१. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबसाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १, संपा. गांजरे मा.फ. नागपूर, १९६८, पृष्ठ २२८

संवेदना व्यक्त केली आहे.[२२] कवी केशवसुतांची कविता त्यांनी वाचली आणि 'तुतारी' या कवितेने त्यांना भुरळ घातली. कवि यशवंताचे काव्य लेखन त्यांनी वाचले आणि त्यांची 'आई' कविता त्यांना आवडली. त्यांनी प्र.के.अत्रे यांचे जसे विविध वाङ्मय प्रकार वाचून काढले तसेच कवितासुद्धा वाचली. त्यांचे विडबंन काव्य त्यांना आवडले. कवी केशवकुमार बद्दल ते लिहितात - "कवी केशवकुमार ह्या नावाने ते साहित्यभक्तांच्या परिचयाचे आहेत. औपरोधिक काव्य लिहिणारा त्यांच्या तोडीचा अन्य मराठी कवी नाही" [२३] साहित्य हे गंभिरतेने जसे साकार होते त्याचप्रमाणे ते औपरोधिकतेनेही लिहिले पाहिजे असेच तें सूचित करतात. भारतीय समाज जीवनात अनेक चित्र-विचित्र प्रथा आहेत, देवदेवता आहेत, त्यांचे वागणे - राहणे विसंगतिने भरलेले आहे. भारतीय जनता ते आदर्श म्हणून पूजा - अर्चा करीत संस्कार करून घेत आहेत. खरे तर आधुनिक काळात हे विकृत मनाचेच दर्शन नाही का ? कुणी तरी ते सुरू केले. प्राचीन काळातून वाहत येऊन आधुनिक काळात ते गतिमान झाले आहे. हे आधुनिक ज्ञान-विज्ञानात बसत नाही. तर्क व विवेक बुद्धिलाही पटत नाही. म्हणून लेखकांनी त्या शोषणावर कधी गंभिरतेने तर कधी औपरोधीक शैलीने लिहिले पाहिजे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी अशी शैली निर्माण केली होती. केशवकुमार

---

२२. आंबेडकर बी.आर. विलायतेहून बाबासाहेबांची पत्रे
संपा. रत्नाकर गणवीर, नागपूर, १९७६, पृष्ठ १२ - "माझा स्वभाव अगर वृत्ती काव्यमय (Romantic) नाही मी ही असेच समजतो पण माझा स्वभाव अगर वृत्ती काव्यमय नसल्या तरी माझा आयुष्यक्रम माझे जीवन म्हणजे एक अपूर्व व प्रचंड असे काव्यच बनत चालले नाही का? हिन्दुस्थानातील एक अस्पृश्याचे महाराचे पोर पुढे राउंड टेबल परिषदेत बसेल आणि राष्ट्राची भवितव्यता निर्माण करणाऱ्या घटनेत प्रामुख्याने भाग घेईल हे कोणाला तरी शक्य वाटले असेल का? कल्पनेची भरारी लुळी पडावी, तिलाही आकलन करता येऊ नये. इतकी ही घटना काव्यमय व चमत्कृतिपूर्ण नाही का? ज्याला काव्य उर्फ रोमान्स म्हणतात त्यात माझ्या आयुष्यक्रमापेक्षा अभूतपूर्व असे अधिकोत्तर तरी काय असू शकणार?"

२३. आंबेडकर भी.रा., बहिष्कृत भारत स्फुट लेख, उद्धृत डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र ले. धनंजय कीर, मुंबई, १९६६, पृष्ठ १४१

(प्र.के.अत्रे) यांनीही औपरोधीक शैलीने काव्यलेखन केले. या शैलीनेही साहित्य निर्माण झाले पाहिजे या विविध शैली पद्धती लेखकांनी आधुनिक साहित्य विचारासाठी वापरल्या पाहिजे अशीच डॉ. आंबेडकरांची समीक्षा आहे.

भारतात अस्पृश्य, आदिवासी हे आजही आर्थिक, सामाजिक दास्य भोगत आहेत. शुद्रसुद्धा साहित्य-कला व शैक्षणिक आर्थिक दृष्टीने मागासलेले जीवन जगत आहेत. त्यांच्यासाठी डॉ. आंबेडकरांनी 'शुद्र पूर्वी कोण होते' व 'अस्पृश्य मुळचे कोण?' हे ग्रंथ लिहून साहित्यिकांना उपेक्षित जीवनावर लेखन करण्याची प्रेरणा दिली आहे. आदिवासी जीवनातील दुःख नष्ट झाले पाहिजे म्हणून साहित्यिकांनी त्यांचे चित्रण केले पाहिजे. डॉ. आंबेडकरांनी आदिवासी जीवनाला आपल्या लेखनात मांडले. स्वातंत्रपूर्व काळात त्यांच समस्यांचे चित्रण केले. आणि आदिवासींच्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधले. "भारतात अजूनही अत्यंत पुरातन अशा असंस्कृत स्थितीत हे आदिवासी राहत आहेत. ही वस्तुस्थिती आहे. ते कवेळ मागासलेले आहेत एवढेच नाही तर त्यातील काहींना अजूनही असे धंदे करावे लागतात की त्यामुळे त्यांचा गुन्हेगार म्हणून एक वेगळा वर्ग तयार करण्यात आला. सुसंस्कृत लोकात राहणारे हे तेरा लाख लोक अजून सुद्धा रानटी स्थितीत राहतात. आणि वंशपरंपरागत गुन्हेगारांचे जीवन जगत आहेत! परंतु हिन्दुना याची कधी लाज वाटली नाही. हे असे दृश्य आहे की ज्याला जगाच्या पाठीचर तोड नाही ! या अशा लज्जास्पद गोष्टींचे कारण काय? या आदिवासींना सुधारण्याचा प्रयत्न का करण्यात आला नाही" २४ असा प्रश्न त्यांनी या देशातील अनेक चळवळींना विचारला. त्याचप्रमाणे साहित्यिकांनाही विचारला आहे. आणि साहित्य आणि आदिवासी समाज जीवनाचे महत्व प्रतिपादन केले आहे.

डॉ. आंबेडकरांचा साहित्य विचार हा शोपितांच्या प्रबोधनासाठी उदयास आलेला विचार आहे. त्यांनी केलेली साहित्य मीमांसा ही पारंपरिक

२४.आंबेडकर भी.रा., जातिभेद निर्मूलन, अनु. मा.फ. गांजरे, नागपूर, १९७०,पृष्ठ३१

समीक्षकापेक्षा भिन्न आहे. जीवनाला व साहित्याला वर्णव्यवस्थेवर उभे करणारे लेखक त्यांनी जसे नाकारले. तसेच त्यांचे साहित्यही नाकारले आहे. त्यांनी जीवन व साहित्य लोकशाही - समाजवादी विचारावर उभे करून त्याला बौद्ध संस्कृतीतील प्रज्ञा, शील, करूणा या मूल्यांचे अधिष्ठान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात साहित्यिकावर खूप मोठी उपेक्षित वर्गाची जबाबदारी आहे म्हणून त्यांनी मूलभूत चिंतनाची दिशा आपल्या समीक्षाविचारातून मांडली आहे. "आपण आपल्या जीवनाकडे कर्तव्यधर्माकडे आणि संस्कृतीकडे दुर्लक्ष करीत आहोत. थोडे अंतर्मुख होऊन विचार केलात तर आपली जीवनमूल्ये आणि सांस्कृतिक मूल्ये कशी करपून जात आहेत याचे भेसूर चित्र उभं राहील. कारणं काहीही असोत पण आपण अधःपतनाच्या, अवनतीच्या मार्गावरून जात आहोत असंच आढळून येईल. तेव्हा तत्परतेनं सावध होऊन जीवन व संस्कृतिविषयक मूल्ये साहित्यकारांनी जोपासली पाहिजेत, ती सतेज बनविली पाहिजेत, वृद्धिंगत केली पाहिजेत. तुमच्या कथा कादंबऱ्यातील सीता आता लक्ष्मणरेषा ओलांडून जात आहे ! दुर्योधनाच्या राजदरबारात द्रौपदीवस्त्रहरण होत आहे. आणि दुष्यंत शकुंतलेला ओळखं देत नाही. ती वनवासी होत आहे. म्हणून मला साहित्यकारांना आवर्जून सांगायचे आहे की उदात्त जीवनमूल्ये व संस्कृतिमूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित , मर्यादित ठेवू नका, ते विशाल बनवा. आपली वाणी चार भितींपुरती राखू नका तिचा विस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरतीच बंदिस्त करू नका. तिचं तेज खेड्यापाड्यातील गडद अंधार दूर होईल असं प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं फार मोठं जग आहे हे विसरू नका. त्याचं दुःख, त्यांची व्यथा नीट समजवून घ्या आणि आपल्या साहित्याद्वारे त्यांचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे" [२५] हा त्यांनी मांडलेला साहित्य विचार हाच आधुनिक भारतीय साहित्याचा गाभा म्हणून विकसित होण्याची

---

२५. ना.रा. शेंडे दलितांचे जग : वेदना आणि शिंष्टाई, नागपूर, १९७८
पृष्ठ ११६ - ११७

ऐतिहासीक गरज आहे. हा विचारच भारतीय साहित्याला जगात प्रतिष्ठीत करणारा आहे. डॉ. आंबेडकरांच्या साहित्य विचाराचे सूत्र आज दलित साहित्य, आपल्या विविध प्रकारातून मांडत आहे.

डॉ. आंबेडकरांनी आधुनिक मराठी साहित्यातील विविध वाङ्मयप्रकाराविषयी आपला विचार मांडला. विविध वाङ्मय प्रकारातील वैचारिक तत्त्वालाच प्राधान्य देऊन मीमांसा केली. हरिभाऊ आपटे, केशवसुत, कवी यशवंत, कवी केशवकुमार इत्यादिंच्या ललित साहित्या विषयीही विचार केला आहे. त्याचप्रमाणे लोकहितवादी, आगरकर, टिळक, चिपळूणकर, सावरकर यांच्या साहित्यावर भाष्य केले. आणि त्यामधिल सुधारणावादी परंपरेचा गौरव केला. 'रानडे, गांधी आणि जीना' या ग्रथांत रानडेंच्या साहित्याची व व्यक्तिमत्वाची मांडणी केली. म. फुले यांचे महान व्यक्तिमत्व आणि त्याचे कार्य यावद्दल त्यांना अमाप आदर होता. म्हणून त्यांनी म. फुले यांना गुरूस्थानी मानले. त्यांच्या साहित्य विचारचा गौरव केला. म. फुले यांच्या विचारापासून जनतेने दूर जाऊ नये. त्यांच्या साहित्यविचारामुळेच भारताचा विकास साधणार आहे. त्यांच्या साहित्यविचारानेच प्रत्येकाची संवेदना घडली पाहिजे हे मूलतत्त्व डॉ. आंबेडकरांच्या साहित्य विचारातून प्रकट झाले आहे.

डॉ. आंबेडकरांच्या साहित्य विचाराने व कार्याने आधुनिक साहित्यात मूलभूत प्रश्न निर्माण केले आहेत. साहित्य म्हणजे काय ? साहित्याचे प्रयोजन काय? साहित्याचे उद्दीष्ट काय असावे? साहित्यिकांनी कोणती दृष्टी आधुनिक साहित्यात रूजविली पाहिजे? भारतीय समाजातील बहुसंख्य लोकांचे जीवन व त्यांचे जगणे साहित्यिकांनी का रेखाटावी? वर्णव्यवस्थेने व जातीयवादाने घडविलेले श्रेष्ठ कनिष्ठतेचे संस्कार बंधुभावाचे आहेत का? वैदिक ब्राह्मणी साहित्यविचारांने अस्पृश्य, शुद्र, आदिवासी यांना पशूतूल्य जीवन दिले ते आजही गौरवास्पद म्हणणे बरोबर आहे का ? या ग्रंथातील प्राचीन गुलामगिरीचा आशय साहित्यात मांडणे की लोकशाहीवादी विचार रेखाटणे योग्य आहे? प्रबोधनवादी व समाजवादी विचार आधुनिक की स्वर्ग-ईश्वर-भक्ती हा

विषमतावादाचे पोषण करणारा विचार श्रेष्ठ? आज भारतीय जनतेला कोणत्या विचाराची गरज आहे. इत्यादी अनेक प्रश्नाबद्दल डॉ. आंबेडकरांनी मूलभूत चिंतन मांडले आहे. सुधारणावादी प्रबोधनवादी, जीवनवादी विचारानेच भारतीय समाजाचा विकास घडून येईल. म्हणून या परंपरेला गौरविले आहे. विषमतेने भरलेल्या जीवनाला सुंदर करण्यासाठी समाजवादी विचारासोबत बुद्धाच्या सांस्कृतिक जीवनपद्धतीचा पुरस्कार केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील लोक जीवनाची भाव-संवेदना व जीवन जाणीवा यांचे क्षितिज आबेडकरावादी साहित्य संस्कृतिच्या रूपाने विस्तारत आहे. त्यामुळे मराठी साहित्यही समृद्ध होत आहे. आज त्यांचा साहित्य विचार आधुनिक साहित्य मीमांसेत नवा समीक्षा विचार झाला आहे. नवसाहित्य निर्मितीची मूलभूत दिशा ठरला आहे. आणि आधुनिक भारतीय साहित्याला समृद्ध जीवनदृष्टी देणारा विचार म्हणून गौरव प्राप्त झाला आहे.

♠ ♠ ♠



४

डॉ. आंबेडकरांचा बौद्ध वाङ्मय विषयक विचार

प्राचीन भारतीय साहित्य व संस्कृतिचा मुख्य प्रवाह बौद्ध साहित्य व संस्कृती विचार आहे. सिंधु संस्कृतितून व त्यांच्या लोकजीवनातून निर्माण झालेली ही परंपरा अवैदिक परंपरा आहे. परकीय आर्य भारतात मुसलमान आणि इंग्रजासारखे आल्यानंतर त्यांचा संस्कृती विचार व स्थानिक भारतीय सिंधुलोकांचा संस्कृती विचार यांचा सांस्कृतिक संघर्ष झाला. आर्यांनी वर्णव्यवस्था, जातियवाद व अस्पृश्यता हे ब्राह्मणी समाजरचनेचे मूलधार करुन विकास केला. प्रत्येक वर्णाला अधिकार आणि जन्मतःच कामाची विभागणी केली. कर्मकांड, यज्ञसंस्था, स्वर्ग, कर्मविपाक या साधनांच्या द्वारे सिंधु बहुजनांची लुट आरंभली. त्यांचे मानसशास्त्र हे कनिष्ठ-श्रेष्ठ या संस्कारांनी तयार केले. त्या शोषणाविरोधात बुद्धाने समतेचा विचार दिला. 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' असा सिद्धांत दिला. आणि बौद्ध धर्म, बौद्ध साहित्य व संस्कृतीचा स्वीकार प्राचीन भारतीय जनतेने केला. बौद्ध जीवनपद्धतीतून प्रेरणा घेऊन लाखोच्या संख्येने ग्रंथ निर्माण झाले. अनेक तत्त्ववेत्ते, नाटककार, कवी, लेखक-लेखिका बौद्ध साहित्यात आढळतात. यांनीच भारतीय जनतेची मानवतावादी संवेदना

घडविली. मानवी जीवनाला श्रेष्ठ मूल्ये दिली. संपूर्ण आशिया खंडातील देशाचे व साहित्याचे नेतृत्व भारतीय बौद्ध चेतनेने केले. आजच्या आधुनिक काळातही बौद्ध साहित्य व संस्कृती चीन, जपान, बर्मा, सिलोन, कोरीया, व्हियतनाम इत्यादी जगभरच्या देशातील लोकांच्या मनाची ही महान संवेदना आहे.

आजही जगातील लोक भारतीय बौद्ध संस्कृतिचा गौरव करतात. बुद्धाला अनुसरून भारतीय मातीवर आपला कृतज्ञतापूर्वक माथा ठेवतात. बौद्ध साहित्य, बौद्ध तत्वज्ञान व बौद्ध संस्कृती आजही जगाची बुद्धिवादी विचार म्हणून वंदनिय आहे. परंतु भारतीय लोकांच्या मनातून बुध्दविचार पुसून टाकण्याचा मूलभूत प्रयत्न परकीय आर्य वैदिक - ब्राह्मणी वर्गाने केला. बहुजनांच्या हिताचा या श्रेष्ठ विचारावर ब्राह्मणवादाने व वर्णव्यवस्थेच्या समर्थकांनी दांभिकपणे, खोडसाळपणे, विकृत मनाने खंडन करण्याचा खोटा प्रयत्न केला. परंतु ते काल व आजही बुद्धाच्या सत्य विचारासमोर पराभूत ठरले. दगाबाजीने सिंधु संस्कृतितील बळीराजा, हिरण्यकश्यप, व दास, दस्यू, पणी या लोकसमूहाला जसे कपट करून मारले, तसेच बुद्धालाही विकृतरूप देऊन भारतातून काहीकाळ संपविले. बुद्ध तत्वज्ञ होते म्हणून त्यांना संपविता आले नाही. राजा व त्याचा संपतीवरचा हक्क नष्ट करता येतो परंतु तत्ववेत्ता व त्याच्या विचाराला नष्ट करता येत नाही. बुद्धाचे तत्वज्ञान व सत्य पुन्हा लोकांसमोर साकार झाले. इतिहासानेच ते सत्य स्वीकारावयास जनतेला भाग पाडले. बुद्ध विचार व साहित्याचा पुन्हा नव्याने आधुनिक भारतात व जगभर अभ्यास सुरू झाला. "भारत का ही मूल पालि साहित्य, सिंहल, बर्मा, कम्बोज तथा स्याम की लिपियों में छपा था। रोमन लिपि में भी वह 'पालि टेक्स्ट सोसायटी' की कृपा से प्रकाशित हो गया था। परंतु भारत की किसी भी लिपि में उसका न होना लज्जा की बात थी। हाल में ही नवनालन्दा ने इस कार्य को प्रारम्भ किया और कुछ वर्षों में विद्युत गति से नागरी में संपूर्ण त्रिपिटक - प्रकाशन कार्य को भिक्षू जगदीश काश्यप तथा उनकी शिष्यमंडली ने सम्पन्न कर डाला" [१] डॉ. आंबेडकरांनी बौद्ध साहित्य व

१. राहूल सांकृत्यायन, पालि साहित्य का इतिहास, लखनऊ, १९६३, पृष्ठ ३०९

संस्कृतिचा मूळ विचार आंदोलनाच्या माध्यमातून भारतीय जनतेला दिला. भारताचे महानपण त्यांना परत केले. बौद्ध विचाराने जगाचे जे नेतृत्व केले होते ते नेतृत्वाचे लगाम पुन्हा जनतेच्या हाती दिले. परंतु तो विचार भारतीय भाषीक साहित्यात प्रभावी पणे अजुनही गतिमान होण्याची गरज आहे.

बौद्ध साहित्याचे स्वरूप काय आहे ? त्यामधिल तत्वज्ञान काय आहे ? बौद्ध साहित्याच्चे प्रयोजन काय आहे ? बौद्ध जातक कथा व शिल्पकता कोणती संवेदना धडवित होती ? अजिंठा, वेरूळ, भाजे, कार्ले, साची, अमरावती इत्यादि ठिकाणच्या बौद्ध शिल्पलेण्यांमधून अविष्कृत झालेल्या कला अविष्काराचे पोत काय? बौद्ध साहित्य व कलेचा उद्देश काय आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे डॉ. आंबेडकरांच्या बौद्ध चिंतनामध्ये आढळतात. बौद्ध साहित्य विषयक विचाराच्या प्रेरणेतून मिळतात.

आधुनिक मराठी साहित्यात नाथसंप्रदाय, ब्राह्मणी वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय यांचा आजही हिरीरीने अभ्यास मांडला जातो. संत ज्ञानेश्वर व संत रामदास या दोन ब्राह्मण कविंच्या सहित्यावर सर्वाधिक आजही लिहिले जाते. चोखामेळा, कर्ममेळा या अस्पृश्य संताच्या अभंगावर विफल ग्रंथ मिळत नाहीत. नाथ संपदाय हा बौद्ध विचाराला मानणारा एक संप्रदाय होता. मच्छिद्रनाथ हा बौद्ध उपासक होता असेही म्हटले जाते. तेराव्या शतकापर्यंत बौद्ध विचार निरनिराळे प्रवाह होऊन वाहत होता. मुसलमानांच्या स्वाऱ्या भारतावर झाल्या तेव्हा बौद्ध विरोधकांनी त्यांच्या हातून नालंदा, तक्षशिला विद्यापीठातील ग्रंथ जाळून घेतले असावे. बौद्ध भिक्खूंची कत्तलही त्यांनी करवून घेतली असावी. कारण बौद्ध द्वेष 'मृच्छकटीक' नाटकातून पाहावयास मिळतो. पुण्यमित्र शुंग याब्राह्मण सरदाराने अशोकाचा नातू बृहद्रथ याचा खून केला. आणि बौद्ध भिक्खूचे शिर कापून आणाणाऱ्याला सोन्याच्या मोहरा देण्याचे घोषित केले. मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा पुरेपूर फायदा ब्राह्मणवादाने घेतला. त्यांच्या पदरी मोठमोठ्या नोकऱ्या व जहांगिरदार होऊन वैभव भोगले. आणि बौद्धांचे विहारं, चैत्य स्वतःच्या ताब्यात घेतली. याचे अनेक पुरावे आज बौद्ध लेण्यामधून

मिळतात. याच राजवटीत बौद्ध लेण्यांना पांडवलेण्या म्हणून जनतेला शिकविले. बुद्धाच्या ऐतिहासिक जीवनावर विफल ग्रंथ लिहिले जात नाहीत परंतु पुराणातील भाकडकथावर पुन्हा पुन्हा पुराण कादंबऱ्या -कथा निर्माण होतात.पुराणाचा हेतू काय आहे ? "पुराणे वगैरे पोथ्यांत वेड लागावयाच्या अनेक गोष्टी पुष्कळ आहेत. त्यापासून भलतीच मते उत्पन्न झाली. आमच्या रीती व चाली वाईट आहेत" [२] आजही शेतकऱ्यांच्या कुटूंबाना आधुनिक विचारांची संस्कृती न शिकविता पुराण संस्कृती शिकवून स्थितीवादीच ठेवण्याचा प्रयत्न होतो. निरर्थक गोष्टींचे तर्क वितर्क करीत जीवनापासून तुटलेले व कल्पना विलासात बुडलेले साहित्य लिहिले जाते. दगउ धोंड्याना शेंदूर फासून त्यांना देव बनवून लोकांना नांदी लावले जाते. त्यांचेच वर्णन महात्म्य करून त्यालाच संशोधन म्हटले जाते. परंतु बुद्धाच्या ऐतिहासिकतेचा शोध तीव्र मनाने मांडल्या जात नाही. बुद्धाच्या तुटलेल्या शिल्पावर फारसे बोलले जात नाही. जगातील महान तत्वज्ञ बुद्ध यांच्या सिद्धांतांची भारताला गरज असतांना आधुनिक चिंतनात व साहित्यात विविध पैलूने लिहिले जात नाही. असा श्रेष्ठ विचार डॉ. आंबेडकरांनी १४ आकटो १९५६ रोजी भारतीय जनतेला पुन्हा दिला. तेराव्या शतकापासून ते आंबेडकरांच्या काळापर्यंत बौद्ध संस्कृती आम जनतेला माहीत नव्हती. ब्राह्मणी साहित्य व संस्कृतिने निर्माण केलेली चातुर्वर्ण्य समाज - संस्कृतिचे अस्पृश्यता, श्रेष्ठ कनिष्ठ भाव, जातिद्वेष हे ब्राह्मणी धर्मांचे अंगभूत तत्त्व जगत होते. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध साहित्यातील समता विचार भारतीयांना पुन्हा दिला. करोडोच्या संख्येने बौद्ध समाजच निर्माण केला. बौद्धांचा समाजरचनेचा सिद्धांत दिला. बौद्ध तत्वज्ञानाची दृष्टी दिली. बौद्ध संस्कृतिचे आंदोलन गतीमान करण्याची गरजच प्रतिपादन केली. डॉ. आंबेडकरांचे बौद्ध साहित्य विषयक विचार हे आधुनिक साहित्याला समृद्ध करणारे आहेत.

---

२. लोकहितवादी, लोकहितवादीकृत निबंधसंग्रह, संपा. अनंत काकबा प्रियोळकर, दु.आ. १९६७, पुणे, पृष्ठ ११९

बौद्ध साहित्य हे प्राचीन भारतीय लेखकांनी संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या लिहिलेले समृद्ध साहित्य आहे. 'त्रिपिटक' हा बौद्ध साहित्याचा मुख्य ग्रंथ आहे. त्याची ग्रंथ संख्या तीन लक्ष आहे. सुत्तपिटक, विनयपिटक आणि अभिधम्मपिटक असे मुख्य तीन भाग आहेत. या तीन भागाचेही पोटभाग आहेत. सुत्तपिटकाचे (१) दिघनिकाय (२) मज्झिमनिकाय (३) संयुक्त निकाय (४) अंगुत्तर निकाय (५) खुद्दक निकाय असे पाच मुख्य भाग आहेत. खुद्दकनिकायचेही पंधरा पोट विभाग आहेत. (१) खुद्दक पाठ (२) धम्मपद (३) उदान (४) इतिपुत्तक (५) सुत्तनिपात (६) विमानपत्थु (७) पेतवत्थु (८) थेरगाथा (९) थेरीगाथा (१०) जातक (११) निद्येस (१२) पटिसंभिदामग्ग (१३) अपदान (१४) बुद्धवंश (१५) चारिया पिटक असे खुद्दक निकाय मध्ये पंधरा ग्रंथ आहेत. विनयपिटकाचे पांच भाग आहेत (१) पाराजिका (२) पाचित्तयिादि (३) महावग्ग (४) चुल्लवग्ग (५) परिवार पाठ. विनयपिटकाचे असे पाच भागात विभागलेले साहित्य आहे. अभिधम्मपिटकात (१) धम्मसंगणि (२) विभंग (३) धातुकथा (४) पुग्गलपत्त्राप्ति (५) कथावस्तु (६) यमक (७) पट्ठान.

'त्रिपिटक' नावाच्या अशा विशाल ग्रंथावर अनेक टीकाग्रंथ लिहिले आहेत. चीन, जपान, सिलोन, वर्मा इत्यादी राष्ट्रांनी भारतीय बौद्ध साहित्याचा अनुवाद करून आपापल्या राष्ट्रातील जनतेसमोर ठेवला. आणि बौद्ध विचाराने आपली साहित्यसृष्टी सजविली. आपली संस्कृती व सांस्कृतिक चेतना घडविली.

'त्रिपिटक' ग्रंथावर लिहिलेल्या टिकाग्रंथाना अट्ठकथा म्हणजे अर्थकथा म्हटले जाते. अट्ठकथांची नावे पुढील प्रमाणे आहेत. (१) दिर्घनिकाय अट्ठकथा - सुमंगल विलासिनी (२) मज्झिमनिकाय अट्ठकथा - पपंचसूदनी (३) संयुक्त निकाय अट्ठकथा - सारत्थप्पकासिनी (४) अंगत्तर निकाय अट्ठकथा - मनोरथपूरणी (५) विनय अट्ठकथा - संमतपासादिका (६) धम्मसंगणि अट्ठकथा - अट्ठसालिनी (७) विभंग अट्ठकथा - संमोह विनोदनी (८) धातुकथा -

पुग्गलपत्त्रति, कथावस्तु, यमक, पट्ठाण या पाच प्रकरणांची अट्ठकथा पंचप्पकरण अट्ठकथा आहे. खुद्दकनिकायांतील प्रकरणांवर निरनिराळ्या आचार्यांनी अट्ठकथा लिहिल्या आहेत. एकूणच त्रिपिटक ग्रंथातील सुत्तपिटकांत प्रामुख्याने तत्त्वज्ञ बुद्ध आणि बुद्धाचे प्रमुख शिष्य यांच्या उपदेशाचा ग्रंथसंचय केला आहे. विनयपिटकात बौद्ध भिक्खूनी कसे वागायचे? त्या संदर्भातील नियम दिले आहेत. अभिधम्मपिटकात बौद्ध तत्वज्ञानाचा विस्ताराने विचार करण्यात आला आहे. अशा या महान ग्रंथावर आधारीतच मूळ पाली बौद्ध विचार डॉ. आंबेडकरांनी आधुनिक भारताला दिला आहे. "बुद्ध आणि त्यांचा धम्म" हा ग्रंथ डॉ. आंबेडकरांनी लिहून बौद्ध विचार सविस्तरपणे मांडला आहे. त्याचप्रमाणे त्रिपिटक ग्रंथातील आणि बुद्धविचारातील मूलतत्वे त्यांनी आपल्या जीवनसंर्घषातून व लेखनातून सांगितली आहेत. आधुनिक जीवन व साहित्याला ती मार्गदर्शक ठरणारी आहेत. ते म्हणतात - "The Buddha is generally associated with the doctrine of Ahimsa. That is taken to be the be-all and-all of his teachings. Hardly any one knows that what the Buddha taught is something very vast; far beyond Ahimsa. It is therefore necessary to set out in detail his tenets. I enumerate them below as I have understood them from my reading to the Tripitaka:

(1) Religion is necessary for a free society.

(2) Not every Religion is worth having.

(3) Religion must relate to facts of life and not to theories and speculations about God, or soul or Heaven or Earth.

(4) It is wrong to make God the Centre of Religion.

(5) It is wrong to make salvation of the soul as the centre of Religion.

(6) It is wrong to make animal sacrifices to be the centre of religion.

(7) Real Religion lives in the heart of man and not in the

shastras.

(8) Man and morality must be the centre of religion. If not, Religion is a cruel superstition.

(9) It is not enough for Morality to be the ideal of life. Since there is no God it must become the law and life.

(10) The function of Religion is to reconstruct the world and to make it happy and not to explain its origin or its end.

(11) That the unhappiness in the world is due to conflict of interest and the only way to solve it is to follow the Ashtanga Marga.

(12) That Private ownership of property brings power to one class and sorrow to another.

(13) That it is necessary for the good of society that this sorrow be removed by removing its cause.

(14) All human beings are equal.

(15) Worth and not birth is the measure of man.

(16) What is important is high ideals and not noble birth.

(17) Maitri or fellowship towards all must never be abandoned one owes it even to One's enemy.

(18) Every one has a right to learn. Learning is as necessary for man to live as food is.

(19) Learning without character is dangerous.

(20) Nothing is infallible. Nothing is binding forever. Every thing is subject to inquiry and examination.

(21) Nothing is final.

(22) Every thing is subject to the law of causation.

(23) Nothing is permanent or sanatan. Every thing is subject to change. Being is always becoming.

(24) War is wrong unless it is for truth and justice.

(25) The Victor has duties towards the Vanquished.

This is the creed of the Buddha in a summery form. How ancient but how fresh ! How wide and how deep are his teaching ![३] डॉ. आंबेडकरांनी 'त्रिपिटक' या विशाल ग्रंथसंपदेतून बौद्ध साहित्यातील मूलतत्वे मांडली आहेत. या ग्रंथासमोर रामायण, महाभारत हे ग्रंथ म्हणूनही छोटे आहेत. आणि वैचारिकदृष्ट्या वर्णव्यवस्थेचे समर्थक असून ब्राह्मणवादाने साकार झालेले आहेत. धर्मानंद कोसंबी म्हणतात. "त्रिपिटक हा पालिभाषेतील मुख्य ग्रंथ होय. हा महाभारत ग्रंथाच्या तिप्पटीने मोठा आहे. म्हणजे याची ग्रंथसंख्या सरासरी तीन लक्ष आहे." [४] अशा विशाल बौद्ध साहित्याच्या अभ्यासाला डॉ. आंबेडकरांनी वैचारिक क्रांतीने गती दिली.

बौद्ध साहित्य हे प्राचीन भारतातील समतेने झपाटलेल्या लोकांनी लिहिले. मानव्यावर अमाप प्रेम करण्याऱ्या प्रतिभांनी निर्माण केले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या शुद्र वर्णात जन्मास येऊन त्यांनी स्वतःचे दुष्ट ब्राह्मणवादी संस्कार नष्ट करून बौध्द पंडीत होऊन लेखन केले. या लेखकाला कधीही जातीच्या नावाने न संबोधिता बौद्ध विचारवंत म्हणूनच संबोधिले आहे. ब्राहमणवादावर पोसलेला वारकरी संप्रदाय जातियवादी तत्वाने भरलेला असल्यामुळे त्या अभंग लेखकांचा उल्लेख सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार, चोखा महार नामदेव सिंपी. असा वारकरी इतिहासात आढळतो. परंतु बुद्धाने मानव्य विचाराला महत्व देऊन समतेची शिकवण दिली. 'माझा धम्म हा सागरासारखा आहे' अशी उपमा दिली. त्यामध्ये जुन्या नद्यांचे अस्तित्वच उरत नाही तसे जाती वर्णाचे अस्तित्वही उरत नसून सगळी माणसे समान होतात. असा हा समतेचा विचार म्हणजे लोकशाहीचा विचार आहे. सर्व माणसे नैसर्गिक समान असतात, ही वैज्ञानिक दृष्टी बुद्ध देत होते. परंतु माणसांचे हे समान अधिकार वैदिक - ब्राह्मणी धर्म

---

३. Ambedkar B.R., Ambedkar writing & speeches Vol. 3, Bombay, 1987, Page - 441 - 442

४. धर्मानंद कोसंबी, बौद्ध धर्मावरील चार निबंध, (महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ) मुंबई, १९८२, पृष्ठ ८७

नाकारत होता. ब्राह्मणी साहित्य विषमतेच्या विचाराचे प्रतिपादन करीत होते. शंकराचायनि शुद्र -अतिशुद्रांना व स्त्रीयांना गुलाम करणाऱ्या वर्णव्यवस्थेचे समर्थन केले. मनुस्मृतितील दुष्ट मानवी संहाराची मांडणी शंकराचार्यांच्या विचारात आहे. वेदान्ताचे व शंकराचार्यांचे तत्वज्ञान हिन्दुत्वाच्या नावाने सर्वपल्ली राधाकृष्ण, वि.दा. सावरकर, गोलवलकर, हेडगेवार, इत्यादि लेखक ब्राह्मणवादाचे वर्चस्व निर्माण करण्यात गुंतले. मानवतेच्या समानतत्वाची रेषा पुसून टाकण्यात त्याच्या लेखनी काम करीत होत्या. डॉ. आंबेडकर समताधिष्ठित मूल्यव्यवस्था भारतीयांना देण्यात अफाट कष्ट उपसत होते, आणि ब्राह्मणी विचारप्रवाह धर्मांधता व विकृत देवतांचे उत्सव जनतेवर संस्कारीत करीत होते. चुकीच्या विचाराला रूजवित होते. ब्राह्मण कुटुंबात जन्मास येऊन प्राचीन भारतातील अश्वघोष, धर्मकिर्ती यांनी बौद्ध विचारातील मानक्ता बौद्ध पंडीत होऊन शिकविली, त्याचप्रमाणे ब्राह्मण कुटूंबात जन्मास येऊनही राहूल सांकृत्यायन, धर्मानंद कोसंबी यांनीही बौद्ध विचाराला मांडले. विषामतावादी ब्राह्मणी वेदान्तावर प्रखर टिका केली. आणि न्यायाला सन्मान देण्यासाठी संघर्ष केला. धर्मानंद कोसंबी म्हणतात - "मुसलमानांनी सिंध आणि पंजाब देशाचा काही भाग ताब्यात घेतल्यानंतर शंभर वर्षांनी शंकराचार्य उदयास आले. त्यांच्या वेदान्ताचा सर्व रोख म्हटला म्हणजे शुद्रांनी वेदाध्ययन करता कामा नये हा ! जर शुद्रांनी वेदवाक्य ऐकले तर त्यांचे कान शिशाने किंवा लाखेने भरावे, वेदवाक्य उच्चारले तर त्यांची जीभ कापावी. आणि वेदमंत्र धारण केला तर त्याला ठार मारावे हा त्यांचा वेदान्त !" [५] या शिकवणीमुळेच बहुजन समाजात (एस.सी. एस.टी. ओ.बी.सी.) शिक्षण नव्हते. अव्वल इंग्रजी कालखंडानंतर म. फुले, शाहू महाराज, भाऊराव पाटील, पेरियर रामस्वामी नायकर, महर्षि वि.रा. शिंदे, पंजाबराव देशमुख, डॉ. आंबेडकर, गाडगे महाराज यांच्या विचारामुळे व प्रयत्नामुळे शिक्षण मिळायला प्रारंभ झाला. या वर्गातून लेखक - कवी साहित्य

---

५. धर्मानंद कोसंबी, भगवान बुद्ध, नागपूर : पुणे, चवथी आवृत्ती १९८९, पृष्ठ १८

निर्माण करू लागला आहे. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध साहित्य विचार व ब्राह्मणी वैदिक साहित्य विचार यांच्या विचारामधिल प्रकृतीचे स्वरूप मांडले. बौद्ध विचाराने बहुजन समाजाचे केलेले कल्याण व त्यामधिल क्रांतिकारिकत्व सांगितल. बौद्ध साहित्याला व संस्कृतिला जे ब्राह्मणवादाने भेसळीचे रूप दिले होते ते नष्ट केले. 'बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे,' बुद्ध विचार वैदिक उपनिषदातून जन्मला आहे. असे खोटे सांगून शुद्र - अतिशुद्राला पुन्हा गुलाम केले. त्याला समतेच्या विचारापासून व बुद्धिवादी चिंतनापासून दूर नेऊन पुन्हा ब्राह्मणी धर्मात ओवले. त्यांचे शैक्षणिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व साहित्यिक जीवन नष्ट केले. डॉ. आबेडकरांनी मूळ स्वरूपात ते शिकविले. बहुजनांचे व मानवतेचे ब्राह्मणी लेखकांनी केलेले विकृत इतिहास लेखन पुन्हा नव्याने लिहिण्याची गरज प्रतिपादन केली. बुद्धाला जातियवादी ब्राह्मणी वैदिक विचार परंपरेत गोवण्याचा प्रयत्न हा मानवतावादावरील कलंक आहे. म्हणून त्यांनी मूलभूत वैचारिक प्रश्न विचारले आणि बुद्धाचे खरे स्वरूप आधुनिक काळातील प्रामाणिक विचारवंतासमोर ठेवले. ते म्हणतात - "उपनिषदातून बुद्धाने सारे घेतले असे हिंदू तत्ववेत्ते म्हणतात मला अशा लोकांबद्दल फारच आश्चर्य वाटते? ज्यांनी कोणी ब्राह्मणांच्या १३८ उपनिषदांचा अभ्यास केला असेल अगर ती पूर्णपणे वाचली असतील तर त्यात ब्रह्म व आत्मा या दोन गोष्टी शिवाय काय आहे. असेच त्यांना वाटेल. उपनिषदांच्या या कारखान्यातील ब्रह्म व आत्मा या दोन गोष्टींकडे पाहिले तर बुध्दाने त्यापैकी एकही गोष्ट मान्य केली नाही. बुध्दाने स्पष्ट सांगितले की मला ईश्वर नको. या पृथ्वीतलावर जन्मास आलेल्या प्रत्येक माणसात सुख व शांती मिळाली पाहिजे. व सर्वांनी सुखाने राहिले पाहिजे. बुद्धाने नुसती शांतताच सांगितली नाही बुद्ध हा खरा विचारवंत होता" [६] बुद्ध व त्याचे तत्वज्ञान बौद्ध वाङ्मयात विविध लेखकांनी मांडले. ब्राह्मणी हिन्दु तत्वज्ञानापेक्षा ते न्याय मूल्यांवर - उभारलेले आहे. त्यामळे बौद्ध

---

६. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १, संपा - गांजरे मा. फ., नागपूर, नागपूर, १९६८, पृष्ठ १९३

संस्कृति व साहित्य विचार जगाने वंदनिय म्हणून स्विकारली आहेत. "बुद्धाला वेद मुळीच मान्य नव्हते हे त्यांनी स्पष्टपणे जाहीर केले होते. वर्ण व्यवस्थाही बुद्धाला मान्य नव्हती. बुद्ध वाङ्मयात बुद्धाने चातुर्वर्णावर पदोपदी प्रहार केलेले आहेत. आणि त्यामुळेच त्याला हिन्दू धर्माचा कट्टर विरोध झाला. बौद्धाने जातिभेदावर कठोर प्रहार केले. मी ब्राह्मणांचा द्वेष करीत नाही परंतु 'जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट । तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ' हे मी मान्य करणार नाही, अशी त्याची विचारसरणी होती"[७] असे असतांनाही 'वैदिक संस्कृतिचा विकास' या ग्रंथात तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या लेखकाने बौद्ध धर्म हा वैदिक संस्कृतिच्या परंपरेतील आहे. अशी आपली ब्राहमणी चलाखी दाखविली. ही ब्राह्मणवादाची इतिहासाची विकृतीकरणाची नीति किंवा धोरण (Policy) आजही राबविले जाते. बुद्धाला व त्याच्या श्रेष्ठ विचाराला आपल्यात सामावून घेण्याचा व त्याला हळूहळू विकृत करण्याचा हा डाव डॉ. आंबेडकरांनी उधळून लावला. त्याचप्रमाणे प्रामाणिक इतिहासकारांनीही नाकारला. धर्मानंद कोसंबी म्हणतात, "सांप्रत अशी एक समजूत प्रचलित आहे की वेदापासून उपनिषदे आणि त्याच्यापासून बौद्ध, जैन, वगैरे धर्म निघाल्यामुळे ते देखील वैदिक धर्मच आहेत. बौद्धांची आणि जैनांची परंपरा वेद किंवा उपनिषदे यापासून निघाली नसून ती वेदकालापूर्वी मध्य हिन्दुस्थानात अस्तित्वात असलेल्या ऋषिमुनींच्या-श्रमणांच्या परंपरेपासून निघाली" [८] बौद्ध- साहित्य विचार हा भारतीय सिंधु संस्कृतितील शुद्र - अतिशुद्र अशा बहुजनांच्या जीवनाचे विराट दुःख पाहूनच साकार झाला. बौद्धांच्या विचारामुळेच बहुजन व्यक्तिचा विकास काल साध्य झाला, तसाच आजही होणार आहे. भारतभर व महाराष्ट्रभर पसरलेल्या पहाडीतील काळेकुट्ट दगडावर व डोंगरभितींवर साकार झालेले चैत्य, लेण्या, विहारं हे आजही साक्षी आहेत. सिंधु संस्कृती - बौद्ध संस्कृती - म्हणजेच खरी मानवताप्रधन भारतीय संस्कृती आहे. आर्य वैदिक ब्राह्मणी संस्कृति ही परकीय व वर्णव्यसस्थेची

---

७. तत्रैव - पृष्ठ १९४

८. धर्मानंद कांसंबी, भगवान बुद्ध, नागपूर पुणे, चवथी आवृत्ती १९८९, पृष्ठ ६१

शोषणवादी संस्कृति आहे. म्हणून भरताचे सुवर्ण युग हे सिंधु संस्कृती व बौद्ध संस्कृती आहे. "स्वातंत्र्य गौरव व थोरपणाचा काळ भारतीय इतिहासात फक्त एकच आहे तो म्हणजे मौर्य काल. इतर सर्व काळात देश पराजित अंधारमयच होता. परंतु मौर्य काळ हा असा काळ होता त्यात चातुवर्ण्याचे पुर्णतः एच्चाटन झाले होते. त्याकाळी बहुसंख्य असलेल्या शुद्रांनी स्वतःला सावरून ते देशाचे राज्यकर्ते झाले होते. जेव्हा जेव्हा चातुर्वर्ण्याचा बोलबाला झाला व देशातील बहुसंख्य लोक अधोगतीला जाऊन पोहचले तेव्हा तेव्हा तो काळ देशाच्या पराजयाचा व काळोखाचा ठरला" ९

भारताचा इतिहास जेव्हा जेव्हा नाग संस्कृतिचा, बौद्ध संस्कृतिचा व बहुजनांच्या विकासाला प्राधान्य देणाऱ्या राजाचा होता. त्याला ब्राह्मण लेखकांनी गौरविले नाही. जेव्हा फक्त ब्राह्मणवादाला प्राधान्य दिले, ज्या राजाने ब्राहमण्याला व वर्ण जातीला महत्व देऊन शुद्र अतिशुद्रला आर्थिक व सामाजिक अधिकारापासून वंचित केले त्या राजवटीला 'सुवर्णयुग' ब्राह्मणी लेखकांनी व इतिहासकारांनी म्हटले. डॉ. आबेडकरांनी सुवर्णयुगाची कसोटी सांगितली. दलित, आदिवासी, बहुजन (ओ.बी.सी.) यांच्या ऊन्नतीसाठी झटणे व सर्वांना समान विकासाची संधी देणारी राजवटच सुवर्ण युग या पदवीच्या पात्रतेची ठरू शकते. तेच साहित्यही श्रेष्ठ ठरू शकते! जे बहुजनांच्या जीवनाला प्राधान्य देते! म्हणून त्यांनी ब्राह्मणी शोषणवादी साहित्याची व परखड दृष्टीनी मीमांसा केली.

वैदिक - ब्राह्मणी साहित्याने शुद्र, अतिशुद्र, आदिवासी यांना असंस्कृत ठेवण्यालाच ब्राह्मणी धर्म म्हटले आहे. आणि शुद्र अतिशुद्र आदिवासी यांना सुसंस्कृत करण्यालाच बुद्धाने बौद्ध धम्म म्हटले आहे. या दोन भिन्न विरोधी तत्वज्ञानाच्या बुडाशी राजकीय इतिहास आहे. "आपण भारताचा प्राचीन इतिहास समजून घेतला पाहिजे. हिन्दुस्थानात सर्वात प्रथम आर्य आणि नाग लोकांचे युद्ध जुंपले. आर्यांजवळ युद्धात घोडे होते. त्या बळावर त्यांनी नाग लोकांवर विजय

---

९. आंबेड्कर बी.आर., Anhilation of cast, जातिभेद निर्मूलन, अनु. गांजरे मा.फ. नागपूर, १९७०, पृष्ठ ५०

मिळविला हेच नाग आज हिंदू आहेत. नागांनी सर्वात प्रथम बौद्ध धर्माचा स्वीकार केला. त्यांना बौद्ध धर्माचा प्रचार करण्यात सफलता मिळाली परंतु या नागांचा नायनाट करण्याकरिता आर्यांनी वेळोवेळी प्रयत्न केले. याचे पुरवे महाभारतात अनेक ठिकाणी आढळून येतात." १० हा प्राचीन भारतात परकीय आर्य व स्वकीय भारतीय बहुजन संघर्ष आहे. वैचारिक व तत्वज्ञान यांचाही संघर्ष आहे. आर्य थंडप्रदेशातून बाहेरून आले त्यामुळे त्यांनी सोबत यज्ञ आणला. एकप्रकारची अंग शेकण्याची शेकोटी आणली. त्यावर मांस भाजून ते खाऊ लागले. याचे अनेक पुरावे ऋग्वेद व वेद वाङ्मयात आहेत. बहुजनांचे जबरदस्तीने गाईचे वासरू, बछडे, बकरी, गाई यज्ञात मारत व त्यांचा मोबदलाही देत नसत. तेव्हा शेतकरी अश्रु ढाळत. ते दुःख पाहून बुद्धाने यज्ञावर टिका केली. यज्ञाभोवती गुंफलेल्या शोषण कल्पनावर टिका केली. आणि वैचारिक बुद्धिवादी बंड उभे केले. ब्राह्मणी शोषणातील फोलपणा लोकांना पटवून दिला. लोकांना सम्यक दृष्टीने विचार करण्याचे शिकविले. बहुजनांच्या हिताचे रक्षण करणारे साहित्य म्हणून बौद्ध विचाराला गौरव प्राप्त झाला. आणि ब्राह्मणी वैदिक साहित्याला जन्मावर श्रेष्ठत्व सांगणारे, ईश्वर, आत्मा, स्वर्ग, कर्मविपाक यांच्या आधारे बहुजनाला लुबाडणारे साहित्य स्वरूप उघड झाले. हा साहित्य विचार व तत्वज्ञानसंघर्ष बुद्धाने उदघाटीत केला. म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी बौद्ध विचाराला क्रांतिविचार म्हटले आणि ब्राह्मणवादी विचाराला प्रतिक्रांति विचार म्हटले. आणि त्या संघर्षाचे विश्लेषण केले आहे. ११ प्राचीन भारतातील या वैचारिक संघर्षाला ब्राह्मण लेखकांनी साधे भांडण म्हटले परंतु तो मूलभूत असा संघर्ष होता. 'जन्माने माणूस श्रेष्ठ ठरतो' या विरूद्ध 'जन्माने माणूस श्रेष्ठ ठरत नसून गुणाने श्रेष्ठ ठरतो' असा तो संघर्ष होता. 'जाती-वर्ण देवाने निर्माण केल्या. या विरूद्ध माणसानेच

---

१०. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे - खंड ७, नागपूर, पृष्ठ १८९-१९०

११. Ambedkar B.R. Dr- B.R. Ambedkar writing & speeches Vol. 3, Bombay 1987, (Revolution and counter - Revolution)

समाज सिद्धांत तयार केले असा तो संघर्ष होता. समतावादी पक्ष बौद्धांनी घेतला होता तर विषमतावादी तत्व रूजविणारा पक्ष ब्राह्मणवादाने घेतला आणि त्यामधूनच भारतीय बौद्ध व वैदिक ब्राह्मणी साहित्य दृष्टी साकार झाली.

आधुनिक भारतात डॉ. आबेडकरांनी महाडचा सत्याग्रह केला त्यालाही ब्राह्मणी लेखकांनी 'पाण्यासाठी भांडण' म्हटले. परंतु ते अस्पृश्यांना हक्क मिळवून देणारा समतेचा संघर्ष होता. महाडचा सत्याग्रह हा भारताच्या इतिहासातील दोन हजार वर्षानंतरचा एक महान लढा होता. डॉ. आंबेडकरांनी या लढ्याला 'धर्मसंगर' असे म्हटले आहे. शोषीतांच्या न्याय हक्काला, न्याय लढ्याला, श्रेष्ठ साहित्याला 'मामुली' संबोधणे म्हणजे इतिहासाला विकृत करणे आहे. सत्याचा खून पाडणे आहे. प्राचीन भारतातील बौद्ध साहित्याचा लढा कसा होता ? या प्रश्नाचे उत्तर डॉ. आंबेडकरांनी दिले आहे.ते म्हणतात - "प्राचीन हिंदुस्थानात घडलेला बौद्ध व ब्राह्मण या मधिल लढा याचा इतिहास कांही प्रोफेसरांनी म्हटल्याप्रमाणे हा केवळ एखाद्या पंचामधला मामुली लढा नव्हता. सत्य म्हणजे काय ह्यासाठी तो लढा होता"[१२] बुद्धाने व बौद्ध साहित्याने वास्तववादी विचाराची भूमिका घेतली होती. त्यांनी जन्मापासून ते मृत्यूपर्यंत जीवन जगणाऱ्या व्यक्तिकडेच पाहिले होते. हेच जीवन त्यांनी खरे मानले होते.

बौद्धांनी मानवी जीवनाला अतिशय प्राधान्य दिले. दुःख, स्पर्श व वेदना यांचा विचारच ग्राह्य मानला. दशइंद्रियांना जाणवणाऱ्या अनुभवालाच त्यांनी प्राधान्य दिले. मानवी जीवनातील दुःख नष्ट करण्यासाठी बौद्ध प्रतिभा झिजल्या. अत्तामवाद हाच जीवनाला सुंदरकरणारा विचार म्हणून त्यांनी स्वीकारला. ब्राह्मणी वैदिक साहित्यातील ईश्वर, स्वर्ग, आत्मा, परलोक, जन्मावर श्रेष्ठ - कनिष्ठता, हे थोतांड नाकारले. वैदिकांचा शंकराचार्यानि स्वीकारलेला 'ब्रह्म सत्य जगन मिथ्या' या सिद्धांतातील ढोंगावर आंबेडकरांनी टिका केली. संतानी स्वीकारलेला ईश्वर भक्तीचा विचार ही आंबेडकरांनी नाकरला. कारण डॉ. आंबेडकर हे बौद्ध विचाराचे पुरस्कर्ते होते. या विचारानेच प्राचीन भरतीय जनजीवन समृद्ध होईल

---

१२. आंबेडकर भी.रा, डॉ. बोबासाहेब आंबेडकरांची भाषणे - खंड ६, संपा - गांजरे

हा आत्मविश्वास त्यांच्या साहित्य चिंतनातून साकारला आहे.

म. फुले यांनी ब्राह्मणी साहित्याचे वस्तुनिष्ठ व वास्तववादी जीवनातून विश्लेषण केले आहे. स्त्रीया, अस्पृश्य, शेतकरी, शुद्र अतिशुद्र यांच्या जीवनाचे चित्रण आपल्या 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथात काढले आहे. त्याचप्रमाणे ब्राह्मणी वाङ्मयाचीही मीमांसा केली आहे. ब्राह्मणी वाङ्मय व ब्राह्मणी - हिन्दु धर्म या दोन भिन्न गोष्टी नसून एकच आहेत. त्यामुळे शुद्र - अतिशुद्रांची गुलामगिरी दिर्घकाळ टिकली आहे. बहुजनाचे हे ब्राह्मणी साहित्य आजही शोषण करते. फुले म्हणतात - "शेतकऱ्यांचे मनावर हिंदुधर्माचे मजबूत वजन बसून त्यांनी निःसंग होऊन आपले नादीं ज्यास्त लागावे म्हणून सधन शेकतऱ्याचे घरोघर रात्री भट ब्राह्मण कधी कधी पांडव प्रताप वगैरे भाकड पुराणांची पारायणे करून त्याजपासून पागोट्या धोत्रासह घाला घालून कित्येक निमकहरामी भट ब्राह्मण आपल्या शेतकरी यजमानाच्या सुनाबाळांस नादी लावून त्यास कुकूचकू करावयास शिकवतात" [१३] ब्राह्मणी वाङ्मयाचे केलेले हे विश्लेपण डॉ. आंबेडकरांच्या बौद्ध साहित्य परंपरेचेच आहे. म्हणून त्यांनी जसे बुद्धाला गुरूस्थानी मानले तसेच म. फुले यांनाही गुरूस्थानी मानले आहे. त्यामुळे ब्राह्मणी शोषणाला नाकारणारी एक परंपरा सातत्याने वाहतांना डॉ. आंबेडकरांना आढळली आहे.

डॉ. आंबेडकरांना बौद्ध साहित्य हे जसे विचारामुळे प्रिय झाले त्याचप्रमाणे त्याने सर्वहारा माणसांच्या भाषेला दिलेले प्राधान्य यामुळेही प्रिय झाले. बुद्ध विचार - साहित्य पाली व संस्कृत या दोनही भाषेत आहे. परंतु डॉ. आंबेडकरांनी पाली साहित्यावरच अधिक भाष्य केले आहे. बुद्धाचा मूळ पाली विचारच स्वीकारला आहे. इ.स. पूर्व सहाव्या शतकापासून ते तेराव्या शतकापर्यंत बौद्ध विचार निरनिराळ्या प्रवाहांनी प्रवाहीत राहिला आहे. बुद्धाने सर्वसामान्यांच्या भाषेतच उपदेश करण्याचा आदेश भिक्खू संघाला दिला. आणि त्यांनी संस्कृत भाषा नाकारून प्राकृत भाषेतून प्रबोधन केले. भाषेपेक्षा विचार

---

१३. जोतीराव गोविंदराव फुले, म. फुले समग्र वाड.मय, मुंबई, द्वि.आ. १९८०, पृष्ठ १८९

लोकांना कळणे व त्याच्यात प्रबोधन घडणे यावर बुद्धाने भर दिला. अशोकाने ही आपले शिलालेख प्राकृत भाषेतच लिहिण्याची आज्ञा दिली. हे सर्व सामान्याच्या भाषेला बुद्धाने दिलेले महत्व तेराव्या शतकापर्यंत टिकून होते. मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळे सर्वाधिक नुकसान बौद्धांचे झाले. आणि त्यांची स्थळं, त्यांचे सर्वसामान्याच्या हिताची दृष्टी, ब्राह्मणांनी उचलली. सर्वसामान्याच्या प्राकृत भाषेत लिहिण्याची व बोलण्याची कार्यपद्धती ब्राह्मणांनी धेतली. ज्ञानेश्वराने संस्कृत गीता मराठी प्राकृत मध्ये करण्याची प्रेरणा बौद्ध प्राकृत साहित्याच्या भाषेतून धेतली, हे नाकारता येत नाही. महानुभाव यानेही संस्कृत भाषा नाकारून प्राकृत भाषेतून विचार शिकविण्याचीही प्रेरणा बौद्धापासून धेतली हे सुद्धा नाकरता येत नाही. कारण बौद्ध व बौद्ध साहित्य दृष्टीने भारतातील प्रत्येक क्षेत्रातील गोष्टींनाच व्यापले होते. या संस्कृतीचा विकास भारतभर व जगभर करण्यासाठी भारताचे महान सम्राट अशोक, कनिष्क, मिलिंद, हर्षवर्धन, पाल इत्यादिंनी अमाप कष्ट व त्याग केला. साहित्य, चित्रकला, शिल्पकला यांचा सौंदर्यपूर्ण अविष्कार प्राचीन भारतीयांनी केला. "क्लासिकी शिल्प की उच्चतम उपलब्धी सारनाथ मे पायी गयी बुद्ध की मूर्तियों मे देखने को मिलती है" [१४] ही सगळी बौद्ध कला डॉ. आंबेडकरांनी पुन्हा नव्याने बौद्ध क्रांतीच्या माध्यमातून दिली, अजिंठा येथील शिल्पकला व चित्रकला पाहून ते भारावून गेले. आणि बौद्धांचा कला विचार हा कसा विकसित झाला या दृष्टीने अभ्यासकाला त्यानी प्रेरणादिली.

भारतीय समाजरचना ही जातींची बनलेली आहे. आणि ह्या जातींना जन्मतःच अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यांच्यामध्ये उच्च - निचतेची शिकवण आहे. या भेदाने सर्वलोकमानसच जातीय पद्धतीने विचार जगते आहे. या जातिभेदाचे अस्पृश्यतेचे चटके डॉ. आंबेडकरांनी स्वतः भोगले आणि करोडोच्या संख्येने हे अमानुष अन्याय खालचा दलित वर्ग कालही जगत होता तसाच आजही जगतो.

---

१४. रोमिला थापर, भारत का इतिहास, नई दिल्ली, १९८८, पृष्ठ ११९

डॉ.आंबेडकरांच्या चळवळीमुळे काही थोडा फार फरक पडत चालला आहे. या अन्यायाला कोणी निर्माण केले ? अशा त्या शोषणाला जन्म देणाऱ्या वैदिक धर्म व वाङ्मयाला त्यांनी नाकारले. समतेच्या धम्म विचारांचे स्वरूप जनतेला दिले.

ब्राह्मणी धर्माने वर्णव्यवस्थेचा व जातीवादी भेदभावांना चालना देणारी समाजरचना निर्माण केली. बौद्ध धम्माने व साहित्याने माणसाचे महानपण विकसीत करणाऱ्या समाजरचनेचा पुरस्कार केला. परंतु बौद्ध जीवनदृष्टी भारतातून नाहिशी केल्यामुळे ती जनतेच्या स्मृतीतूनही नाहिशी झाली. तिचे मूळ रुपच डॉ. आंबेडकरांने पुन्हा सांगितले. ते म्हणतात-" बौद्ध धर्म जाती विरहीत एकजीनसी समाजरचनेचा पुरस्कार करतो. तर हिंदू धर्म जातीवरच मुख्य अधिष्ठान ठेवतो. हिंदूच्या हरएक जातीमध्ये चिरेबंदी भिंत घालून विभागणीकरण्यात आली. आहे." [१५] या वर्णव्यवस्थेमध्ये परस्पर विवाह होऊ नये. मानवा मानवातील सामाजिक व्यवहार वाढीस लागु नये म्हणून ज्ञानेश्वराने गीतेचा अनुवाद करुन वर्णव्यवस्थेचे म्हणजे ब्राम्हण वर्चस्वाचे समर्थन केले. डॉ. आंबेडकरांनी हा राष्ट्रीय विकासातील खूप मोठा अडथळा मानला. कारण वर्णव्यवस्थेची समाजरचना म्हणजे अस्पृश्य व शुद्र यांच्या विकासाच्या मार्गात अडथळे निर्माण करणारी रचना होय. हे लोकशाही जीवनपद्धतीला मागे ढकलणे होय. यामुळे लोकहितउपयोगी कार्यांना गती येणार नाही. कारण या जातीयवादामुळे भारत दीर्घकाळ दास्य भोगत राहिला आहे. "ब्राम्हणांचा तर जातीयवाद लेप इतका जाड झालेला की त्यांच्यापासुन त्यांना लोकहित दिसणेच शक्य नव्हते. राजाला जे आवडेल ते करुन आपले आपल्या जातीचे वर्चस्व राखता आले की त्यांना धन्य वाटे." [१६] स्वतंत्र भारतात ब्राम्हणी धर्माची ही समाज रचना उद्याला पुन्हा भ्ारताचे स्वातंत्र्य धोक्यात आणू शकते, हा धोका डॉ. आंबेडकरांना वाटत होता. जातींची बचबचपूरी वाढीस न लागता चांगल्या जीवनमूल्यांचा विचार करणारा एक वर्ग

---

१५. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १, संपा. गांजरे मा.फं., नागपूर, १९६८, पृष्ठ १९८

१६. धर्मनंद कोसंबी, बौद्धधर्मावरील चार निबंध, मुंबई. १९८२, पृष्ठ ४९३

वाढीस लागला पाहिजे. म्हणून त्यांनी बुद्ध विचार दिला. जीवन जर जातीय भावनेने भारलेले असेल तर साहित्यही तसेच साकार होईल. मूल्यविरहित जीवनासारखे साहित्यही दिशाहिन जहाजासारखे भरकट राहिल. हे भरकटणे,विषमतेत जगत राहाणे हे राष्ट्राच्या हिताचे नाही. आणि म्हणून त्यांनी कुरुपता देणारा विचार ओळखावयाचे सांगितले. बुद्धीवादी, विवेकवादी विचार आणि जातीयवादीविचार यामधील फरक ओळखावयाचे शिकवले. स्वर्ग-ईश्वर या काल्पनिक साहित्य निर्मीतीपेक्षा वास्तववादी जीवनाचे साहित्यमूल्य प्रतिपादन केले. ब्राम्हणी विचारसरणी व बौद्ध विचारसरणी या मधील विचाराला ओळखून स्विकारावयाचे शिकवीले. स्वातंत्र्य आणि दास्य या मूल्यातील मर्म समजावून दिले. ते म्हणतात- " बौद्धवाद व ब्राम्हणवाद या मधील फरक व भेद नीट लक्षात ठेवण्यास मी तुम्हाला सांगत आहे. यापैकी एकाची तुम्हास निवड करावयाची आहे. बुद्ध हा मानव होता बुद्धाची तत्वे जातीय वर्गाविरुद्ध होती. बुद्धाने सामान्य जनतेत वास्तव्य केले आणि मानवी दृष्टीकोनातून जनतेची दुःखे दूर करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आजपासुन कोणता धर्म तुम्हास उपकारक आहे हे तुम्हास ठरवावयाचे आहे. आणि ते स्वातंत्र्य तुम्हास निर्विवादपणे आहे." [१७] आधुनिक भारतीय साहित्याला काय अथवा मराठी साहित्याला काय डॉ. आंबेडकरांच्या बौद्ध साहित्य विचाराने दाखविलेली दिशा निश्चितच समृद्धतेकडे घेऊन जाणारी आहे. भारतीय दुःखी लोकांना त्यांनी बौद्ध विचार दिला. ज्यांचे शोषण झाले त्यांना बुद्धाची जीवन दृष्टी दिली. त्या जीवन दृष्टीचे चांगले परिणाम बुद्ध धम्म स्विकारलेल्या जनसमूहावर झाले आहेत. ते सुंदर जीवन व त्यांचे अनुभव साहित्याला समृद्ध करणारे आहेत.

बुद्धाने स्वर्ग, नरक, ईश्वर, आत्मा या निरर्थक गोष्टी नाकारल्या त्यामूळे बौद्ध साहित्याचे स्वरुप हे वास्तववादी झाले आहे. जनतेला फसविणाऱ्या गोष्टी

---

१७. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आबेडकरांची भाषणे खंड १, संपा.गांजरे मा.फ., नागपूर, द्वि.आ. १९६८, पृष्ठ १९८

या साहित्याने नाकारल्या. तुकारामाचा खून करुन लोकांना तुकाराम सदेह स्वर्गात गेले असे ब्राम्हणी साहित्याने सांगितले. पांडवांच्या व रामकृष्णादींच्या पुराणातून कथा सांगुन श्रमिक लोकांची मने वास्तवतेपासुन दूर नेली. इंद्रीयांना कळते तेच सत्य बौद्ध संहित्याने सांगितले. ईश्वर, आत्मा या गोष्टीवर अधिक भर दिल्यामुळे दारिद्रय, दास्य, मानवी दुःख यांना जाणिवपूर्वक लोकांच्या माथी मारले. वर्णव्यवस्थेच्या पुरस्कारापोटी मानवी दुःखाला पूर्वजन्माचे पाप म्हणून समर्थन केले. ब्राम्हणालाच सत्य मानायचे शिकवले. डॉ. आंबेडकरांनी जे जे प्रबोधनाच्या मध्ये अडथळा निर्माण करते ते सर्व शोषण नाकारले. लोकांना व साहित्यीकांना ठणकाऊन सांगितले. ब्रम्हसत्य मानुन लेखन करु नका. ते म्हणतात-"ब्रम्ह सत्य मानणे म्हणजे न पाहिलेल्या मुलीवर प्रेम करण्यासारखे आहे. ब्रम्हसत्य जगत मिथ्या" [१८] ईश्वराला ब्रम्हाला सत्य कल्पुनच संत साहित्य लिहीले गेले . ईश्वराला महत्व देऊन त्यांच्या तोंडून वर्णव्यवस्थेचे समर्थन ऋग्वेद, गीता, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी इत्यादी ग्रंथाच्या साहाय्याने केले आहे. ब्राम्हणी साहित्याने सत्याची व्याख्या ब्रम्ह करुन कसे शोषण केले हे डॉ. आंबेडकरांनी आपल्या निबंध लेखनातून मांडले. आणि बुद्धाने सत्याची व्याख्या कोणती केली हे सुद्धा सांगितली. आहे. ते म्हणतात-"बुद्धाने सत्याची व्याख्या अगदी सोप्या शद्वात सांगितली होती. इंद्रियांना कळू शकेल तेच सत्य होय. दुसऱ्या शद्वात सांगावयाचे म्हणजे कुणी अधिकारी व्यक्तीने सांगितलेली वस्तूच सत्य असे नाही. उलट ब्राम्हणांचे म्हणणे असे की जे वेदाप्रमाणे तेच सत्य. बौद्ध क्रांतीकारक होते आणि ब्राम्हण प्रतिगामी. सध्या आपण प्रतिगामी लोकांच्या वर्चास्वाखाली आहोत. वेद वाचल्यानंतर मला मोठे आश्चर्यच वाटले की ज्यात विदूषकी बडबडीखेरीज दुसरे काही नाही" [१९] वैदिक साहित्य विचाराने लोकांना ईश्वर भक्तीच्या नादी लावून आधुनिक विचारापासून रोखून धरले. यामध्ये शुद्र

---

१८. आंबेडकर भी.रा., डॉ. आंबेडकरांची भाषणे खंड ६, संपा. गांजरे मा.फ., नागपूर, १९८२, पृष्ठ -१२०

१९. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आबेडकराचीं भाषणे खंड १, संपा.गांजरे मा.फ., नागपूर, १९६८, पृष्ठ ११९

अतिशुद्र हा भोळा माणूस असल्यामुळे तोच या विचाराचा शिकार झाला. त्यांने बुद्ध विचारांची प्रेरणा होऊन क्रांती करावी म्हणून त्याच्यासाठी डॉ. आंबेडकरांनी लढे उभारले. 'शुद्र पूर्वी कोण होते?' व 'अस्पश्य मुळचे कोण?' हे दोन ग्रंथ लिहिले. हे ग्रंथ भारतीय वाङ्मयातील महान ग्रंथ ठरले आहेत.

भारतीय समाजजीवनाचे खरे स्वरूप आधुनिक काळातच संशोधित पद्धतीने अभ्यासले जात आहे. बहुजनामधून आलेले लेखक त्यांनी प्रामाणिक सत्य साहित्यातून मांडले आहे. डॉ. आबेडकरांनी बहुजनांच्या मुक्तीचा क्रांतीविचार मांडला आणि आजचा बहुजन जो अधिकारहीन आहे, साहित्य व कला क्षेत्रात मागासलेला आहे, याला कारण त्याच्यावर लादलेला ब्राह्मणी - हिन्दु धर्म आहे. डॉ. आबेडकरांनी बहुजनांच्या अंगावरची ही गुलामगिरीची खोळ नष्ट केली. आणि ते मूळ बौद्धधर्मिय होते हे ऐतिहासिक दृष्ट्या सांगितले. "येथे ब्राह्मण आणि क्षत्रिय या दोन उच्च वर्णाची जी तुरळक वस्ती आहे ती बाहेरूनच आलेली आहे. वैद्य, कायस्थ, हा जो मोठा मध्यमवर्ग आहे तो क्षत्रिय आणि वैश्य याचे मिश्रण आहे आणि बाकी उरलेला जो मोठा समाज जो तो निर्भेळ आर्येतर आणि एकेकाळी पूर्ण बुद्धानुयायी होता" [२०] आज हे बहुजनांचे प्राचीन बौद्ध धर्मिय रूप त्याच्या महान संस्कृतिच्या शिल्पकाराचे आहे. महान प्रतिभेच्या बौद्ध साहित्य निर्मितेचे आहे. तो आज जो हिन --दीनपणे बोलतो त्याला कारण त्यांचे खरे रूप, खरी ओळख दृष्टीआड गेल्यामुळे आहे. तुकाराम व चोखामेळा जे अंभगात बोलतात त्याचे कारण त्यांना वाटते मला देवानेच कुणबी व महार केले. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध साहित्य विचाराच्या माध्यमातून बहुजनाला समतेची क्रांतीदृष्टी दिली. आणि अस्पृश्य मुळचे कोण? हे सांगितले. [२१] ब्राह्मणी साहित्याचे खरे स्वरूप म. फुले यांनीही मांडले. ते म्हणतात - "आर्यातील कितेक पूर्वीच्या धुर्त ऋषींनी शुद्र अतिशुद्रांनी विद्या शिकू नये म्हणून कडक

---

२०. वि.रा. शिंदे, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, मुंबई, १९७६, पृष्ठ ५३

२१. आंबेडकर भी.रा., THE UNTOUCHABLES, अस्पृश्य मुळचे कोण ? अनु. गांजरे मा.फ., नागपूर.

नियम करून ठेविले व हल्ली दगड मातीच्या भिंतीवर स्वार होऊन रेड्यामुखी वेद बोलविणाऱ्या ज्ञानोबा शिष्यांच्या मुखाचा खलबत्ता करून त्याची परिक्षा पहाणाऱ्या रामदास वगैरे मतलबी आर्यभट्ट साधुसंतांनी पूर्वी केलेल्या धुर्त ऋषींच्या ग्रंथावर भारेचे भारे नविन ग्रंथ करून त्यामध्ये शुद्रादी अतिशुद्रास दास केल्याविषयाचे पाचपेच मुद्दाम उघडकीस न आणिता त्यास नाना प्रकारच्या धातु दगडांच्या मूर्तीवर भाव ठेवावयास शिकवून, त्यास कल्पित ब्रह्मघोटाळ्यात ढकलून दिले आणि त्याचप्रमाणे धुर्त आर्यांनी मांगामहाराविषयी दुष्टाईने कडेकोट व्यवस्था करून ती प्रचारात आणली" [२२] हे ब्राहमणी वाङ्मयाचे प्रयोजन आज लक्षात धेतले पाहीजे. आजचे साहित्य हे लोकशाही जीवनमूल्यांशी सुसंगत असले पाहिजे. प्राचीन व मध्ययुगीन साहित्याने अस्पृश्यांना दिर्घकाळ गुलाम ठेवण्याचा उद्येश समोर ठेवला होता. खरे सत्य लपवून विकृत आदर्श व विचार प्रस्तूत केला. डॉ. आंबेडकरांनी ब्राह्मणी साहित्याचे दुष्ट अंतरंग उलगडून दाखविले. आणि बौद्ध साहित्याचे समर्थन केले.

इ.स. पूर्व सहाव्या शतकापासून बुद्ध व त्यांच्या विचारातून बौद्ध संस्कृती उदयास आली. साहित्य, चित्रकला, शिल्पकला, स्थापत्यशास्त्र, यामधून बौद्ध विचार प्रकट झाला. आणि त्यानंतर ब्राहमणी-वैदिक संस्कृती व बौद्ध संस्कृती यांचा वैचारिक संघर्ष सुरु झाला. वैदिक संस्कृतीने 'ब्राहमणहिताय' हे सूत्र सिद्धांत साहित्यातून मांडले. आणि बौद्ध संस्कृतिने 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे सूत्र-सिद्धांत साहित्यातून मांडले. यांचा संघर्ष हा सातत्याने तेराव्या शतकापर्यंत चालला हे दोन वैचारिक प्रवाह सातत्याने वाहत आले आहेत. ब्राहमणवादाने नेहमीच बहुजनाच्या विकासाला कात्री लावण्याचे कार्य केले. त्यांना दुय्यम नागरिकत्वाचा दर्जा देण्याचा प्रयत्न केला. बौद्धांनी समतेचा आग्रह कधिही सोडला नाही. त्यामुळे त्यांच्या विचाराला सामावून घेण्याचा प्रयत्न ब्राहमणवाद करीत राहीला. समन्वयाच्या नावाने आपलाच विचार लोकांच्या माथी मारत आला.

---

२२. जोतीराव फुले, म.फुले समग्र वाङ्मय, मुंबई, द्वि.आ. १९८०, पृष्ठ ३६८

प्राचीन भारतात हे दोन प्रवाह वैचारिक संघर्ष करीत होते. आधुनिक भारतातही बौद्धांच्या, लोकशाहावादी नावाच्या रुपाने एक प्रवाह गतिमान आहे. आणि दुसरा ब्राहमणी हिन्दू परंपरावादी जातीय वादाच्या नावाने वाहतो आहे. यांना एकत्र वाहू द्यावे का ? एकत्र भेसळीने ते वाहू दिले तर बहुजनांच्या जीवनावर वाईट परिणाम होतात. त्यांची गुलामगिरी टिकून राहण्यास मदत होते. वैज्ञानिक जीवनदृष्टी प्राप्त होत नाही. भौतिकवादी जीवनाला गती प्राप्त होत नाही. वास्तववादी व प्रबोधनवादी साहित्याला विराट स्वरुप पाप्त होत नाही. त्यामुळे राष्ट्रीय जीवनच मोडकळीस येते. बौद्ध व ब्राहमणी-हिन्दू विचाराच्या एकत्र वाहण्याने प्राचीन भारतात वाईट परिणाम भोगावे लागले. हा धोका आधुनिक भारतात निर्माण होता कामा नये. ब्राहमणी विचाराच्या वगनि, समाजाने व व्यक्तीने लोकशाहीवादी विचार स्विकारणे हेच राष्ट्राच्या हीताचे आहे. बौद्ध संस्कृती स्वीकारणेच समाज हिताचे आहे. आज समरसतेच्या नावाने ढोंगी नाटक सुरु झाले आहे. त्यामधिल धोका ओळखणे म्हणजे प्रबोधनाला संरंक्षण देणे आहे. बहुजन समाजाच्या विकासाला सुरक्षितता देणे आहे. म्हणून हे दोन प्रवाह एकमेकात मिसळता कामा नये असा विचार डॉ. आंबेडकरांनी मांडला आणि राष्ट्राच्या प्रगतीतील धोका सूचित केला आहे. ते म्हणतात -"येथे संस्कृतिचे दोन प्रवाह सुरु आहेत. एक ब्राहमण धर्म व दुसरा बौद्ध धर्म. ब्राहमणी धर्माचं घाणपाणी बुद्ध धर्माच्या स्वच्छ पाण्यात एक झालं. हिंदू धर्माच्या घाण पाण्याला नाली काढून स्वच्छ पाणी बाजूला काढू या." [२३] आजच्या भारतीय समाजात हे दोन प्रवाह आजही आहेत. आधुनिक साहित्यात फुले, आंबेडकर यांचा एक प्रवाह आहे दुसरा चिपळूणकर, टिळक-सावरकर यांचा आहे. स्वतंत्र भारतात जर तोडजोडीचा वैचारिक व्यभिचार घडला तर वाईट परिणाम वरिष्ठ सुवर्ण वर्गाला भोगावे लागणार नसून बहुजन गरिबांना भोगावे लागतील. बौद्ध विचार, प्रबोधन विचार, लोकशाहीवादी वैज्ञानिक विचार, समतावादी विचार हा सगळ्याच मानवाच्या

---

२३. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आबेडकरांची भाषणे खंड १, संपा. गांजरे मा.फ. नागपूर, १९६८, पृष्ठ ३६८

कल्याणाचा आहे. मनुवादी ब्राहमणवादी वर्णव्यवस्थावादी जातीयवादी हा विचार मात्र मुठभर लोकांच्याच कल्याणाचा आहे. आणि आज आधुनिक काळात सर्व लोकांचे कल्याण झाले पाहीजे. त्यांचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक शोषण थांबले पाहीजे. ही समतेची तत्वे बुद्ध विचारात आहेत. विषमता विरोधी संघर्षाची दिशा बौद्ध आंबेडकरवादी साहित्याला आहे. म्हणून हे दोन प्रवाह वेगवेगळे आहेत. त्यांचे तडजोडीचे ढोंगी राजकारण आधुनिक भारतात होता कामा नये. वैचारिक तडजोडीचे काय परिणाम झाले? प्राचीन भारताचा इतिहास बौद्ध व ब्राहमणी तडजोडीच्या रुपाने काही तडजोडवादी नेते व लेखकाकडून साकार झाला, तेव्हा काय परिणाम झाले? वि.रा. शिंदे लिहितात -"ह्या सबंध काळात बौद्ध आणि ब्राहमणी संस्कृतिची सारखी तडजोड चालली होती आणि अशा मिश्रणाचा परिणाम भरतखंडाच्या भवितव्यतेवर पुढील म्हणजे अर्वाचीन युगात अनिष्टच झाला" [२४] हा धोका टाळण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी ब्राहमणी धर्माचे गढूळ पाणी नष्ट करण्यासाठी राष्ट्राकडून सतत प्रयत्न झाले पाहीजे, तेव्हाच भारतात अस्पृश्यता उदयास येणार नाही असेच चिंतन मांडले आहे.

ब्राहमणी ग्रंथ व ब्राहमणी धर्म हे दोनही बहुजनांच्या शोषणाची हत्यारे आहेत. आधुनिक लेखकांनी मोठ्या चतुराईने यांचे गोडवे गायीले आहेत. साहित्यातही ब्राहमण-क्षत्रिय यांचे महत्व मोठ्या खुबीने प्रतिपादन केले आहे.

डॉ. आंबेडकरांनी बौद्ध साहित्यच विचाराच्या माध्यमातून शुद्र-अतिशुद्र व ब्राहमणवाद यांचा प्राचीन भारतातील संघर्ष मानवी मुक्तीसाठी प्रतिपादन केला. समाजाच्या श्रृंखला तोडावयाच्या असतील तर वैचारिक भूमिका घेऊन नवा संघर्ष उभा केला पाहीजे. आणि तो शोषीत जनतेनेच लढविला पाहिजे. त्यासाठी भारतीयांनी ब्राहमणी हिंदुत्ववाद टाकूत बौद्ध विचाराचे महत्व समजून घेतले पाहिजे. "ब्राहमण धर्म हा अन्याय, निर्दयता आणि गरिबांची पिळवणूक यांचे माहेरघर आहे. वर्ण व्यवस्थेत सर्वात वर ब्राहमण असून त्याच्याखाली क्षत्रिय नंतर वैश्य व सर्वांचे ओझे डोक्यावर असलेला शुद्र सर्वात खालच्या रांगेत आहे.

---

२४. वि.रा. शिंदे, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, मुंबई, १९७६, पृष्ठ ३५

जर शूद्राला आपली उन्नती करुन घ्यावयाची असेल तर त्याला तिन्ही वरच्या वर्णांशी झगडा करावा लागेल. या तिन्ही वर्णांना स्वतःच्या कल्याणाची मुळीच काळजी करावीशी वाटत नाही. धर्म ग्रंथांनी ब्राहमणाकडे वैश्य-क्षत्रियापेक्षा श्रेष्ठत्व दिले असल्यामुळे ते अक्षरशः ब्राहमणी वर्गाचे धार्मिक गुलाम आहेत ... या उलट बौद्ध धर्माकडे पाहा येथे जातियतेला आणि विषमतेला थारा नाही सर्व अधिकार समसमान सर्वांना धर्मात सारखे अधिकार. उच्च नाही अन् कोणी नीच नाही. स्वतः बुद्धाने अन्यायाविरुद्ध झगडून 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' अशा धर्माची स्थापना केली" [२५] असा समतेचा विचारच 'थेरगाथा' या स्वकथनातून बौद्ध साहित्यात प्रकटला. सुसभ्य सुसंस्कृत मनाचे सुंदर दर्शन 'धम्मपद' या बौद्ध साहित्यातील महान ग्रंथात घडते. 'मिलिंद प्रश्न'या ग्रंथात बौद्ध तत्वज्ञान सरळ सोप्या भाषेत प्रकट झाले आहे. त्रिपिटकामधून बौद्ध सभ्यतेचा विचार प्रकट झाला. त्या विचाराचा विकास अश्वघोष, बुद्धघोष, नागसेन, धर्मकिर्ती, वसुबंधु, नागार्जून इत्यादी अनेक बौद्ध पंडीतांनी आपल्या लेखनीतून केलेला आढळतो. अशा या महान साहित्याचा अभ्यास नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला इत्यादी विद्यापीठातून होत होता. जगातील ही बौद्धांनी निर्माण केलेली पहिली विद्यापीठं होती. येथे ग्रीकमधून अभ्यासाला विद्यार्थि येत होती. चीनमधून का-हियान, ह्यू-एन-त्सॅग, इ-त्सिंग असे जगप्रसिद्ध विद्वान बौद्ध साहित्याचा अभ्यास करण्यासाठी भारतात आले होते. आणि अनेक बौद्ध ग्रंथ स्वतःच्या देशात घेऊन गेली होती. हा सगळा महान इतिहास व साहित्य यांच्या अभ्यासाची प्रेरणा डॉ. आंबेडकरांच्या बौद्ध साहित्य विषयक विचारात प्रकट झाली आहे. आधुनिक साहित्याला बौद्ध विचाराची गरज आहे. ते म्हणतात -"देव व आत्मा यांना बौद्ध धर्मात जागा नाही भगवान बुद्धाने सांगितले जगात सर्वत्र दुःख आहे. ९० टक्के माणसे दुःखाने पीडलेली आहेत. त्या दुःखातून पिडलेल्या गरीब


---

२५. आंबेडकर भी.रा., डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकची भाषणे खंड १, संपा. गांजरे मा.फ., नागपूर, १९६८, पृष्ठ २३५

यह सारी ऐतिहासिक और सांस्कृतिक निधिया हमारे देश मे बे-मालिक की पडी है। "[२७] अशा या महान श्रेष्ठ संस्कृतिचे वारसदार डॉ. आंबेडकरांनी पुन्हा भारतीय जनतेला केले. भारताची खरी संस्कृती ही बौद्ध संस्कृती आहे हे आपल्या विचारातून पुन्हा त्यांनी इतिहासाच्या आधाराने मांडले. या त्यांच्या बौद्ध चिंतनाच्या योगदानाने भारतीय साहित्याला नवा आयाम मिळाला आहे. त्यांच्या वाङ्मयदृष्टीने व जीवनदृष्टीने एका विशाल मानव्याच्या मूलतत्वाना गती आली आहे. बौद्ध साहित्य व कलासृष्टीची एक मूल्य जाणीव स्वातंत्र्योत्तर काळातील जीवनात साकार झाली आहे. मराठी साहित्यात समग्र ताकदीने ती मांडण्याची गरज आहे. भारतीय साहित्याला जागतिक पातळीवर महानता प्रदान करण्याची प्रेरणा डॉ. आंबेडकरांच्या बौद्ध चिंतनात आहे. आणि म्हणून डॉ. आंबेडकरांचा बौद्ध साहित्य विचार जीवनाला व साहित्यालाही महान करणारा श्रेष्ठ विचार झाला आहे.

♠ ♠ ♠

REFBK-0026836



२७. राहूल सांकृत्यायन, नवदीक्षित बौद्ध, लखनऊ, १९५७, पृष्ठ १०.



प्रा. डॉ. प्रकाश खरात, एम.ए.पी.एच.डी.
जन्म : १ जानेवारी १९५३
मराठीचे अधिव्याख्याता : डॉ. आंबेडकर कॉलेज, दिक्षाभूमी, नागपूर
कॉन्ट्रिब्यूटरी लेक्चरर : डॉ. आंबेडकर विचारधारा विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर
नागपूर विद्यापीठाच्या 'मराठी अभ्यास मंडळाचेसदस्य'
दलित साहित्य संमेलने, मराठी साहित्य संमेलने, सामाजिक विषयांवरील विविध परिसंवाद यामधून सहभाग.
विविध नियतकालीकांमधून कथा, कविता, समीक्षा व लेख प्रकाशित.
प्रकाशित ग्रंथ : दलित कथा : उगम आणि विकास



ऋचा प्रकाशन, नागपूर.